साप्ताहिक

# माणूस

२ जून ८४/दोन रुपये



साप्ताहिक

# माणूस

□

वर्ष : चोविसावे

अंक : पहिला

□

२ जून १९८४

किंमत : दोन रुपये

□

संपादक

श्री. ग. माजगावकर

□

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

□

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

□

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४ ३४५९.

□

मुखपृष्ठ

संजय पवार

## राजहंस विद्यार्थी दैनंदिनीचे प्रकाशन

'राजहंस प्रकाशन'तर्फे नुकतेच दोन महत्त्वाचे उपक्रम पार पाडण्यात आले पहिला उपक्रम पुस्तकप्रदर्शनाचा, पुण्याच्या गोखले हॉलमध्ये २५, २६, २७ मे हे तीन दिवस विविध प्रकाशनसंस्थांची आणि विविध प्रकारची सुमारे दोन हजार पुस्तके या प्रदर्शनात होती. पुस्तकप्रदर्शन भरवणे ही कल्पना नवीन नाही. काही मोठा व्यवसाय असलेल्या प्रकाशकांनी हा पायंडा आधीच पाडला आहे. राजहंस पुस्तक प्रदर्शनाचं वैशिष्टय असं की, प्रदर्शनाच्या एका व्यापक योजनेतला एक भाग म्हणून गोखले हॉलचं प्रदर्शन 'राजहस' ने केलं. याआधी ३।४ महिने वेगवेगळ्या कारखान्यातून पुस्तकप्रदर्शने सुरू केली आणि कामगारांच्या एका मोठ्या वर्गाला प्रदर्शनाला भेट देण्याची संधी घेता आली. नाही तर सकाळी सहा ते रात्री सहा–सात–आठ हा कामगार कारखान्यातच अडकलेला. 'राजहंस' चा खरा उपक्रम हा; पण प्रदर्शनमोहिमेत गावातल्या मध्यमवर्गीयांनाही विसरून चालणार नाही म्हणून सलग तीन दिवस प्रदर्शन भरलं होतं. लोकांना पुस्तकं विकत घ्यायला आवडत नसली तरी बघायला मात्र अजून आवडतात. त्यांमुळं पुस्तकं बघायला लोकाची सतत गर्दी होती.

हा झाला एक उपक्रम. दुसरा उपक्रम होता 'राजहंस' च्याच विद्यार्थी दैनदिनीच्या प्रकाशनाचा. २५ तारखेला सकाळी नऊ वाजता प्रदर्शनाचे उद्‌घाटन आणि दैनंदिनी-प्रकाशनाचा सोहळा पार पडला. उद्‌घाटन व प्रकाशन कार्यक्रमासाठी बालमानसशास्त्राच्या अभ्यासक आणि पालक संघाच्या चिटणीस सौ. श्यामला वनारसे यांना बोलावल होतं.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थी दैनंदिनीच्या संपादनात भाग घेतलेल्या सौ. शलाका सोमण यांनी दैनंदिनी प्रसिद्ध करण्यामागची भूमिका सांगितली. त्या म्हणाल्या की, सावरकर दैनंदिनी नुकतीच राजहंसने प्रसिद्ध केली आणि त्याला अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला. याच पार्श्वभूमीवर खास विद्यार्थ्यांसाठी एखादी दैनदिनी असावी, त्यांना दैनंदिनीचा सतत वापर करता यावा अशा कल्पनेतून विद्यार्थी दैनंदिनीची कल्पना पुढे आली. किशोर आणि कुमारवयीन मुलांसाठी गेल्या २२ एप्रिलला राजहंस प्रकाशनतर्फे एक चित्रकला व हस्तकला स्पर्धा आयोजित केली होती, त्यालाही चांगला प्रतिसाद मिळाला, काही विशिष्ट उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून या उपक्रमाची सुरुवात केली आहे, असे त्या म्हणाल्या. यापुढील वर्षात मुलांसाठी म्हणून काही विज्ञानावर आधारित पुस्तके, स्पर्धा घेण्याची इच्छा आहे आणि त्याची सुरुवात म्हणून ही दैनदिनी आहे असे त्यांनी सांगितले.

दैनंदिनीचे स्वरूप या विचाराला पूरक असेच आहे. मुलांनी ठराविक परीकथा-गोष्टी यापलीकडे जाऊन विज्ञानयुगाशी मैत्री ठेवावी; विज्ञानातले वेगवेगळे छोटे प्रयोग स्वत हून अभ्यासावेत, त्याची कारणं शोधावीत आणि आपणही एखादा नवा उपक्रम करून पहावा अशी प्रेरणा मिळेल असं खूप साहित्य या दैनंदिनीत अतिशय सोप्या व आकर्षक भाषेत दिलं आहे. दैनदिनीचे संपादक डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर आहेत. 'माणूस'च्या वाचकांना डॉ. दाभोळकराचे नाव परिचित आहे, अवघड विषय सोपा करून सांगण्याचा त्यांचा हातखंडा पानापानावर जाणवतो. दैनंदिनीत फक्त विज्ञानच नाही–पुन्हा पुन्हा वाचाव्याशा वाटतील अशा कवितांचं नवनीत, परीक्षेत उपयोगी पडेल अशी शास्त्रीय माहिती, पेपर लिहिताना उपयोगी पडेल असं मार्गदर्शन, निबंध लिहायला, वक्तृत्वसभा जिंकायला उपयोगी पडतील अशी सुभाषितं, विज्ञानातली कोडी, अंटार्क्टिकावरची 'हिमगौरी'– मुलांच्या पालकानासुद्धा आवडेल आणि बुद्धीला पीळ देईल अशी ही दैनंदिनी आहे.

हे झालं दैनंदिनीचं स्वरूप, कार्यक्रमाच्या अध्यक्ष श्यामलाताई म्हणाल्या, दैनंदिनी तर छानच आहे; पण मला उत्सुकता आहे ती तुम्ही कशी वापरता याबद्दल. आपण बोलतो जास्त आणि लिहितो कमी. दहा गोष्टी

एका वेळी करण्यापेक्षा त्याचं आधी नियोजन करून, लिहून ठेवून त्याप्रमाणं एक एक काम आपण करतो का? मुलानी या दैनंदिनीत उद्या काय करणार याची नोद ठेवली पाहिजे आणि तस आपण करू शकतो का हे पाहिले पाहिजे. या लिहून ठेवण्याची सुरुवात जर मुलानी विद्यार्थी दैनदिनीपासून केली तर त्याचं यश समजता येईल. मुलानी आपल्याला ओळखलं पाहिजे असं त्या म्हणाल्या. त्या म्हणाल्या मुल सुट्टीत एखाद्या छदवर्गाला जातात ते आईनं सांगितल म्हणून आणि एखादा अभ्यासक्रम निवडतात बाबांनी सांगितलं म्हणून. स्वतःची आवड, इच्छा किती मुलं समजून घेतात? चित्रकला–हस्तकला वाईट, नाटक–गाण वाईट अशा समजुती पालकानी मुलाच्या मनावर घालून देण चुकीचं आहे असं त्या म्हणाल्या.

विद्यार्थी दैनदिनीच्या बरोबरच एक छान भेट राजहंसनं मुलाना दिली– 'गंमत जंमत' अंक. या अकाच संपादन मेधा राजहस यानी केलं होत. या अंकाचं प्रकाशनही दैनंदिनीबरोबरच झालं. त्यानतर चित्रकला-हस्तकला स्पर्धेतल्या यशस्वी स्पर्धकाना बक्षिस दिली गेली. स्पर्धकाची चागली चित्रं आणि हस्तकला आकर्षकपणे भिंतीवर अडकवल्या होत्या.

कार्यक्रमात मुलं आणि पालकांचा प्रतिसाद चांगलाच मिळाला. बालमानसशास्त्राचं जे भान नव्यान पालकाना यायला लागल आहे त्याचं हे उदाहरण म्हणता येईल. मुलाना घडवण्यात पालकाचा भाग किती? निम्म्याहून अधिक. किती पालकाना याची जाणीव असते आणि दृष्टी असते? श्यामलाताई पालकसंघाचं काम करतात. मुलाचे प्रश्न सोडविण्यासाठी मानसशास्त्राची आणि मार्गदर्शनाची कशी गरज असते हे दाखवून देणारी काही प्रसंगनाट्यं पालकसंघातर्फे बसवली आहेत. प्रदर्शन–प्रकाशन–कार्यक्रमाचा शेवटचा भाग म्हणून यातील दोन प्रसंग अतिशय परिणामकारकपणे सादर केले.

मुलांपासून सुरुवात करून कार्यक्रम शेवटी पालकापर्यंत पोचला. मुलं आणि पालक हे दुवे जोडून घेण्याचं काम या कार्यक्रमातून फार चागल्या प्रकारे घडलं. यातून सयोजकांची दृष्टी दिसून आली.

चागला उपक्रम आणि चायलं संयोजन याचा मेळ म्हणून २५ तारखेच्या कार्यक्रमाचं नाव घेता येईल.

–प्रतिनिधी

# भिवंडी दंगल : तीन स्तर

श्री. ग. मा.

मुंबईला दोन लाख गिरणीकामगारांचा संप सुमारे दोन वर्षे चालला. शेकडो कामगार कुटुंबे परागंदा झाली. हजारो कर्जबाजारी झाली. मुलांच्या शिक्षणात अडथळे आले. तरी या दोन वर्षात अपवाद वगळता, या क्षेत्रात हिंसाचाराच्या घटना घडल्या नाहीत. असतोष खदखदत होता; पण या असंतोषाचे हिंसक उद्रेकात रूपातर झाले नाही. गिरणीकामगारांचा सप मोडत ढेपाळत शेवटी सपला केव्हा हे सुद्धा कळले नाही.

अगदी अलिकडे दत्ता सामंतानी कामगारांची अशीच कोंडी होत राहिली तर महाराष्ट्राचा पजाब करू अशी जाहीर धमकी दिली; पण अद्याप तरी कामगारक्षेत्र शांत आहे. कोंडी कमी होत असल्याचेही दिसत नाही.

महागाई अस्मानाला भिडली आहे. बेकारीही वाढते आहे असे सगळेच अर्थशास्त्रज्ञ व राजकारणी म्हणत आहेत.

पण आर्थिक असंतोष आपल्याकडे अद्याप तरी राजकीय असतोषात रूपातरित होत नाही.

आणि झेंड्याचे किरकोळ निमित्त घडते काय आणि भिवंडी-ठाणे-कल्याण पेटते काय, ही आग मुबईभर पसरते काय, दोनशेच्यावर माणसाचा बळी जातो काय, कोटयवधी रुपयांची मालमत्ता भस्मसात होते काय?

दोन लाख गिरणीकामगार दोन वर्षे संपावर होते; पण इंदिरा गाधीनी त्यांच्याकडे ढुकूनही पाहिले नाही आणि भिवडीला दगल उसळल्यावर त्या तातडीने धावत आल्या.

आपल्याकडे अद्याप तरी आर्थिक प्रश्नापेक्षा धार्मिक प्रश्न महत्त्वाचे ठरतात, अर्थकारणापेक्षा धर्मकारणाचा पगडा आपल्या समाजावर अधिक आहे याचा हा अगदी ढळढळीत व ताजा पुरावा आहे.

भिवडी-ठाणे-कल्याण-मुबईला अलिकडे जे घडले त्याला आपण जातीय दंगली असे म्हणतो, पण हे चूक आहे. गांधीखुनानंतर महाराष्ट्रात ज्या दंगली उसळल्या त्या जातीय दगली होत्या. भिवडी-कल्याण-ठाणे-मुंबईला गेल्या महिन्यात ज्या दंगली उसळल्या त्याना धार्मिक दगली म्हणणेच बरोबर ठरेल. सध्या पजाबात ज्या दंगली, खूनसत्र सुरू आहे त्याचेही स्वरूप मुख्यतः धार्मिक-राजकीय आहे. शीखांना आपला धर्म धोक्यात आहे असे वाटते. विशाल हिंदुधर्म शीख संप्रदायाला गिळंकृत करेल अशी त्याना भीती आहे. म्हणून शीखपथाच्या सरक्षण व संवर्धनासाठी त्याना शीखाचे, भारतांतर्गतच, पण वेगळे राज्य हवे आहे. 'राज करेगा खालसा' अशी या पंजाब आंदोलनाची मूळ प्रेरणा आहे. डावी मंडळी याला काही आर्थिक कारणपरंपरा जोडत असतात. हिंदू हे शहरातील व्यापारी आहेत. शीख हे मुख्यतः शेतकरी आहेत. व्यापाऱ्याच्या वर्चस्वाविरुद्ध शेतकऱ्यांचा हा लढा आहे असे डाव्याचे प्रतिपादन असते. शिखाना सत्ता मिळाली, खालसा राज्यावर

आला की, ही लढाई थांबते की चालू राहते, यावर या प्रतिपादनाचे भवितव्य अवलंबून! मागील अनुभव वेगळा आहे. मुसलमानाना नोकऱ्या मिळाल्या, त्यांची आर्थिक कोंडी संपली, की पाकिस्तानच्या मागणीपासून ते परावृत्त होतील, असे डाव्यांना वाटत होते. पण नोकऱ्यापेक्षा मुसलमानांना धर्म अधिक निकडीचा,जिव्हाळ्याचा वाटला व धार्मिक पायावरच शेवटी देशाची फाळणी त्यानी घडवून आणली.

मध्यपूर्वेत–इराणमध्ये सध्या खूप नोकऱ्या आहेत. आपलेच लक्षावधी लोक तिकडे नोकऱ्या मिळतात म्हणून गेलेले आहेत. मग इतकी समृद्धी असूनही खोमेनीचा उदय तिकडे का व्हावा ?

तेव्हा भिवंडीतील ताजी दंगल ही धार्मिक दंगल आहे. धार्मिक-राजकीय वर्चस्वासाठी चाललेल्या एका प्रदीर्घ सत्तास्पर्धेचा हा आणखी एक उद्रेक आहे, हे आपण प्रथम ओळखले पाहिजे. हे जोवर आपण ओळखत नाही तोवर जी काही उपाययोजना आपण अशा दंगली थांबवण्यासाठी करू ती वरवरचीच ठरेल, दर दहा–पाच वर्षांनी आपल्याला या नाही त्या ठिकाणी, अशा कटु प्रसंगाना तोंड द्यावे लागेल, मग सत्तेवर वसंतरावदादा असोत, की या मूलभूत सत्तास्पर्धेची ओळखच नसलेले आणखी कुणी असोत !

हा धार्मिक-राजकीय सत्तासंघर्ष फार जुना आहे, महंमद बिन कासिमपासून चालत आलेला आहे. या भारतीय उपखंडावर स्वामित्व कुणाचे असावे ? मुसलमानांना वाटते हे स्वामित्व, ही सत्ता एके काळी आपल्याकडे होती. पुन्हा ती आपल्याला मिळाली पाहिजे मध्यंतरी ब्रिटिश आले आणि गेले; पण बहुसंख्य मुसलमान जुना वारसाच पुढे चालावा असे मानतात. अगदी सुरुवातीपासून मुसलमानानी कॉंग्रेस-प्रणीत स्वातंत्र्यआदोलनापासून स्वतःला योजनापूर्वक दूर ठेवले ते याचसाठी. स्वातंत्र्य समजा मिळाले तरी हिंदूच बहुसंख्य असल्याने सत्ता हिंदूकडे राहणार हे अलिगड चळवळीच्या संस्थापकांनी ओळखले व अशा हिंदू वर्चस्वाखाली राहायला लागू नये म्हणून स्वतःची वेगळी अस्मिता त्यांनी जोपासली, वेगळे राजकारण त्यासाठी उभे केले. काही प्रमाणात त्यांना यश लाभले. पाकिस्तान त्यांना मिळाले; पण संघर्ष संपलेला नाही. आजही पाकिस्तानातील विचारवंत, पत्रकार या उपखंडाला Indo-Pak Subcontinent म्हणतात. पुणे शहर पौड गावात समाविष्ट करून पौड-पुणे महानगर म्हणण्यासारखेच हे हास्यास्पद आहे; पण हा हास्यास्पदपणा चालू आहे–आपल्याकडचे विचारवतही तो अधूनमधून करत असतात. इंडो–पाक कॉंटिनेंट म्हणायचे तर इंडो-बर्मा कॉंटिनेंट का नको ? असे कोणी म्हणत नाही. कारण ब्रह्मदेशाला धार्मिक-राजकीय वर्चस्वाची ऐतिहासिक ओढ नाही, तुटले–फुटले असले तरी पाकिस्तान हे अशा वर्चस्ववृत्तीचे अद्यापही एक आशास्थान आहे. म्हणून असे शब्दप्रयोग तिकडे सहज सुरू होतात व आपल्याकडेही त्याचा वापर आंधळेपणाने होत राहतो. एका इतिहासकाराने म्हटले आहे की, जेथे मुस्लिम समाज बहुसंख्य असतो तेथे तो पूर्ण वर्चस्व स्थापन करतो (Dominant); जेथे तो अल्पसंख्य असतो तेथे तो गडबड माजवणारा (Turbulent) असतो. मुसलमानांची समूह म्हणून असलेली ही आक्रमक–वर्चस्ववादी धारणा कुठल्याही दंगलीच्या कारणांचा विचार करताना प्रथम ध्यानात घेतली पाहिजे. आजवर झालेल्या बहुसंख्य दंगलीत हे दिसून आलेले आहे. अगदी पारतंत्र्य–काळातल्या दंगलीही याला अपवाद नाहीत. ज्याना तरीही खात्री करून घ्यायची असेल त्यांनी लोकमान्य टिळकांचे केसरीतले त्या काळचे अग्रलेख काढून वाचावेत. आजही ते जसेच्या तसे लागू पडतील.

## दुसरा स्तर

हा झाला दंगलींचा पहिला स्तर. एकूण तीन स्तर असतात. दुसरा स्तर स्थानिक असतो. स्थानिक सत्तास्पर्धा दोन गटात चालूच असते. निवडणुका वगैरे आल्या की, या सत्तास्पर्धेला जोर चढतो. अनेक ठिकाणच्या दंगली निवडणुकांच्या आगेमागे घडलेल्या आहेत. या वेळी नेमका कोणता गट, कोणता पक्ष सूत्रचालन करीत होता हे अद्याप तरी पुढे आलेले नाही; पण दंगलीची तयारी बरीच आधीपासून चालू होती असे सर्वांनीच म्हटलेले आहे. अचानक एवढी शस्त्रास्त्रे आली कुठून ? पोलिसांशी गनिमी पद्धतीने प्रतिकार करण्याचे लोकांना एकदम सुचले कसे ? शिवाय अचानक उद्भवलेल्या दंगलीचा टापू फार विस्तृत नसतो. या वेळी कल्याण–भिवंडीपासून भाईंदर–दहिसरपर्यंत दंगलीचे लोण पसरले. तेव्हा पूर्वनियोजन बरेच असावे असे दिसते. फक्त या नियोजनाचे सूत्रधार कोण याविषयी सगळेच नेते, सगळी वृत्तपत्रे अद्याप तरी मौन बाळगून आहेत. इंदिरा गांधी कोणावरही खापर न फोडता, दुःख आणि सहानुभूती व्यक्त करून परत गेल्या आणि राजीव गाधीही दोनदा येऊन, काही मत व्यक्त न करता परतले, त्यावरून कॉंग्रेसचा, कॉंग्रेसमधील गटस्पर्धेचा

या दगलीमागे हात नसेलच असे सागवत नाही. या वेळी सघाचा हात कुणालाच कसा दिसला नाही ? संघ–जनसघावर खापर फोडून मुसलमानाची मते मिळवणे हा आजवरचा एक कॉग्रेससंस्कृतीवाल्याचा नित्यनेमच होता. या वेळी हा नियम पाळला गेला नाही. यावरून कॉग्रेसवाल्याचे, त्यातील एखाद्या गटाचे हे पाप असण्याची शक्यता नाकारता यत नाही.

दंगलीतील तिसरा स्तर वक्क गुडगिरीचा. ज्यांना ना पक्ष असतो ना धर्म. बहुतेक दंगली शेवटी गुडाच्या ताब्यात जातात मूळची सत्ताकारणे विसरली जातात, स्थानिक राजकारणी–सत्ताधारी बाजूला पडतात आणि शेवटची होळी पेटवायला, हात धुऊन घ्यायला गुड पुढे सरसावतात. सयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या राजकीय उद्दिष्टाबद्दल शंका घ्यायला काही जागा होती का ? नेतृत्वही सात्त्विक आणि अहिंसक होते. तरीपण मुबईत गुजराथ्याची दुकाने फोडून लटली गेलीच. तेव्हापेक्षा आता आपला खूप विकास झाला असल्याने, दारूचे अड्डे-दुकाने कोपऱ्याकोपऱ्यावर निघाली असल्याने गुडगिरीचा प्रभावही खूप वाढणे अपरिहार्यच आहे. त्यामुळे होळचाही मोठमोठ्या पेटतात, क्षेत्रही विस्तृत असते आणि मालमत्तेची हानीही लाखावरून . कोटीवर जाते. गुडांच्या टोळचा परस्पराचे हिशोबही या दंगलीच्या निमित्ताने चुकते करून घेतात. गोरगरिबाना कोण विचारते ? बळी गेलेले, चीजवस्तु, घर-झोपडी उध्वस्त झालेले बहुसंख्य गरीब आणि निरपराध असतात. मग ते हिंदू समाजातले असोत की मुस्लिम, की मामला आणखी कुणामधल्या संघर्षाचा असो, भाषिक दंगलीतही यापेक्षा वेगळे घडत नाही. दक्षिणेत काही दिवसांपूर्वी हिंदू-ख्रिश्चन दंगली झाल्या. गुडानी तेथेही शेवटी हात मारून घेतलाच. पूर्वी सैन्याबरोबरच बाजारबुणगे असत. युद्धात जयपराजय कोणाचाही होवो. बाजारबुणग्याचे काम हात मारणे एवढेच. सर्वधर्मसमभाव, सर्वपक्ष समभाव हे त्यांचे ब्रीद. या बाजारबुणग्याची नवी आवृत्ती म्हणजे आधुनिक गुडगिरी. हिचा उदय झाला की दंगलीचा शेवटचा अक सुरू झाला असे समजायचे, ही थावली की दंगल शमते. मग मदतपर्व येते. गुडांचा, राजकीय सत्तास्पर्धकांचा यातही वाटा असतोच. मदतकार्य द्विस्तरीय चालते. पहिला स्तर निदान मदतकार्यात तरी डोकावत नाही. उलट शाततासमिती स्थापन होते, कित्येकदा तर दंगल घडवणारेच शातता स्थापनेच्या पवित्र कार्यातही आघाडीवर असतात.

### त्रिस्तरीय उपाययोजना

उपाययोजनाही त्रिस्तरीय हवी हे उघड आहे. फक्त सुरुवात उलटीकडून पाहिजे. प्रथम बंदोबस्त गुंडगिरीचा. या वेळी दंगलीचा उद्‌भव झाल्यावरोबर लष्कराला पाचारण केले गेले. पागळेपण असूनही वसंतरावदादाच्या शासनाने हा निर्णय तडकाफडकी घेतला हे चागलेच झाले. स्थानिक पोलीस व गुड याचे बरेचदा साटेलोटे असते. गुडांवर लगेच व परिणामकारक कारवाई त्यामुळे होऊ शकत नाही. राखीव पोलीसदल अशा प्रसंगी वास्तविक पुरेसे पडायला हवे. अशा प्रसंगासाठीच तर या पोलिसदलाची उभारणी असते; पण भिवंडीच्या दगलीची भीषणता व त्यामागील खोल पूर्वनियोजन लगेच ध्यानात आल्याने, केवळ राखीव पोलिसावर अवलंबून न राहण्याचा निर्णय शासनाने घेतला असावा. फक्त राखीव दलांची शक्ती व कार्यक्षमता कमी का पडते हेही अशा प्रसंगाच्या निमित्ताने तपासले गेले पाहिजे व त्यावर उपाययोजना व्हायला हवी. लष्कर वरचेवर बोलवायला लागणे अयोग्य ब धोक्याचेही असते. वरचेवर बोलावणे गेले तर एखाद वेळी न बोलवता येण्याची घाई होऊ शकते. तेव्हा दगली आटोक्यात आणण्याची जबाबदारी स्थानिक पोलीस व राखीव पोलीसदल यानीच मुख्यत पार पाडली पाहिजे व त्यासाठी ज्या काही सुधारणा या दलात होणे आवश्यक असतील त्या तावडतोब अमलात आणल्या पाहिजेत. गुडगिरीचा तिसरा स्तर या पुढच्या काळात वाढतच राहणार आहे. तेव्हा या दलातही सुधारणा घडवून, ती कार्यक्षम बनवणे आवश्यकच आहे. त्यासाठी आणखी एखादा 'अर्धसत्य' सारखा सिनेमा निघण्याची वाट पाहण्याची काही गरज नाही.

दुसऱ्या स्तराचा, मागे राहून सूत्रचालन करणाऱ्या सत्तास्पर्धकाचा बंदोबस्त लोकांनीच करायला हवा. अशांना निवडणुकात पाडणे, ते व्यापारी–कारखानदार असतील तर त्यांच्या मालावर–दुकानांवर बहिष्कार टाकणे, अशांना सार्वजनिक सभासमारंभात येणे नकोसे करणे. हे उपाय स्थानिक जनतेच्या हाती आहेत. मागे राहून दगल कोण घडवतो हे बाहेरच्या लोकाना कळणे कठिण. स्थानिक मंडळीना ही माहिती असण्याचा संभव अधिक. अशा माहितीची सत्यासत्यता नीट पडताळून पाहून, अफवाना बळी न पडता, उपाययोजना कोणाविरुद्ध, कशा पद्धतीने करायची हे ठरवले गेले पाहिजे. निर्वैर व निष्पक्ष नेतृत्वाची गरज अशा वेळी तीव्रतेने जाणवते.

हिंदू, मुसलमान या दोन्ही समाजात, सर्वांच्या आदरस्थानी असणारी, कुठलाही पक्षपात न करणारी थोडी फार मंडळी, अगदी भिवंडीतही असणारच. त्याना अशा प्रसंगी मोठेपणा देऊन, त्याचे नेतृत्व स्वीकारून दंगलीमागे असणाऱ्यांना लक्षात राहील अशी अद्दल घडवली पाहिजे. चोराला चोर आणि संन्याशाला संन्यासी ठरवले पाहिजे. निवडणुकावर ज्यांचा डोळा आहे अशी मंडळी परखडपणे, निःपक्षपणे हे कार्य करू शकणार नाहीत. मतांचा प्रश्न असतो; पण ज्यांचा मतांशी–निवडणुकांशी तादृश संबंध नाही त्यांनी सत्यशोधनाचे व सत्यकथनाचे कार्य का करू नये ? यासाठीच समाजात तिसरी शक्ती हवी असे विनोबांनी म्हटलेले आहे– अशी शक्ती की जी निष्पक्ष व निर्वैर असेल आणि अंकुशही ठेवू शकेल. वृत्तपत्रांनाही ही कामगिरी काही प्रमाणात बजावता येईल. अजून तरी भिवंडी प्रकरणी या शक्ती कार्यरत झाल्यासारख्या दिसत नाहीत. खरी माहितीच जर दाबून ठेवली गेली, सगळ्यांनीच मौन पाळले तर अफवा पसरणारच. अफवांवर विश्वास ठेवू नका अशी कितीही आवाहने रेडियो–टी. व्ही वरून केली तरी मग त्यांचा काय उपयोग ? जालियनवालाबाग हत्याकांड घडले. सरकार खरे काय ते सांगायला, तातडीने चौकशी करायला तयार नव्हते. कांग्रेसने तात्पुरती चौकशी समिती नेमली व मोजक्या वेळात एक अहवाल तयार करून सरकारसमोर, लोकांसमोर ठेवला. भिवंडीबाबत असे का घडू नये? न्यायमूर्ती लेंटिनसारखी निःस्पृह माणसे आजही आपल्यात आहेत. सरकारी चौकशीचे काम खर्चिक व दीर्घसूत्री. राजकीय पक्षाचे पुढारी भिवंडीला भेटी देत आहेत; पण त्यांच्या निवेदनावर त्या त्या पक्षांच्या विचारसरणीची छाप. विनोबांनी म्हटलेली तिसरी शक्ती अशा वेळी चटकन पुढे यायला हवी. ती शिल्लकच नसेल तर आपल्या लोकशाहीचे काही खरे नाही. रा. स्व. संघाने ही जबाबदारी का उचलू नये ? संघाने अनेक ठिकाणी आज मुसलमानांचाही विश्वास संपादन केलेला दिसतो. भिवंडी दंगलीमागे कुणाचा हात होता, कुठल्या शक्तींनी या दंगली घडवल्या याची संघाने, एखादी निःपक्षपाती, सर्वधर्मीय समिती नेमून चौकशी केली व या चौकशीचा अहवाल, जसाच्या तसा, लोकांसमोर ठेवला तर तिसरी शक्ती जागृत व्हायला, तिचा प्रभाव वाढायला मदतच होईल. अहमदाबाद–बडोदे येथील दंगलींच्या वेळी काही सर्वोदयी मंडळींनी अशी कामगिरी केली होती. इतरत्रही या कामगिरीचे अनुकरण व्हायला हवे.

दंगलीच्या मुळाशी असणारा मुस्लिम वर्चस्ववृत्तीचा स्तर उखडणे हा काही एक–दोन दिवसाचा, महिन्याचा कार्यक्रम नाही. ती एक दीर्घकाळ करावी लागणारी तपश्चर्या आणि झुंज आहे. यासाठी हिंदू संघटन हवे, बळकट राष्ट्रनिष्ठा हवी, आर्थिक–सामाजिक समतेचे, विकासाचे कार्यक्रम जलदगतीने पार पाडले जायला हवेत. हिंदू संघटनेचे अंतिम उद्दिष्ट राष्ट्रसंघटन हे हवे, भारत संघटन हे हवे. मुसलमानांनी ख्रिश्चनानीही या उद्दिष्टाशी जवळीक साधायला हवी. संघटित होत चाललेला हिंदू समाज यापुढे तरी सवते सुभे खपवून घेणार नाही ,हे त्यानीही ओळखायला हवे. आणि का घ्यावेत ? मागे झाले ते होऊन गेले. यापुढे तरी फाळणीवादाला, त्यामागील मनोवृत्तीला, या देशात मुळीच वाव मिळता उपयोगी नाही. □

Bangalore, May 28 : Mr. Vajpayee quoted a Muslim League leader of Kerala as having asserted that if some Sikhs could demand 'Khalistan' there was no reason why the larger Muslim population could not demand another Pakistan.

*–Times of India, May 29, 1984, page 9*

# आणखी एका पाकिस्तानची मागणी!

राजधानी दिल्ली

# धगधगलेल्या भट्टीमध्ये....

आगगाडीच्या इंजिनातल्या कोळशासारखा सध्या दिल्लीत उन्हाळा रसरसला आहे. दर वर्षीची ही गत. राजधानीतल्या ऋतूंना सौम्यपणा मानवतच नाही. उन्हाळ्यात हे शहर धगधगलेल्या भट्टीचा अवतार धारण करते, तर हिवाळ्यात अख्खे शहर म्हणजे गोठवून टाकणारा एक फ्रिज बनून जाते ! एप्रिलच्या मध्यावर उन्हाळ्याचे निखारे फुलायला सुरुवात होते आणि मे-जूनमध्ये भट्टी अगदी माजावर आलेल्या मादीसारखी ऐन भरात असते

हवामानखात्याची आकडेवारी बऱ्याच वेळा आपली फसगत करते. ' दिल्लीचे कमाल तपमान ४३° सें. आणि पुण्याचे ३९° किंवा चक्क ४०° म्हणजे फारसा फरक नाही; पुण्यापेक्षा थोडेसे जास्त गरम होत असेल इतकेच. ' असे पुणेरी शेरे मारणारे हे लक्षात घेत नाहीत की, पुण्यातले कमाल तपमान दुपारी १ ते ३ या दोन तासातच भडकते, तर दिल्ली सूर्योदयानतर थोड्याच वेळात जी भडकून उठते, ती सूर्यास्तानंतरसुद्धा हट्टीपणाने धुमसतच राहते.

सगळे घर तापलेले असते. घरातली प्रत्येक वस्तू गरम झालेली असते. चोवीस तास गरगरणारे पखे गारवा देऊ शकत नाहीत. त्यामुळे कूलर ही ' कम्फर्ट 'न उरता ' नेसेसिटी ' बनते. ज्या खोलीत कूलर नसेल तिथल्या खुर्चीवर बसणे म्हणजे तापल्या तव्यावर बसणे. भिंतीचा स्पर्श रात्रीदेखील उष्ण. फरशीविषयी तर बोलायलाच नको. गच्चीतल्या फरशीवर सध्याकाळी बादल्या भरभरून पाणी ओतले तर दहा मिनिटात फरशी वाळून कोरडी आणि तिची धग कमी झाली तरी गरमपणा कायमच.

तापणे-सतत अखंडपणे तापत राहणे हे इथल्या उन्हाळ्याचे एक महत्त्वाचे लक्षण. उन्हाळ्याला ' आतप ' का म्हणतात, ते इथला उन्हाळा बघितल्यावर कळते. मे-जूनच्या भक्क उन्हाळ्यात घाम येतच नाही. कारण हवा कोरडी, आर्द्रतेचे प्रमाण (राजधानी ना ! ) कमीच. त्यामुळे 'उन्हाळा' रंगात आला तरी ' उकाडा ' होत नाही; पण तापात असल्यासारखे शरीर तापत जाते. डोके भिरभिरू लागते. हवेत गरम वाऱ्याचे झोत भरकटत असतात. त्याला ' लू ' म्हणतात. अंगावर हे गरम हवेचे झोत धावून आले की अगातूनही तसेच झोत बाहेर पडत आहेत, असे वाटत राहते.

इथल्या लोकानी अर्थात हा उन्हाळा पचनी पाडलेला. लोखड मजबूत करण्याची एक विशिष्ट प्रक्रिया असते. त्यामध्ये लोखड एकदम खूप तापवतात आणि एकदम थड करतात. मला वाटते, लहानपणापासून धगधगीत उन्हाळा आणि गोठवणारा हिवाळा याचे पीरिऑडिक आघात सोसून-पेलून इथल्या माणसांची शरीरे लोखडासारखी टणक झालेली असतात. रणरणत्या उन्हात हिंडताना डोक्याला टोप्या घातलेली किंवा डोळ्यांना गॉगल्स लावलेली मंडळी बाहेरची आहेत, असे खुशाल समजावे. इथल्या माणसांना त्याची गरजच वाटत नाही. त्यातल्या त्यात गॉगल्स तर फक्त आंधळेच वापरताना दिसतात. ( जे दिल्लीत बसमध्ये, कॉलेजात, दुकानात, रस्त्यावर-सर्वत्र भेटतात) त्यामुळे आपण कधी गॉगल चढवलाच, तर बाकीचे लोक आपल्याकडे ' त्या ' दृष्टीने तर पहात नसतील ना, असे आपले उगीचच सारखे वाटत राहते.

उन्हाळ्याच्या तडाख्यातून सनस्ट्रोक होऊ न देता बचाव करून घ्यायचा असेल तर शरीर आतून थंड राखले पाहिजे, हा मत्र इथे सगळ्याच्या अंगवळणी पडून गेला आहे. रस्त्यामध्ये अंतराअंतरावर थंड पाण्याच्या (रेफ्रिजरेटेड कोल्ड वॉटर) गाड्या असतात. दहा पैसे टाकून ग्लासभर गार पाणी घ्यायचे. गाडीवाल्या छोकऱ्याला उसत नसते. गाडीभोवती तीन-चार लोकाचा घोळका सतत असतोच. पपाने सरासर ग्लास भरून देत गाडीवाला दहा पैसे गल्ल्यात सरकवत असतो. काही गाडीवाल्याकडे लिंबेही ठेवलेली असतात. ५० पैशांत ' लिंबूपाणी 'चा ग्लास मिळण्याची सोय असते. उन्हात हिंडून तहानेने कासावीस होणे, घरी गेल्यावर ढसाढसा पाणी ढोसणे दिल्लीकर मंडळीच्या स्वभावात नाही. तुम्ही रिक्षात बसून चाललेले असलात तरी रिक्षावाला पाण्याच्या गाडीपाशी रिक्षा थाबवेल. आपण पाणी घेताना तुम्हालाही पाणी हवे का, याची आपुलकीने चौकशी करील. अक्षरशः पाण्याइतकीच सढळपणाने शीतपेयेही वापरात असतात. जनरल स्टोअर्स, बेकरीज, स्टेशनरीची दुकाने, पानवाले... अगदी कोणीही दुकानदार शीतपेयाचा स्टॉक ठेवतोच. छोट्याशा फ्रीजबॉक्समध्ये बाटल्या व्यवस्थित थडगार ठेवलेल्या लिम्का, कॅपा, थ्रिल, थम्सअप, डबल सेव्हन, स्प्रिंट, कोलालाइट, ड्रिप, टिंगलर-सगळीच शीतपेये दणक्यात खपतात. दरही वाजवी. एक रुपया साठ पैशात बाटली. काही दुकानदार १-७५ घेतात. दिवसाकाठी दोन-तीन तरी शीतपेयाच्या बाटल्या रिचवणे अगदी सामान्य गोष्ट म्हणायची. घराघरांमध्ये रूहअफजा हे सरबत असणारच. दिल्लीच्याच हमदर्द दवाखान्याने बनवलेल्या या सरबतात शीतगुणकारी अनेक औषधी द्रव्याचा सुमेळ साधलेला आहे. दिल्लीकराचे हे तुफान लोकप्रिय पेय आहे. उन्हाळा आणि आइस्क्रीम यांचे तर अतूट नाते असते. (तसे दिल्लीतले लोक वर्षभर आइस्क्रीम आवडीने खातात. ऐन हिवाळ्यात अंगात भरपूर गरम कपडे घालून कडाक्याच्या थडीत मिटक्या मारीत आइस्क्रीम खाणारे ' वीर ' पाहिले की बाहेरच्यांना फार अचबा वाटतो; पण थंडीत आइस्क्रीम खाण्यात वेगळीच गंमत येते, बाहेरचे तपमान आणि आइस्क्रीमचे तपमान यात अतर नसल्यामुळे त्याचा वेगळा गारपणा जाणवतच नाही, असे दिल्लीकर म्हणतात ! ) अर्थात कावरे, गणू शिंदे यासारखी 'कोल्ड्रिंक हाउस' सिस्टिम येथे नाही. क्वालिटी आणि गे-लॉर्ड हे दोन आइस्क्रीमचे प्रमुख ब्रँड. त्याचे आइस्क्रीम फिरत्या गाडीवर खाल्ले, किंवा स्टॉलपाशी उभे राहून खाल्ले किंवा पार्लरमध्ये जाऊन खाल्ले, तरी चवीत फरक पडत नाही.

एकंदरीत लाइफ एन्जॉय करण्याची वृत्ती अंगात मुरलेली असल्याने दिल्लीकर उन्हाळाही मनसोक्त एजॉय करत असतात. घराघरातून कूलर लावलेले, चोवीस तास पखे चालू असलेले आणि शीतपेयाची रेलचेल

यात दिवस गुजरतो आणि रात्री घराबाहेर मोकळ्या हवेत, बाहेर उघड्यावर झोपण्याचा उत्साह दिल्लीकर मंडळींना फारच. प्रत्येक घराच्या सर्वांत वरच्या मजल्यावर प्रशस्त गच्ची असते. तिला 'बरसाती' म्हणतात. बरसातीत राहणारी माणसे गच्चीत उघड्यावर झोपतातच; पण खालच्या मजल्यावरचे लोकही झोपायला वर खुल्या गच्चीत जातात. ज्या बिचाऱ्यांना वर गच्चीत जाण्याची सोय नसते, ते खुशाल गल्लीत रस्त्यावर कॉट्स पसरतात आणि उघड्यावर ताणून देतात. त्यात त्यांना कसलाही संकोच वाटत नाही. छोट्या–छोट्या गल्लीबोळांना एखाद्या हॉस्पिटलच्या वॉर्डचे स्वरूप येते. इथे हलक्या वजनाच्या फोल्डिंग कॉट्सही सुरेख मिळतात. नायलॉनच्या पट्ट्यांनी विणलेल्या. एकटा माणूस फट्कन आपली कॉट पसरू शकतो आणि घडी करून ठेवू शकतो. वाऱ्याच्या मदमंद झुळकीचा आस्वाद घेत आकाशातल्या चांदण्या पाहतापाहता हळुवारपणे मस्त झोप लागते उघड्यावर. पहाटे वाऱ्याच्या झुळका जरा जादाच गारपणा दाखवायला लागल्या की, पायाखालचे पांघरूण वर ओढून घ्यायचे आणि पुन्हा झोपेच्या कुशीत गुरगुटायचे; पण हे सुख फार वेळ नाही लुटता येत. साडेपाचलाच उजाडते आणि पावणेसहालाच चक्क सूर्योदय होतो. साडेसहापर्यंत सूर्य चांगलाच वर येतो आणि त्याची किरणे तापू लागतात.

दिल्लीतले ट्रॅफिक–आयलंडस् हा एक विशेष सौंदर्यप्रकार आहे. खूप प्रशस्त गोल अशा या आयलंडस्मध्ये सुंदर बाग केलेली असते. छानशी हिरवळ, कडेने सुरेख झाडे, बसायला दोन–तीन बाकही टाकलेले. सूर्यास्त होण्यापूर्वीच ही आयलंडस् छोट्या–मोठ्या मुलांनी गजबजून जातात. त्यांचे खेळ, किलबिलाट यांनी उन्हाळ्याची मरगळ कुठल्याकुठे भिरकावली जाते. अंधार पडल्यावर तरुण जोडपी, प्रौढ माणसे, शेजारपाजारची कुटुंबे येऊन दाखल होतात. रात्री साडेदहा–अकरापर्यंत लोक हवा खात गप्पा मारत ट्रॅफिक आयलंडस्मध्ये रमतात.

एकीकडून उन्हाळा एंजॉय करण्याची ही धडपड चाललेली असतानाच मधूनच 'डेसू' (Delhi Electric Supply Unit–D. E S. U.) मात्र लोकांचा अंत पाहत असते. पॉवर ब्रेकडाउन हा उन्हाळ्यातला नेहमीचा प्रकार अर्ध्या तासापासून सहा–सहा तासापर्यंत एखाद्या विभागातली वीज अचानक जाऊ शकते...जातेच! मग मात्र त्या विभागातल्या जनताजनार्दनाचे हाल विचारण्याची सोय नसते. गरम हवेच्या झळा (लू) चालूच आहेत, पखे बंद, फ्रीज बंद, कूलर बंद,... जीव नकोसा होऊन जातो!

उन्हाळ्यातला सगळ्यात भयंकर प्रकार म्हणजे 'आंधी' – धुळीची वादळे. उन्हाने तापून हलकी झालेली हवा धुळीचे भोवरे घेऊन वर उसळते आणि हवेच्या दाबातील फरकामुळे वेड्यासारखी सैरावैरा धावू लागते. क्षितिजाकडे लाल लाल धूळ कोंदाटलेली दिसली की, आंधीची चाहूल लागते आणि 'आंधी आली, आंधी आली' म्हणत दारेखिडक्या लावेपर्यंत ती घोंघावत येऊन पोचतेदेखील. दोन मिनिटांपासून दहा मिनिटांपर्यंत हे थैमान टिकते आणि दारे–खिडक्या कितीही व्यवस्थित लावून घेतलेल्या असल्या तरी घरातील प्रत्येक वस्तूवर धुळीची चादर पसरलेली असते. एखादे दार चुकून उघडे राहिले तर मग बघायलाच नको.

असा हा मस्तवाल उन्हाळा सध्या दिल्लीत रंगात आला आहे. दिल्लीला तापवत आहे. त्याच्या ताप–क्रीडेला सुरुवात झाल्याबरोबर गुलमोहराच्या झाडांनी लाल–केशरी फुलांनी अंगभर सजून त्याचे स्वागत केले. आता अमलतास फुलारले आहेत. वाढत्या उष्णतेची नशा आपल्या घोसदार फुलांच्या दिमाखदार पिवळ्या पाकळ्यांचा वर्षाव उधळून ते व्यक्त करीत आहेत. मधूनच एखादी आंधी भिरभिरून जात आहे. उन्मत्त असला तरी या उन्हाळ्यावर दिल्लीकर खूष आहेत. अजून अंगातून पाझरणाऱ्या घामाची चिकचिक आणि त्यातून येणारा वैताग नाही. ते नंतर जुलैमध्ये भोगायचेच आहे.

–निशिकांत मिरजकर

---

सणकीत

# पुढे काय ?

हा प्रश्न जोपर्यंत कर्तव्यभावनेतून आयुष्याला
सामोरा येत नव्हता तोपर्यंतच आयुष्य
मानवसोडून निसर्गातल्या इतर चराचरसृष्टी, प्राण्यासारखं,
पक्ष्यासारखं रंगीत, नुसत जगणं, मुक्त फिरणं, बागडणं इ. इ.
सारखं आणि उत्कंठावर्धक वगैरे होत

आठवी–नववीचं वर्ष असेल
वर्तमानपत्रातील मॅट्रिक–पुढे काय ? ही
जाहिरात वाचनात आली. पाठोपाठ घरच्यांचे सल्ले
उत्कंठावर्धक मेंदूवर आदळले. सभोवतालातून पुढे काय ?
हा प्रश्न संपूर्ण शरीराला दोरीनं बांधावं तसा बांधत गेला
आणि चेहऱ्यावर बहुधा पहिली सुरकुती पडली असावी !

–नंतर मग आयुष्य रंगीबेरंगी होतं तरी
प्रत्येक रंगाची किंमत काय हेही कळायला लागल्यानं
हरेक रंग तोलून–मापून घ्यायची सवय लागली.
संपूर्ण अंगावर एक ग्रीड आखून घेतल्यासारखं,
हात, पाय, मन सारं अवघडल्यासारखं, अंशात, कोनात
हालचाली आणि विचार करायला लागलं. स्वत:च्या
आयुष्याचे असे सैनिकीकरण केल्यासारखे करून घेतलेले
निर्णय, त्यालाच सुसंस्कृत मानवसमाजाच्या प्रगत युगातील
आयुष्यासंबंधातला घनघोर निर्णय म्हणतात.
समजदारी म्हणतात. हुशारी म्हणतात. दूरदृष्टी म्हणतात.
परंतु एवढ्यानेच 'पुढे काय ?'
या प्रश्नाचा मृत्यू टळत नाही.

या भविष्यकालीन प्रश्नानं आपल्या वर्तमानाभोवती
एक प्रचंड अजगरी वेटोळं आवळलेलं असतं.
वर्तमानात यथेच्छ डुंबायला लागलं की हे वेटोळं
अधिक जवळ येतं आणि त्याच्या नुस्त्या दबक्या चालीनं
सुद्धा वर्तमानाचा कोळसा व्हायला वेळ लागत नाही.
तर हे प्रचंड वेटोळं घेऊन आयुष्यभर फिरणं
म्हणजे काळपट निळ्या शंकरासारखा फिल येणं किंवा
बेंबीतून कमळ आलेल्या विष्णूसारखं 'ऑड' वाटलं
तर त्यात काय नवल ?...असो. जसा जसा त्याचा विचार
करावा तसा तसा आयुष्यातला वर्तमानकाळ कमी होत
जातो; पण लहानपणी अगदी बारशाला किंवा पहिल्या

पृष्ठ ३२ वर

# घटनेचा ढळलेला तोल कसा सावरता येईल?

प्रा. भूषणकुमार जोरगुलवार (अहमदपूर)

देशात सध्या केंद्र–राज्यसबंधाविषयीच्या चर्चेला सकारण धार चढलेली आहे. विविध समस्यामुळे देशातील तपमान वाढले आहे. पंजाब, आसाम, काश्मीर, मिझोराम, नागभूमी, मेघालय, कर्नाटक, आध्र, तामिळनाडू या राज्यातील ताण अधिक दृश्यमान झाला आहे. याव्यतिरिक्त एरवी सर्व राज्यांत अधून-मधून या प्रश्नाशी सबधित असे संघर्ष उपस्थित होत असतात. भारतासारख्या खंडप्राय राष्ट्रामध्ये सघराज्यस्वरूपाची घटना आणि संरचना असावी हे स्वाभाविकच असले तरी हे सघराज्य विनाकुरकुर चालणाऱ्या वंगणदार चाकाप्रमाणे चालत राहावे ही अपेक्षा भाबडेपणाची ठरेल. संघराज्यामध्ये नेहमीच दुहेरी व्यक्तिमत्त्व व्यक्तिमात्राला निर्माण होत असते. 'मी कोण आहे?' या प्रश्नात 'मी भारतीय आहे' आणि 'मी प्रांतीय आहे' अशी दोन उत्तरे एकाच वेळी संभवतात आणि ही उत्तरे अर्थपूर्णही असतात. व्यक्तीप्रमाणेच समाजाला किंवा प्रदेशालाही दुहेरी निष्ठा असतातच. या निष्ठा जर समजसपणे विवेकपूर्ण नांदू शकल्या तरच ठीक आहे; पण अनेक प्रसगी अनेक कारणांमुळे त्यात संघर्ष निर्माण होतो. त्याची परिणती पुष्कळ वेळा केंद्र-राज्ये संबंधात ताणतणाव निर्माण होण्यात होते. ही गोष्ट केवळ आपल्याच देशात घडते असे नाही, तर जगात ज्या ज्या देशामध्ये सघराज्यात्मक शासनपद्धती अस्तित्वात आहे त्या त्या देशाना या समस्यांना तोंड द्यावे लागलेले आहे आणि आजही तोंड द्यावे लागत आहे.

## घटनात्मक तरतुदी

भारतीय घटनेने संघराज्यात्मक शासनपद्धतीचा अवलंब केलेला असला तरी सबंध घटनेत 'संघराज्य' या शब्दाचा वापर केलेला नाही. 'संघराज्य' या शब्दाऐवजी 'राज्याचा संघ' (Union of states) असा शब्दप्रयोग करण्यात आलेला आहे. घटनेच्या अगदी पहिल्या कलमातच असे म्हटले आहे की, 'India that is Bharat shall be an union of states'

भारताच्या घटनापरिषदेत भारताला 'सघराज्य' म्हणावे का 'राज्याचा सघ' यावर बरीच चर्चा झाली. मसुदासमितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी Federation याऐवजी Union असा शब्द वापरण्यामागे प्रामुख्याने दोन कारणे सांगितली. एक म्हणजे भारतीय शासनव्यवस्थेचे स्वरूप हे जरी सघराज्यात्मक असले तरी सघराज्याची निर्मिती, अमेरिकन सघराज्याप्रमाणे, येथील घटकराज्यानी परस्परात करार करून निर्माण केलेली नाही, असा अर्थ Union हा शब्द वापरल्याने होतो. दुसरे म्हणजे या शब्दामुळे घटकराज्यांना सघराज्यातून फुटून निघण्याचा अधिकार प्राप्त होत नाही हेही पण स्पष्ट होते. या दोन कारणांसाठी Federation ऐवजी Union हा शब्द वापरण्यात आलेला आहे.

तसे भारतीय संघराज्याचे स्वरूप पहाता बहुतेक सत्ता केंद्रसरकारच्या हातामध्ये एकवटलेली आहे, सघराज्यामध्ये केंद्रसरकार आणि घटकराज्यांतील सरकार अशी शासनाची दुहेरी यंत्रणा असते. त्याच्यात घटनात्मक तरतुदीनुसार सत्ता वापरण्याच्या दृष्टीने विषयांची वाटणी झालेली असते. या वाटणीनुसार केंद्रसरकार आणि घटकसरकार आपापल्या क्षेत्रात अधिकारांचा वापर करीत असतात. अधिकारांची ही जी विभागणी आहे ती दोन पद्धतीची आहे पहिली म्हणजे अमेरिकन संघराज्यातील पद्धतीप्रमाणे–यात फक्त केंद्रसरकारच्याच अधिकारांचा स्पष्टपणे उल्लेख केलेला असतो व बाकीचे अधिकार, त्याचा स्पष्टपणे उल्लेख न करता, घटकराज्यांना दिलेले असतात. दुसरी पद्धत कॅनडामधील सघराज्याप्रमाणे. येथे केंद्र व घटकराज्यांच्या अधिकारांचा स्पष्टपणे उल्लेख केलेला असतो. भारताने या कॅनडामधील पद्धतीचा अवलंब केलेला आहे. याप्रमाणे आपल्या घटनात्मक तरतुदीनुसार केंद्रसरकारकडे एकदर ९७ विषयासबंधीचे अधिकार सोपविलेले आहेत. घटकराज्यांकडे एकंदर ६६ विषयांसबंधीचे अधिकार सोपविलेले आहेत सामायिक यादीमध्ये ४७ विषय समाविष्ट केलेले असून या विषयासंबधी कायदे करण्याचा अधिकार दोन्ही सरकारांना दिलेले आहेत. आणि राहिलेले शेष अधिकार हे परत केंद्रसरकारच्या ताब्यात दिले आहेत १९७६ साली केलेल्या ४२ व्या घटनादुरुस्तीप्रमाणे राज्यसूचीतील विषयांची संख्या ६६ वरून ६२ करण्यात आलेली आहे तर सामाजिक सूचीतील सख्या ४७ वरून ५२ करण्यात आलेली आहे. राज्यसूचीतील चार विषय व एक नवीन विषय असे पाच विषय सामायिक यादीत समाविष्ट केले आहेत.

## केंद्राला झुकते माप

सामान्यत: संघराज्यात्मक शासनव्यवस्थेमध्ये घटकराज्याची स्वायत्तता अबाधित राखली जाते आणि राज्यसरकाराचा दर्जा आपापल्या क्षेत्रात समानरीत्या प्रस्थापित केला जातो. मात्र भारतीय संघराज्यातील घटकराज्याचा दर्जा केंद्रसरकारपुढे काहीसा गौण सिद्ध झालेला आहे. कारण घटनात्मक तरतुदीनुसारच घटनाकारानी घटकराज्यांना हेतुपुरस्सररीत्या दुबळे ठेवले आहे. अधिकाराची वाटणी करताना जाणीवपूर्वक केंद्राला झुकते माप दिलेले आहे.

केंद्र व घटकराज्यातील अधिकारांची विभागणी व त्याचे स्वरूप पहाता असे दिसून येते की, येथे फार मोठ्या प्रमाणात सत्तेचे केंद्रीकरण करण्यात आलेले आहे. उदा. विषयांच्या संख्येच्या दृष्टीने

विचार केल्यास असे दिसून येते की, केंद्राला राज्यांपेक्षा जास्त विषय उपलब्ध करून दिलेले आहेत. त्याचबरोबर केंद्रसूचीतील व घटकसूचीतील विषयाच्या दर्जामध्येसुद्धा खूपच फरक आहे. घटनेने राज्याना दिलेले विषयसुद्धा सुरक्षित आहेत असे दिसत नाही. कलम २४९ चा वापर झाल्यास केंद्रसरकार राज्याचे एक किंवा एकापेक्षा जास्त विषय स्वत.कडे काढून घेऊ शकते. सामायिक यादीतील विषयांसंबंधी जरी केन्द्र व घटकराज्यांना कायदे करण्याचा अधिकार असला तरी एखाद्या विषयासंबंधी केन्द्र व घटकराज्य दोहोंनीही कायदे केले आणि हे कायदे परस्पर विरोधी स्वरूपाचे असतील तर केन्द्राचे कायदे अस्तित्वात राहातात व घटकराज्याचे कायदे रद्द केले जातात. याचाच अर्थ असा की, सामायिक यादी ही एका अर्थाने केंद्राचे राखीव कुरणच बनले आहे. घटकराज्याना निर्धास्तपणे सामायिक यादीतील विषयांवर कायदे करण्याचे स्वातंत्र्य दिसत नाही. शिवाय शेष अधिकारांची प्राप्ती केंद्रसरकारलाच आहे.

अमेरिकन संघराज्याप्रमाणे भारतीय संघराज्यातील घटकराज्यांना स्वतंत्र राज्यघटना बाळगण्याचा अधिकार नाही तर त्याच्या शासनासंबंधीच्या तरतुदी केंद्रीय घटनेमध्येच केलेल्या आहेत. त्यामुळे येथील घटकराज्याना नेहमीच केंद्रीय घटनेनुसार वागावे लागते. येथील घटकराज्यांना घटनेत दुरुस्ती करण्याचा किंवा दुरुस्ती सुचविण्याचा अधिकार नाही. घटनादुरुस्ती ही संपूर्णपणे केंद्रसरकारच्या अधिकारातली बाब आहे. घटनेतील काही विशिष्ट कलमांमध्ये केंद्राने दुरुस्ती केल्यास मात्र तिच्या अंमलबजावणीसाठी देशातील एकूण घटकराज्यांपैकी निम्म्या घटकराज्यांची संमती आवश्यक आहे.

भारतातील घटक राज्याना त्याच्या प्रादेशिक अखंडत्वाची कोणतीही हमी दिलेली नाही. भारतीय ससद कायदा करून घटकराज्याच्या सीमामध्ये बदल करू शकते. एखाद्या राज्याचे विभाजन करून संसद नवीन घटकराज्याची निर्मितीसुद्धा करू शकते. एवढेच नव्हे तर एखादे राज्य पूर्णपणे नाहीसे करून त्यातील प्रदेश आजूबाजूच्या राज्यांमध्ये वाटून देण्याचे संसदेने ठरविल्यास त्याविरुद्ध कोणालाच कायदेशीर तक्रार करता येत नाही.

भारताचा राष्ट्रपती घटकराज्याच्या प्रमुखाची म्हणजे राज्यपालाची नेमणूक करीत असताना सबधित घटकराज्यातील जनता, विधिमंडळ किंवा मत्रिमंडळ यापैकी कोणाशीच सल्लामसलत करीत नाही. त्यामुळे राज्यपाल हा केंद्राचा प्रतिनिधी बनलेला आहे. त्याच्या कामकाजाची पद्धतसुद्धा घटकराज्याच्या स्वायत्ततेचे मूल्य कमी करणारीच आहे. कारण राज्यपालाला स्वविवेकाधीन करावयाची कामे पार पाडताना मुख्यमंत्री किंवा मत्रिमंडळाचा सल्ला घ्यायची गरज नाही. शिवाय कोणत्या प्रकारचे कार्य स्वविवेकबुद्धीने करायचे हे सुद्धा राज्यपालाला स्वविवेकबुद्धीनेच ठरवायचे असते. राज्यपालाने या स्वविवेकबुद्धीचा वापर कमीत कमी वेळा करावयास पाहिजे असे जरी मान्य केले तरी त्यामुळे घटकराज्याच्या स्वतंत्र अस्तित्वाची जाणीव यामुळे मंदावते.

याव्यतिरिक्त घटनेतील कलम ३५६ ची तरतूद म्हणजे घटकराज्यांचे अस्तित्वच संपुष्टात आणण्याचे केंद्राचे अधिकृत मार्ग होत. या कलमाचा वापर करून केंद्रसरकार कोणत्याही घटकराज्यात राष्ट्रपति-राजवट लागू करू शकते. ज्यामुळे घटकराज्यातील संपूर्ण सत्ता केंद्रसरकारच्या हातात एकवटते.

## स्वातंत्र्योत्तर परिस्थिती

एकंदरीत हा सर्व तपशील पहाता एक गोष्ट आपल्या नजरेत येते ती म्हणजे भारतीय संघराज्याचे स्वरूपच मुळात केंद्रीकरणात्मक आहे. घटनाकारांनी दीर्घ विचारांती जाणीवपूर्वक केंद्रसरकार सामर्थ्यशाली व घटकराज्ये दुबळी ठेवलेली आहेत.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतात राज्यकारभारविषयक अनेक समस्या निर्माण झाल्या. सत्तांतरातील उलथापालथ, फाळणीमुळे उध्वस्त झालेले जीवन आणि देशभर निर्माण झालेला हिंदु-मुस्लिम तणाव, यातच झालेली गांधीजीची भीषण हत्या, अन्नधान्याची टंचाई आणि आर्थिक क्षेत्रातील बिकट समस्या या सर्वांमुळे देशाचे विघटन टाळण्यासाठी मजबूत, शक्तिशाली व प्रभावी केंद्रसत्ता आवश्यक होते. देशातील वरील समस्येपेक्षाही कठीण समस्या म्हणजे नव्यानेच देशात विलीन झालेल्या नवीन संस्थानांची. या संस्थानी मुलखांचे केवळ राजकीय सामिलीकरण न होता खऱ्या अर्थाने भारताच्या अन्य भागाबरोबर ही संस्थाने एकरूप होणे आवश्यक होते.

या पार्श्वभूमीवर घटनासमितीचे काम चालू असताना घटनाकाराना याची जाणीव होती की, राष्ट्रीय एकात्मता साधताना, एकावयवी व एक केंद्रानुवर्ती सरकार येथे निर्माण करून चालणार नाही. त्याला विरोध होईल. सांस्कृतिक वैशिष्ट्यांची जाणीव असलेले गट आणि स्वायत्ततेतून विकास साधता येईल असे वाटणारे प्रांत यांनी एकात्म-शासनपद्धती स्वीकारली नसती. अशा वेळी संघराज्याची ठळक जाण असलेली परंतु त्याचबरोबर बळकट केंद्रसत्ता असलेली राज्यव्यवस्था येथे निर्माण करून स्थानिक जनतेची उपक्रमशीलता आणि राष्ट्रीय आकांक्षा याचा सुसंवाद साधणे आवश्यक होते. त्यामुळे घटनासमितीने जी घटना तयार केली तिचे स्वरूप संघराज्यात्मक आहे आणि त्याचबरोबर प्रबल केंद्रसत्ता असावी असा आग्रहही या घटनेत प्रकट झालेला आहे. भारत हे एकसंध आर्थिक जीवन असलेले एक राष्ट्र आहे ही जाणीव अशा तऱ्हेची घटना निर्माण करण्यामागे आहे आणि म्हणून या घटनेने केंद्रावर केवळ केंद्रसत्तेचे कार्य नीट चालावे एवढीच जबाबदारी टाकलेली नसून विशिष्ट परिस्थितीत राज्यामध्येही सुव्यवस्था राखण्याचे कार्य केंद्राकडेच सोपवलेले आहे. केंद्र व राज्ये यांच्या सबंधावरील मत बनविताना हा संपूर्ण सदर्भ लक्षात ठेवला पाहिजे.

आपल्या घटनेत फार मोठ्या प्रमाणात अशा तरतुदी आढळतात की, जेणेकरून घटकराज्यांची स्वायत्तता मर्यादित राहील. ही स्वायत्तता मर्यादित असावी याची कारणे वेळोवेळी डॉ. बाबासाहेब आबेडकरानी स्पष्टपणे मांडली आहेत. उदाहरणार्थ प्रांताची स्वायत्तता मर्यादित करण्याचे पहिले कारण हे की, काही प्रश्न प्रांतिक स्वरूपाचे वाटले तरी त्यांचा संदर्भ अखिल भारतीय असतो आणि या प्रश्नाबाबत प्रांतांना अधिकार असले तरी केंद्राच्या अखत्यारीतून ते विषय अजिबात काढून टाकणे इष्ट ठरणार नाही. म्हणून या बाबतीत प्रांतिक स्वायत्ततेचा संकोच करूनही केंद्राला अधिकार द्यावे लागतात. प्रांतिक स्वायत्तता मर्यादित करण्याचे आणखी एक

कारण म्हणजे अल्पसंख्याक व दलितवर्गीय यांच्या हक्कांचे व हितसंबधाचे रक्षण नीट व्हावे यासाठी प्रांतिक स्वायत्ततेचे नियंत्रण करणे आवश्यक आहे.

१९४८ साली घटनासमितीसमोर केंद्रसरकार अधिक बलवान का असले पाहिजे यासंबंधी डॉ. आंबेडकरानी मांडलेले विचार त्यांच्या दूरदृष्टीपणाचे प्रतीक होत. ' ...... केंद्राचे अधिकार कमी करण्याचा, काही अधिकार नाकारण्याचा कितीही प्रयत्न केला तरी केंद्रसत्ता बलवान होण्याची प्रक्रिया थोपविणे शक्य होणार नाही, आधुनिक जगाची जी अवस्था आहे तिच्यामुळे सत्तेचे केंद्रीकरण होणे अपरिहार्यच आहे. अमेरिकेतील घटनेने तेथील फेडरल गव्हर्नमेंटला मर्यादित अधिकार दिलेले असले तरी प्रत्यक्षात त्या फेडरल सरकारच्या अधिकाराची व्याप्ती खूपच वाढली असून तेथील राज्यसरकारांना त्याने झाकाळून टाकले आहे. हे मुख्यत: आधुनिक काळातील विज्ञानाची वाढ, औद्योगीकरण आणि तदनुषगाने निर्माण झालेल्या परिस्थितीतून घडले आहे- हीच परिस्थिती भारतातही निर्माण होईल आणि काही केले तरी केंद्रशासन बलवान झाल्याशिवाय राहाणार नाही. ही गोष्ट टाळणे शक्य नाही. मात्र दुसऱ्या बाजूस केंद्रसरकार अधिकाधिक बलवान करण्याच्या प्रवृत्तीला आळा घातला पाहिजे. पचेल तितकाच घास घेणे केंद्रसरकारला युक्त ठरेल. केंद्रसत्तेची ताकद आणि तिचे वजन यात सारखेपणा असला पाहिजे. केंद्रसरकार अधिकाधिक बलवान करण्याचा हव्यास केला तर ते स्वतःच्याच वजनाने कोसळेल !' ३५ वर्षांपूर्वी आंबेडकरानी जे भाकित केले ते आज वस्तुस्थितीत रूपांतरित झाले आहे. केंद्रसरकार सामर्थ्यशाली बनण्याची प्रक्रिया थोपवता आली नाही; पण त्यांनी दिलेला इषाराही लक्षात घेण्याची वेळ आली आहे, याचाही गंभीरपणे विचार होणे आवश्यक आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात देशात हळूहळू स्वातंत्र्य स्थिर झाले. नवे नेतृत्व निर्माण होऊ लागले. केंद्रस्थानी व राज्यांतून भिन्नभिन्न पक्षाची सरकारे निवडून येऊ लागली व त्यातून घटनेतील केंद्रराज्यसंबंधाचा पुनर्विचार व्हावयास हवा अशी हवा तयार होऊ लागली. १९६७ पूर्वी बहुतेक राज्यांतून कॉंग्रेसची सत्ता होती; पण ही स्थिती त्यानंतर बदलली व केंद्र-राज्य-संबंधाविषयी अधिक चर्चा होऊ लागली. काहीसे संघर्षाचे प्रसंगही निर्माण होऊ लागले व गेल्या मार्चमध्ये दक्षिणेकडील चार राज्यांचे मुख्य मंत्री या प्रश्नावर-विचार करण्यासाठी एकत्र जमले. तेव्हा केंद्रसत्तेने याची दखल घेऊन घाईघाईने या प्रश्नांचा विचार करण्यासाठी एक सदस्य आयोग—सरकारिया आयोग-नियुक्त केल्याची घोषणा केली.

## केंद्र-राज्य-संबंधाबाबत वादाची कारणे

सध्या केंद्र-राज्य संबंधात वादपूर्ण मुद्दे म्हणजे केंद्राकडे जमा होणारा पैसा व त्याचे राज्यनिहाय वाटप, करवसुलीचे अधिकार, राज्यांतर्गत नियोजन, कायदे करण्याचे अधिकार, राज्यपालाची नियुक्ती व त्याचे अधिकार, आणीबाणीसंबंधी तरतूद, विधानसभा बरखास्त करून राष्ट्रपतीची राजवट राज्यात लागू करणे, केंद्रीय राखीव पोलीसदलाची स्थापना वगैरे. या मुद्द्यांसबधी राज्ये व केंद्रसरकार यामध्ये अगदी सुरुवातीपासून कुरबुरी चालू आहेत.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर वीस वर्षांत जी धोरणे आखण्यात आली त्यांच्यामधून ऐक्यावरच भर देण्यात आला आणि विविधतेचा विसर पडला. केंद्रानेच सर्व अधिकार वापरल्याने राष्ट्राची घडण केंद्रातूनच होत आहे असे दृश्य निर्माण झाले आणि याचा परिणाम असा झाला की, घटनेतील समतोल बिघडून तो केंद्राच्या दिशेने झुकला. केंद्र–राज्य-संबंधाच्या स्वरूपात काहीसा विकृतपणा निर्माण झाला. उदा. .– राज्यांच्या यादीतील विषयांमध्ये उद्योग, व्यापार आणि वस्तूंचे उत्पादन, पुरवठा व वाटप या विषयाचा समावेश आहे. केंद्रसरकारच्या यादीमध्ये फक्त राष्ट्राच्या संरक्षणासाठी अगर युद्ध चालविण्यासाठी जे उद्योग आवश्यक आहेत असे ससदेने कायदा करून जाहीर केलेले असेल आणि लोकहिताच्या दृष्टीने जे उद्योग केंद्राकडे राहाणे आवश्यक आहे असे संसदेने कायदा करून जाहीर केलेले असेल अशाच उद्योगांचा समावेश केलेला होता. यावरून हे स्पष्ट होते की, औद्योगिक क्षेत्रातील अगदी छोटा विभाग केंद्राकडे राहावा असे ठरले होते; परतु आज असे आढळून येते की, उत्पादन–किंमतीचा विचार करताना प्रमुख उद्योगांपैकी ९३% उद्योग केंद्राने आपल्या ताब्यात घेतलेले आहेत आणि अशा उद्योगामध्ये पादत्राणे, सौंदर्यप्रसाधने, साबण, दाढी करण्याची पाती, कागद, डिंक, काडीपेट्या, घरगुती वापराची विजेची उपकरणे, धागे, प्रेशरकुकर, स्टीलफर्निचर, दुचाकी, टी. व्ही. सेट्स, बॅटरीसेल, शेतकी अवजारे वगैरे उद्योगांचा समावेश आहे. एवढ्या प्रचड प्रमाणात केंद्राने या विषयावर अतिक्रमण केले आहे की, वादातीतपणे या ठिकाणी केंद्राने घटनात्मक तरतुदीचे उल्लघन केलेले आहे.

त्याचप्रमाणे केंद्र आणि राज्ये यांच्यामध्ये महसुली उत्पन्नाचे ज्या अन्याय्य रीतीने वाटप केले जाते त्यामुळे सघराज्यात्मक चौकटीस आणखी एक तडा गेलेला आहे. राष्ट्रीय महसुली उत्पन्नांपैकी केवळ लहानसा वाटा राज्याना दिला जातो आणि हे वाटपही नॅशनल डेव्हलपमेंट कौन्सिलने आणि फायनान्स कमिशनने मान्य केलेल्या सूत्राच्या आधारे केले जात नाही. कर देणाऱ्या जनतेच्या पैशाचा वाटा राष्ट्रीय नियोजन मंडळाच्या दडपणाखाली केंद्र-सरकार घेऊन टाकते. वस्तुत: राष्ट्रीय नियोजन मडळाचे अस्तित्वच सघराज्यात्मक घटनेशी विसगत आहे. शिवाय केंद्रीय मन्त्रिमडळ व नियोजनमडळ यांना खास अनुदान देण्याचे अधिकार आहेत आणि या अधिकाराचा दुरुपयोग केला जातो. अनवधानाने खुद्द पतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यानीही कबुली दिलेली आहे. नागालॅंडमध्ये कोहिमा येथे राज्यसभेत बोलताना त्या म्हणाल्या, 'केंद्रसरकारला अनुकूल असणाऱ्या राज्यांकडे केंद्राचे इतर राज्यांच्या आधी लक्ष जावे अशी अपेक्षा करणे हा या राज्यांचा हक्कच आहे !'

केंद्रसरकार आणि घटकराज्ये यामध्ये उत्पन्नाच्या साधनासबधीचा वाद आणि नियोजनमंडळामार्फत ठरविल्या जाणाऱ्या वार्षिक व पंचवार्षिक योजनाचा वाद नेहमीच धुमसत असतो. कित्येकदा आर्थिक निकषापेक्षा राजकीय निकष नजरेसमोर ठेवूनच एकतर्फी निर्णय होतात. चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या वेळी प. बंगालमध्ये मार्क्सिस्ट पक्षाच्या हातात सत्ता होती, त्या वेळी

सबंध देश व राज्याच्या पंचवार्षिक योजना दुपटीपेक्षा मोठ्या ठरविल्या गेल्या. मात्र प. बंगालच्या योजनेचा आकार तिसऱ्या योजनेएवढाच ठेवला गेला. त्यातून मध्यवर्ती शासन आणि प. बंगालमध्ये फार मोठे संघर्षाचे वातावरण तयार झाले होते. पाचवी योजना बनविण्याच्या काळात ती चूक दुरुस्त करण्याचा प्रयत्न झाला नसता, तर त्या संघर्षाचे स्वरूप असह्य स्फोटातच व्यक्त झाले असते. यासाठीच ठरवून दिलेल्या निकषाचे पालन काटेकोरपणे व न्यायनिष्ठुरतेने करणे महत्त्वाचे ठरेल.

केंद्रसरकारकडे शिक्षण, शेती, उद्योग, कामगार आणि गृह यासाठी विशेष मंत्रालय असणे हे घटनाकारांच्या मूळ कल्पनांशी विसंगत व नियमांविरुद्ध आहे. १९६५ साली चंदाकमिटीने आकाशवाणी व दूरचित्रवाणी याचा विचार करून या दोन बाबींना बी. बी. सी. प्रमाणे स्वायत्तता द्यावी अशी शिफारस केली होती; परंतु तत्कालीन माहिती व प्रसारणखात्याच्या मंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांनी या शिफारशीच्या अंमलबजावणीबाबत स्पष्ट नकार दिला. याबाबतीत जनता सरकारचीही कृती फारशी निराळी नव्हती याचा परिणाम असा झाला आहे की, संबंधित मंत्री टेलिफोनवरून आकाशवाणी व दूरदर्शनचे नियंत्रण करतात. रात्री आठ ते दहा ही वेळ राष्ट्रीय कार्यक्रमासाठी राखून ठेवली जाते आणि त्यामुळे पंतप्रधान व त्यांचे सहकारी यांच्या विविध कार्यक्रमांचा अहवाल देशात नियमाने दिला जातो आणि राज्यामध्ये होणाऱ्या घटनांना फार थोडा वेळ मिळतो. याहीपेक्षा भीतिदायक बाबी भविष्यात होणाऱ्या आहेत. चित्रपटाच्या संदर्भात राष्ट्रीय धोरण ठरविण्यासाठी नेमलेल्या समितीने ९ मे १९८३ ला सादर केलेल्या अहवालात अशी शिफारस केली आहे की, चित्रपट हा राज्याच्या यादीतून काढून केंद्राच्या यादीत घालावा म्हणजेच केंद्राची केंद्रीकरणाची प्रवृत्ती अद्याप संपलेली नाहीच. या प्रवृत्तीला आळा घातला नाही तर ती वाढतच जाईल.

राज्यपाल हे राज्याचे प्रमुख असतात; परंतु राज्यपालांच्या समितीच्या अहवालाला डावलून प्रत्यक्षात राज्यपाल हे केंद्र सरकारचे हस्तक बनले आहेत. हे पद असामान्य कर्तृत्वाच्या स्त्री–पुरुषांना देण्याऐवजी अनेकदा ते अधिकारारूढ पक्षातील निवृत्त झालेल्या व ज्यांच्यासाठी काही तरी काम शोधणे आवश्यक आहे अशा राज्यपालांना दिले जाते.

निरनिराळ्या राज्यातील लोकनियुक्त विधिमंडळे अथवा सरकारे निलंबित किंवा बरखास्त करताना योग्य निकषाऐवजी केवळ राजकीय दृष्टिकोनातूनच ते निर्णय घेतले जातात. वास्तविक पहाता घटनेतील कलम ३५६ ची तरतूद यासाठी केली गेली की, जेव्हा एखाद्या घटकराज्यातील राज्यकारभार घटनेतील तरतुदीनुसार चालत नसेल तर तेथील सरकार बरखास्त करून केंद्राने शासन–कारभार पहावे; परंतु आतापर्यंत या कलमाचा वापर वरील उचित कारणासाठी क्वचितच करण्यात आला व बहुसंख्य वेळा पक्षपाती पद्धतीने जेव्हा केंद्रात काँग्रेसची सत्ता होती तेव्हा त्यांनी घटकराज्यातील बिगरकाँग्रेसी सरकारे पाडण्यासाठी ती वापरली. तसेच जनता पक्षाची सत्ता जेव्हा केंद्रात होती तेव्हा त्यांनी घटकराज्यातील बिगरजनता पक्षाची सरकारे पाडण्यासाठी ती वापरली. आतापर्यंत या कलमाचा वापर घटनेच्या अंमलबजावणीपासून सत्तरपेक्षा जास्त वेळा करण्यात आला व त्यापैकी चाळीस वेळा तर एकट्या इंदिरा गांधींच्या कारकीर्दीत करण्यात आला ! बहुसंख्य वेळा राजकीय उद्देशाच्या पूर्ततेसाठीच याचा वापर झाला. म्हणूनच राजमन्नारसमितीने सादर केलेल्या १९७१ च्या आपल्या अहवालात अशी शिफारस केली की, घटनेतील कलम ३५६ च वगळावे !

नोकरशाहीत वरिष्ठ जागावर असणाऱ्या अधिकाऱ्यांनी स्वातंत्र्योत्तर काळात जी भूमिका बजावली ती अतिसूक्ष्म आणि अत्यंत आशयपूर्ण अशी. आय. ए. एस. अधिकाऱ्यांचे जाळे आणि इतर नोकरवर्ग यांच्याद्वारा केंद्रसरकार राज्यावर नियंत्रण ठेवते. या आय. ए. एस. नी केंद्रसरकारचे राजकीय हत्यार म्हणून राज्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतःचा वापर करू दिला व त्याच्या मोबदल्यात स्वतःच्या भ्रष्टाचारास संपूर्ण संरक्षण मिळविले. त्यांची आता खात्रीच झाली आहे की, त्यांचे व्यक्तिगत हित करणे केंद्राच्या हाती आहे, राज्यांच्या नाही. केंद्रसरकारच्या गुप्त सूचना कार्यवाहीत आणून त्यांनी बुद्धिपुरस्सर आपल्या मुख्यमंत्र्यांचे अधिकारपंख छाटून टाकले.

हे सारे असे कसे घडले ? याचे मुख्य कारण म्हणजे केंद्रात बहुतेक राज्यात अनेक वर्षे एकाच पक्षाचे सरकार असल्यामुळे तो पक्षच राज्यांवर अंकुश ठेवीत असे. यामुळेच आपल्याकडे 'हायकमांड' हा शब्द रूढ झाला. लोकशाही राज्यपद्धतीत या शब्दास वास्तविक पहाता स्थान नाही. सैन्याच्या संदर्भातच तो वापरला जातो. हायकमांडच्या अस्तित्वामुळे राज्यामध्ये नव्याने नेमलेले मुख्यमंत्री आपण विधिमंडळात व विधिमंडळामार्फत मतदारांना जबाबदार आहोत हे विसरतात आणि मंत्रिमंडळातील मंत्र्यांची यादी संमत करून घेण्यासाठी दिल्लीला विमानाने खेपा घालीत असतात !

आतापर्यंत देशामध्ये ज्या ज्या वेळी केंद्रराज्यसंबंधाबाबतीत फेरविचारांची मागणी पुढे आली त्या त्या वेळी ही मागणी केंद्रस्थानी

मराठीतील एक सच्चे
आत्मचरित्र
हंसा वाडकर
सांगत्ये ऐका
चौथी आवृत्ती
मूल्य : १४ रुपये
राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ३०

*असलेल्या* पक्षाची सत्ता ज्या राज्यात नाही त्याच राज्यातून आली आहे. उदा. :– मद्रास राज्यात डी. एम. के. पक्षाने केलेली मागणी व त्यातून पुढे आलेली राजमन्नार योजना. आजसुद्धा अशा प्रकारची मागणी आंध्र, कर्नाटक, जम्मू-काश्मीर, पंजाब, बंगाल इत्यादी प्रांतांतूनच होते. आतापर्यंत या संदर्भात विजयवाडा, बंगलोर, श्रीनगर येथे बैठका झाल्या. बाकी केंद्रस्थानी असलेल्या पक्षाची सरकारे ज्या राज्यात आहेत ती राज्ये या बाबतीत उदासीन दिसण्याची कारणे म्हणजे त्यांनी हायकमांडची कल्पना मान्य केलेली आहे व केंद्राला रुचणार नाही अशी पावले टाकण्याची त्यांची तयारी नाही.

## ढळलेला तोल सावरता येईल का ?

शेवटी महत्त्वाचा प्रश्न उरतो तो हा की, संघराज्याची चौकट पुन्हा उभी करण्यासाठी घटनादुरुस्तीची आवश्यकता आहे का ? उचित अशा दुरुस्त्या घटनेत करण्यात काहीच वावगे नाही. शेवटी घटना ही आपल्या सोयीसाठी केलेली आहे. घटनेच्या सोयीसाठी आपण नाही; पण एकंदरीत वस्तुस्थिती लक्षात घेता घटनादुरुस्तीची आवश्यकता वाटत नाही. घटना नीट राबवण्याची प्रबळ इच्छाशक्तीची मात्र अतिशय आवश्यकता आहे. नव्या दिल्लीत निर्माण झालेल्या नव्या वर्गातील राजकारण्यानी राज्याचे जे अधिकार बळकावलेले आहेत ते परत केले, त्यांनी जर स्वतःची रास्त कर्तव्ये पार पाडून बाकीच्या गोष्टी राज्यांच्या अंतर्गत स्वायत्त कारभारासाठी सोपविल्या तर १९५० साली जी घटना अंमलात आणली त्या घटनेच्या चौकटीत राहूनच त्याना हे करता येईल.

केंद्र–राज्य-संबंधातील ढळलेला तोल सावरण्याच्या दृष्टीने विचार केल्यास काही मार्ग जरूर सुचविता येतील. उदा. :– नियोजनमंडळाचेही मत असे आहे की, सर्वांगीण विकास करीत असताना प्रादेशिक असमतोल दूर करणे आवश्यक आहे. यासाठी राज्याना द्यावयाची आर्थिक मदत ही कोणत्याही दडपणाखाली वा दबावाखाली दिली न जाता मागासलेल्या विभागांना जादा अनुदान देऊन विकासप्रक्रियेत त्याना इतराच्या बरोबर आणणे हीच न्याय्य कृती ठरेल.

आर्थिक बाबतीत घटनेने केलेल्या तरतुदीत फारसे फेरफार करण्याची गरज नाही. मात्र राज्यांच्या गरजा लक्षात घेता केंद्राने गोळा करावयाच्या करात काही बदल सुचवता येतील. राज्यांच्या करावर केंद्राने अतिक्रमण न करणे, सर्वस्वी राज्याना ज्याचे उत्पन्न मिळते, अशा केंद्रीय करांचा पुरेपूर उपयोग करून घेणे, ज्यांची झळ राज्याना पोचणार आहे, अशा सवलती लोकप्रियतेसाठी जाहीर करण्याऐवजी त्याची अमलबजावणी राज्याच्या हिताच्या बाजूने करणे ही पथ्ये पाळली पाहिजेत.

सामायिक यादीतील सामाजिक व आर्थिक नियोजन या बाबीची संपूर्ण तपासणी झाली पाहिजे. घटनेच्या चौकटीत सामाजिक व आर्थिक नियोजन राष्ट्रीय पातळीवर तयार केले जाते. तसेच नियोजनाच्या प्रक्रियेत राज्यांना सहभागी करून घेतले जावे. यासाठी राज्यपातळीवर कायद्याने बंधनकारक अशी नियोजनमंडळे निर्माण करावीत. त्यांनी राज्याच्या योजना तयार कराव्यात आणि त्या योजना केंद्रीय नियोजनमंडळाकडे केवळ मंजुरीसाठी नव्हे तर मार्गदर्शनासाठी मागवाव्यात आणि नियोजनाच्या क्षेत्रात अधिक स्वायत्तता निर्माण करावी.


कलम ३५६ च्या संदर्भात असे सागता येईल की, सदर कलम काढून टाकणे हे अंतिम उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवून दरम्यानच्या काळात या कलमाची व्याप्ती मर्यादित करावी. राज्यपालाने केंद्राच्या एजंटाची भूमिका सोडून सरकार स्थापण्याचे प्रयत्न करावेत. ते शक्य नसेल तर विधानसभा विसर्जित करून तीन महिन्यात निवडणुका घोषित होतील असे पहावे. तोवर काळजीवाहू सरकार ठेवावे. तेही अशक्य झाल्यास कायदा व सुव्यवस्था सपूर्णपणे कोलमडल्यास अपवाद म्हणून राष्ट्रपति-राजवट आणावी आणि तेही देशातील सर्व मुख्यमंत्री-सदस्य असलेल्या राज्यपरिषदेच्या सहमतीने.

भारताच्या घटनापरिषदेचे एक सदस्य व ज्येष्ठ विचारवंत श्री. मिनुमसानी यानी केंद्रराज्य–संबंध पूर्ववत प्रस्थापित करण्यासाठी म्हणून सामाजिक यादीसबंधी एक महत्त्वाचा उपाय सुचविला आहे. त्यांच्या मते सामाजिक यादीतील विषयासंबंधी निदान दहा वर्षे तरी कायदे करावयाचे नाहीत किंवा कार्यकारी अधिकारांचाही उपयोग करावयाचा नाही, असे केंद्रशासनाने ठरवले तर अशा स्वतःच्याच सत्तेवर मर्यादा घालण्याच्या निर्णयामुळे घटनेचा ढळलेला तोल सावरणे शक्य होईल.

राष्ट्रपतीनी राज्यपालांच्या नेमणुकीसंबंधी दिल्लीतील पंतप्रधानाचा सल्ला स्वीकारण्याऐवजी सबंधित राज्याच्या मुख्यमंत्र्याशी चर्चा करून राज्यपालपदी योग्य व असामान्य व्यक्तीस नियुक्त करावयाचे ठरविले तर आजच्या घटनेतील कोणतीही तरतूद अशा निर्णयाच्या आड येणार नाही. या पद्धतीने जर राज्यपालाची नेमणूक करण्यात आली तर तो राज्यपाल केंद्रशासनाच्या उपकाराखाली राहाणार नाही.

ज्याना केंद्र व राज्ये याच्यातील ढळलेला तोल सावरण्यासाठी घटनेत फार मोठ्या प्रमाणात दुरुस्त्या हव्या आहेत, त्यानी एक वस्तुस्थिती लक्षात घेतली पाहिजे, ती म्हणजे केंद्र-राज्ये-संबध पूर्ववत करण्यासाठी घटनादुरुस्तीच्या उपायापेक्षा सत्तेवरील व्यक्तीच्या जागृत सदसद्विवेकबुद्धीचा उपाय अधिक परिणामकारी आहे. दीर्घ काळापासून ढळलेल्या तोलामुळे राज्याना जो त्रास होत आहे, तो घटनेत दुरुस्ती करून दूर होणारा नसून, राज्यकर्त्यांच्या अंतःकरणातील दुरुस्तीनेच दूर होणार आहे. हा शेवटी राज्यकर्त्यांच्या सदसद्विवेकबुद्धीचा प्रश्न आहे. आपल्या सदसद्विवेकबुद्धीला जागून केंद्रातील व राज्यातील राज्यकर्ते जोपर्यंत अधिकाराचा वापर करणार नाहीत, तोपर्यंत पुढे येणाऱ्या सर्वच कायदेशीर दुरुस्त्यांची बाजू लंगडी राहणार यात शंका नाही. आपण ह्या भ्रमातून बाहेर आले पाहिजे की, सर्वच समस्यांची उकल कायद्यानेच करता येते. घटनेमध्ये ज्या गोष्टींची नोंद केलेली आहे, त्या जितक्या महत्त्वाच्या आहेत, तितक्याच महत्त्वाच्या नोंद न केलेल्या बाबीसुद्धा आहेत. म्हणूनच कायदेशीर उपायांच्या साक्षीपेक्षाही अंतःकरणपरिवर्तनाने केंद्र–राज्ये–संबंधातील तणाव दूर करून ढळलेला तोल सावरता येईल.

□



एलेनी – अमेरिकेतील प्रसिद्ध पत्रकार आणि लेखक निकोलस गेग यांच्या आईची ही सत्यकथा. ग्रीसमधलं लिया हे एलेनीचं गाव.

दुसऱ्या महायुद्धात जर्मनांनी ग्रीसवर आक्रमण केलं. त्याचे परिणाम डोंगराच्या कुशीत वसलेल्या या छोटया गावापर्यंत पोहोचले. ग्रीक जनतेनं जर्मन फौजांना हुसकून लावलं; पण नंतर सुरू झालं यादवी युद्ध. या युद्धानं एलेनी–सारख्या कित्येक निरपराध लोकांचं जीवन उध्वस्त केलं.

महायुद्धानं एलेनीची नवऱ्यापासून ताटातूट होते; पण खचून न जाता आपल्या पाच मुलांच्या पाठीमागे ती खंबीरपणे उभी राहते. कम्युनिस्ट क्रांतिकारकांच्या अत्याचारांना तोंड देत त्यांच्या तावडीतून मुलांची सुटका करते. याचं प्रायश्चित्त – तिला गोळया घालून ठार केलं जातं !

इथून पुढं सुरू होते....युद्ध – प्रेम – सूड या भावनांची एक हृदयस्पर्शी कथा.

निकोल – एलेनीचा एकुलता एक मुलगा. जाणता झाल्यापासून एकाच भावनेनं पेटून उठतो...आईच्या मृत्यूचा शोध आणि सूड !...

निकोलला त्याच्या आईचे मारेकरी सापडले का ?

# एलेनी

मूळ लेखक : निकोलस गेग

अनुवाद : सुधा नरवणे

लिया–

ग्रीसच्या वायव्येकडच्या पर्वताच्या कुशीत विसावलेलं एक छोटं गाव–

एलेनी गाट्झोयानीसचं गाव ... ती एक साधीसुधी, सामान्य स्त्री होती. चेस्टनट-सारख्या तपकिरी रंगाच्या केसांची–उन्हा-तान्हात रापलेली, बाहेरच्या जगाशी विशेष संपर्क नसलेली अडाणी एलेनी...

माझी आई होती ती. अतिशय मायाळू स्वभावाची असा तिचा लौकिक होता. माझ्या चौघी बहिणी आणि मी ... आम्हा पाच-जणाना ती एका हाती वाढवत होती. तो काळ ग्रीसमध्ये अत्यत अस्थिरतेचा होता. त्यामुळं तिचं आयुष्य अधिक खडतर होत हे आता लक्षात येतय्...

त्या दशकातल ग्रीसवरचं आक्रमण, कम्यु-निस्टांनी ताब्यात घेतलेली सत्ता आणि यादवीयुद्ध यामुळं तो काळ धामधुमीचा होती.

... कम्युनिस्ट क्रातिकारकानी माझ्या आईची पाशवी हत्या केली ... !

... कारण काय ? तर तिन श्रेष्ठ असा मातृधर्म पाळला. स्वत:चा बळी देऊन आपल्या मुलांची [illegible]च्या दाढेतून सुटका केली म्हणून !

आठवण झाली की, अंगाची लाहीलाही होते ... मी त्या दैत्याच्या तावडीतून सुटलो ... अमेरिकेत येऊन पोचलो, मोठा झालो... जाणता झाल्यावर मनातल्या मनात शपथ घेतली की, आईच्या खुनाचा मी नक्कीच सूड घेईन ... ! कसा आणि केव्हा याची मज-जवळ निश्चित कल्पना नव्हती. मनोमन ठरवल की, आधी शोध घ्यायचा त्या नरा-धमांचा .. ज्यानी माझ्या आईसारख्या नि:ष्पाप, सरळमार्गी, प्रेमळ मातेचा निर्घृण खून केला ...

आईच्या जीवनाच्या दुर्दैवी अताला सुरु-वात होते २८ ऑगस्ट १९४८ रोजी.

त्या दिवशी कम्युनिस्ट क्रातिकारकानी तेरा जणाना पकडल आणि वधस्थानी नेलं. त्या तेरा जणांत दोघी स्त्रिया होत्या. एक माझी आई आणि एक माझी मावशी ... क्रातिकारकानी मोठ्या विजयानं जणू त्यांची वरातच काढली होती ! अनवाणी, मारान पाय सुजलेले ... हीनदीन झालेले ते तेरा-जण समजून-उमजून मृत्यूला सामोरे जात होते ...

.. डोगरावर सरपण-फाटा गोळा करा-यला गेलेल्या काही बायकानी गावाकड परतताना ही वरात पाहिली होती...त्याना पाहून त्या गर्भगळित झाल्या होत्या ... मी माझ्या आईच्या मृत्यूचा बदला घेण्याची प्रतिज्ञा करुन जेव्हा ग्रीसमध्ये भ्रमती सुरू केली तेव्हा अनेकाना भेटलो. सगळ्यानाच मी खडीभर प्रश्न विचारीत असे ... माझ्या आईला त्या वरातीत पाहिलेली एक स्त्री मला भेटली होती ... तिनं ती भयानक मिरवणूक पाहिली होती ... डोगरावरून खाली येणारी उताराची वाट तिला दिसे-नाशी झाली होती. पाय जागच्या जागी खिळले ... डोळ्याची बुबुळं भिजली अन् शब्द तर केव्हाच गोठले होते !

आपल्या बदीवानांना घेऊन क्रातिकारक डोगर चढून गेले. क्षितिजापलीकडे जाऊन दिसेनासे झाले ... काही वेळान ऐकू आले बदुकीचे बार ... ठो ... ठो ... ठो ... एकामागून एक ... त्या बायकानी डोक्या-वरचं ओझ खाली फेकलं. कानावर हात ठेवले. तरीही आसमंत भेदून जाणारा तो ठो ठो आवाज त्याना ऐकू येतच राहिला. आता थोड्या वेळापूर्वी पाहिलेल्या तेरा-जणाचं काय झाल असेल ते समजायला त्याना कल्पनाशक्तीला फार ताण द्यावा लागला नाही.

ग्रीसच लष्कर आणि क्रातिकारक याच्यात लढाई चालली होती. क्रातिकारक हरत होते ... लष्कराची सरशी होत आहे हे पाहून चिडून ते एवढ्या–तेवढ्या कारणावरून निरपराध गावकऱ्याना पकडत होते. डोगरात नेत होते ... गोळ्या घालून ठार करत होते !

अशा तऱ्हेने गेली पचवीस दशक वाजतं-गाजतं असलेलं आमचं लिया गाव त्यानी बेचिराख करून टाकलं !

मला माझ्या आईच्या हत्येची बातमी कळली तेव्हा आम्ही एका निर्वासित छाव-णीत होतो. माझ्याबरोबर माझ्या तिघी बहिणी होत्या. आम्हाला आमच्या आईच्या मृत्यूची वार्ता कळली तोवर ती घटना घडून तेवीस दिवस लोटले होते आम्हाला त्या गावातून पळून जायला आईनच मदत केली होती .. तीही येणार होती पाठोपाठ; पण अखेरच्या क्षणी काही तरी गडबड झाली



आणि तिला माग रहाव लागलं ... आमची ताटातूट झाली ती कायमचीच !

निर्वासित छावणीत पाच महिने काढून आम्ही अमेरिकेत पोचलो. तिथ आमचे वडील होते. दुसऱ्या महायुद्धामुळं त्यांना ग्रीसमध्ये येता आल नव्हतं आणि नतरच्या अस्थिर वातावरणामुळं ते आपलं येणं लाबणीवर टाकत राहिले. परिस्थिती-मुळं आमच्या कुटुबाची फाटाफूट झाली होती

माझी आणि पप्पाची भेट झाली तेव्हा मी नऊ वर्षांचा होतो

माझ्या बहिणी आईच्या मृत्यूविषयी बोलायच्या; पण मी मात्र त्या संभाषणात भाग घेऊ शकत नसे. जीभच रेटायची नाही माझी. त्या सगळ्याजणी सारख्या आईच्या आठवणी घोळवत बसायच्या. म्हणायच्या, आज आई माझ्या स्वप्नात आली. असं म्हणाली, तसं म्हणाली.

माझ्याही स्वप्नात आई यायची; पण ती गेलेली आई नव्हे तर सदोदित जवळ वावरणारी ! मला दिसायचं आई घरकाम करतेय. ब्रेड भाजतेय. फळं तोडतेय. माझ्या खोड्याच कधी कौतुक करतेय तर कधी दटावतेय. माझ्या बहिणीनी आईच्या मृत्यूच्या कटू सत्याचा स्वीकार केला; पण मी मात्र तसं करू शकलो नाही. प्रत्येक दिवशी सकाळी मी झोपेतून जागा झालो की, आई नाही या जाणिवेनं मला नवा धक्का बसायचा.

मी तिचा लाडका होतो. तिचं आयुष्य माझ्याभोवती केंद्रित झालं होतं. तिचं



माझ्यावरचं निस्सीम प्रेम म्हणजे ग्रीस-मधल्या प्रत्येक खेडुत स्त्रीचं आपल्या एकुलत्या एक मुलावर जसं उत्कट प्रेम असतं तसं होतं.

मला माहीत होतं की, मी जिवंत रहावं म्हणून तिनं मरण पत्करलं. तिच्या या असीम त्यागाला तोड नव्हती! मी काय करू शकत होतो? मला वाटायचं परमेश्वरानं आता एवढं तरी करावं की, ज्यांनी तिचा छळ केला, तिचा प्राण घेतला त्यांना पराकोटीची शिक्षा करावी! माझ्यासारखा लहानगा मुलगा एवढी इच्छा करण्यापेक्षा दुसरं करणार तरी काय?

पण लौकरच माझ्या लक्षात आलं की, मी इतका काही हतबल नाही, दुबळा नाही. मी लिहायला–वाचायला शिकेन. मोठा होईन. त्या दिवशी २८ ऑगस्ट १९४८ रोजी नेमकं काय झालं, कसं झालं, कुणी केलं याचं यथातथ्य वर्णन करीन. सगळ्या जगाला ओरडून सांगेन, बघा–बघा हे मानवतेला काळिमा लावणारं कृत्य!

१९६३ साली मी कॉलेज–शिक्षण पुरं केलं. शिकत असताना इकडं–तिकडं काम करून मी जे पैसे वाचवले होते ते लिया गावाला भेट द्यायला पुरेसे होते. मी तिकडं जाऊन माझ्या आईच्या शोकांतिकेचा दुवा न् दुवा जोडणार होतो, सगळ्या तपशिलांचा शोध घेणार होतो. त्याशिवाय मला शांतीच लाभणार नव्हती.

लिया गावी पोचल्यावर मी आमच्या जुन्या घराच्या दिशेनं निघालो. असं दिसून आलं की, आता त्या घराकडे चिटपाखरूसुद्धा फिरकत नव्हतं. सगळ्या गावकऱ्यांनी आमच्या घराला भुताटकीचं घर ठरवून त्यावर जणू बहिष्कार टाकला होता. त्या यादवी युद्धाच्या काळात क्रांतिकारकांनी आमच्या घरात मानवी कत्तलखाना उघडला होता आणि स्मशानभूमीही बनवली होती. घराचं दार ढकलूनच उघडावं लागलं मला. मी स्वैपाकघरात डोकावून पाहिलं. इथंच – इथंच – ह्याच शेकोटीच्या कोनाड्याभोवती आम्ही सारेजण बिनघोर झोपी जात होतो. आईची मायेची पाखर आमच्यावर होती. त्या सुखी जीवनातल्या स्मृतींना हाकारून मी त्यांना बोलावण्याचा प्रयत्न करीत होतो; पण एकच दाहक स्मृती अक्राळविक्राळ स्वरूपात माझ्या मनात येत होती. आईचा छळ, आईची हत्या!

मी झपाट्यानं मागं वळलो. मला एक क्षणभरही तिथं थांबवेना. त्या उध्वस्त घराचे अवशेष एकच कहाणी सांगत होते. ती कहाणी ऐकण्याचं धैर्य माझ्या ठायी नव्हतं.

१९६९ साली माझ्या बहिणींनी लियाला जाऊन आईचा स्मृतिदिन साजरा करायचं ठरवलं. मलाही वाटलं जावंसं. आम्ही भावंडं तिथं पोहोचल्यावर मी फक्त त्यांना घराची वाट दाखवली. घरात शिरलो नाही. बहिणी परतल्या तेव्हा त्यांचे डोळे अविरतपणे पाझरत होते!

दुसऱ्या दिवशी सबंध गाव लोटलं चर्चमध्ये आईच्या स्मृति–प्रार्थनेत सहभागी होण्यासाठी! आईची आणि मावशीची हत्या झाल्यानंतर केव्हा तरी गावकऱ्यांनी गवतात सापडलेल्या त्यांच्या अस्थी गोळा केल्या होत्या. प्रेमानं आणि जिव्हाळ्यानं त्यांचं दफन केलं होतं.

धर्मगुरु प्रार्थना म्हणत होते. मग गावातले एक शिक्षक भाषण करायला लागले, 'आज जिच्या स्मृतीला वंदन करायला आपण जमलो आहोत ती एलेनी कुणी सामान्य स्त्री नव्हती. आपल्या मुलांना तिनं वाचवलं म्हणून तिला मरण आलं!'

हे शब्द ऐकताच माझ्या बहिणी गदगदून रडायला लागल्या. त्यांचे हृदय फोडून येणारे हुंदके ऐकून मी इतके दिवस निग्रहानं आपल्या भावनांना घातलेला बांध फुटला. मलाही रडू आवरेना. डोळ्यांपुढं अश्रूंचा जाड पडदा उभा राहिला. पायांतली शक्ती गेली. जवळ उभ्या असलेल्या दोघा माणसांनी मला आधार दिला. प्रार्थना-दालनाच्या बाहेर नेलं. चर्चच्या आवारातच एका झाडाच्या बुंध्यावर माथा टेकून मी मनसोक्त रडून घेतलं.

रडण्याचा आवेग ओसरल्यावर मला जाणवलं की, मी निःशक्त झालो नसून एक वेगळंच सामर्थ्य माझ्या शरीरातल्या अणु-रेणूत पसरतंय.. आता माझ्या मनाची तयारी झाली आहे. आता मी समतोल मनानं आईच्या मृत्यूची कहाणी ऐकू शकेन. गावकरी काय सांगतील ते शांत चित्तानं ऐकून घेण्याइतका मी सावरलोय.

१९६९ सालचा संपूर्ण उन्हाळा मी लिया गावी काढला. अनेक जागांना भेटी दिल्या. किर्तीकांशी बोललो; पण लौकरच लक्षात आलं की, पुष्कळ महत्त्वाचे दुवे माझ्या आवाक्याबाहेरचे आहेत...तिथपर्यंत पोचणं अशक्यच आहे. जी माणसं माझ्या आईशी फंदफितुरीनं वागली त्यांपैकी पुष्कळजण अजून अज्ञातवासात होते. त्या घटनेचे जे साक्षीदार गावात मौजूद होते ते आपल्या आठवणी कथन करायला उत्सुक होते. मी

एकेक ऐकत गेलो...पण त्या परस्परविरोधी हकिकती ऐकून गोंधळून जात होतो. त्या खुनी क्रांतिकारकांची नावं आता गावकऱ्यांना नीटशी आठवत नव्हती. फक्त टोपणनावच आठवत होती—तीसुद्धा या मंडळींनी स्वत:च दिलेली—

म्हणजे पहा— आता ती यातनामय कथा ऐकायची माझ्या मनाची तयारी झाली होती तर ती नीटपणे सांगणारंच कुणी सापडत नव्हतं. त्या प्रकरणातल्या प्रमुख व्यक्तीचा मला छडा लागू शकत नव्हता. जी माहिती सहजी उपलब्ध होत होती त्यातून सत्य हस्तगत करता येत नव्हत.

मी निराश होत्साता न्यूयॉर्कला परतलो आणि स्वत:च्या व्यवसायात बुडून गेलो. कॉलेज–जीवनापासून परिचित असलेल्या एका तरुणीशी विवाहबद्ध झालो. यथावकाश आम्हाला मुलं झाली. पहिल्या मुलाचं नाव आम्ही ख्रिस्तोस ठेवलं— माझ्या वडिलाचं ! दुसरी मुलगी झाली तिचं नाव ठेवल एलेनी —माझ्या परमप्रिय मातेचं नाव !...

...'न्यूयॉर्क टाइम्स' या वृत्तपत्रात मी शोधक पत्रकाराच काम करायला लागलो.या जातीचा पत्रकार म्हणजे अर्धा पत्रकार आणि डिटेक्टिव्ह असतो. लफडी–कुलगडी कशी शोधून काढायची याच मला चागल ज्ञान होतं. लोकाना बोलतं कसं करायचं आणि एखादी हकिकत त्याच्या तोंडूनच कशी वदवून घ्यायची हे कसब मी चागलंच आत्मसात केल आहे. सशयिताचा मी अथकपणे पाठलाग करी. कुणी अज्ञात व्यक्तीनं, निनावीपणे कितीही क्षुल्लक माहिती पुरवली तरी मी तिचा निश्चयपूर्वक पाठपुरावा करीत असे.

...अनेक वर्षांनी माझ्या लक्षात आल की हे करताना मी माझ्या पुढच्या एका महत्त्वाच्या कार्याची पूर्वतयारीच करीत होतो. स्वत:ला सज्ज करून ठेवीत होतो.

कोणतंही काम हाती घेतलं तरी मन उडून जायचं ग्रीसमधल्या डोंगराच्या त्या कपारीत–जिथं माझ्या आईला गोळ्या घालून ठार केलं होत.

१९७४ च्या जुलै महिन्यात ग्रीसमधल्या लष्करी हुकुमशाही राजवटीचा पाडाव झाला आणि भूमिगत असलेले कम्युनिस्ट क्रांतिकारक उजळ माथ्यानं ग्रीसमध्ये परतायला लागले. ज्यांच्याकडून मला आईच्या मृत्यूची कहाणी मिळणं शक्य होतं ती माणसं आता अज्ञातवासातून परतली होती. आता मी त्यांच्यापर्यंत पोचू शकत होतो.

१९७७ साली मी आमच्या प्रमुख संपादकाना विनंती केली आणि अथेन्समध्ये परदेशी वार्ताहर म्हणून स्वत:ची बदली करवून घेतली. तिथं पोचून स्थिरस्थावर झाल्यावर मी माझ्या शत्रूचा शोध घ्यायला प्रारंभ केला. माझे शत्रू म्हणजे तेच जे माझ्या आईचे मारेकरी.

परंतु त्या सुमारास अथेन्समधलं वातावरण असं काही तग होतं की, मला माझ्या ऑफिसच्या कामापुढं इतर काही करायला उसतच मिळेना. १९८० साल उजाडलं आणि मला कळून चुकल की, मी जो वसा घेतला आहे तो पुरा करायचा असेल तर मला भरपूर वेळ हवा. आणि त्यासाठी मला नोकरी सोडावी लागेल. असं नाही केलं तर माझं काम कधीच पूर्ण होणार नाही. विचारपूर्वक मी निर्णय घेतला की नोकरी सोडायचीच ...पूर्ण वेळ एकाच कामाला वाहून घ्यायच माझ्या शत्रूचा शोध आणि आईच्या मृत्यूचा बदला !—

माझ्या या काम्मातला पहिला दुवा मला सापडला अथेन्समधल्या उपनगरात राहणाऱ्या एका माणसाजवळ. तो पूर्वायुष्यात आमच्या लिया गावी राहात होता. त्याच नाव होत माकोस.

...माकोस सागत होता आणि मी जिवाचे कान करून ऐकत होतो.

...'तुमच्या आईला मी त्या दिवशी पाहिल. मी एका झऱ्यावर पाणी पीत होतो. तुझ्या आईला त्या लोकानी पकडल होतं. वधस्थानी नेत होते. हाताची ओंजळ तशीच ठेवून पाणी प्यायच विसरून मी त्या सर्वांना पाहिलं. त्या क्रांतिकारांपैकी एकाचा चेहरा माझ्या चागलाच लक्षात राहिला. का कुणास ठाऊक. त्याचा चेहरा माझ्या स्मृतिपटलावर कोरल्यासारखा ठसलाय. नतर किती दिवसानी जवळजवळ वीस वर्षांनी मी त्याला उत्तरग्रीसमधल्या यानिना शहरात एका बारमध्ये पाहिलं, तेव्हा झटक्यात ओळखल. त्याचं नाव ताकी कोटीस.

माकोसचं आणि माझ बोलणं सपताच मी तडक यानिनाकडं जाणारं विमान गाठलं. तिथं पोचता क्षणी कोटीसचा पत्ता शोधण्याचं काम केल.

मी लेखक आहे आणि ग्रीसच्या यादवी युद्धावर मला पुस्तक लिहायचं आहे अशी बतावणी करून मी त्याची मुलाखत ठरवली. त्यानं वेळ अन् दिवस मुक्रर केला.

त्याच्या चेहऱ्याकडे पाहताच माझं रक्त उकळायला लागलं. सूडाच्या भावनेनं मी पेटून निघालो.

ह्यानच...ह्यानंच माझ्या प्रिय आईचा खून केला किंवा तिची प्राणज्योत झडप घालून विझवली जात असता ह्याच शांतपणे पाहात बसला ! !

हा ताकी कोटीस इसम अगदी किरकोळ शरीरयष्टीचा आणि दुबळा दिसत होता. तो म्हणत होता, ...'ती...तुम्ही म्हणता त्या कालावधीत मी लियामध्ये होतो. माझी तिथं नेमणूकच झाली होती.'

एकीकडे माझी छाती धडधडत असताना मी त्याला विचारल, 'तुम्ही तिथ असताना, लियामधल्या पाच जणाना गोळ्या घालून ठार मारलं म्हणतात, खरं का ?'

'हो खरं आहे. मीच होतो तिथे पहारेकरी म्हणून. प्रत्यक्ष गोळ्या झाडणारांचं पथक दुसरं होतं. ते डोंगरातून खाली आले आणि सटासट सटासट—'

...हे शब्द ऐकून माझ्या कानाचे पडदे फाटतील असं वाटलं मला.

'कबूल आहे मला. हे अमानुष कृत्यच होतं. काय विचारताय ? कुणी फर्मावली ही शिक्षा? अं...नाही बुवा नाही आठवत त्याच नाव.'

मी त्याला आणखी खोदखोदून प्रश्न विचारत राहिलो. तेच तेच प्रश्न वेगवेगळ्या शब्दात, तर कधी वेगवेगळे प्रश्न त्याच त्याच शब्दात !' आडवे तिडवे प्रश्न. त्याच्या स्मृतीला चेतना देण्याचा माझा आटोकाट प्रयत्न. संभाषणाच्या ओघात त्यान सांगितल.

'हो हो. एक प्रसग आठवतोय. एका बाईची कुणी तरी जबानी घेत होतं. तिचे केस होते चेस्टनटसारखे तपकिरी रगाचे.'

माझ्या छातीचा ठोका चुकला.

'ती बाई ना? ती होती त्या घराची मालकीण. ज्या घराचा तुरुग करण्यात आला होता ना, ते घर तिच होत. एकजण तिला



मारत होता, तर दुसऱ्यानं तिला घट्ट धरून ठेवलं होतं आणि आपला गुडघा तिच्या पाठीत रोवत होता.

मी नुसता त्याच्याकडे पाहत बसलो. काही आकलन होईना.

'म्हणजे काय ? गुडघा रोवल्यानं काय होतं?' चेहऱ्यावर ओशाळ-भाव आणीत तो म्हणाला,

'थांबा, दाखवतो मी तुम्हाला.'

त्यानं खांद्याखाली माझे हात धरले; अन् पाठीच्या मणक्यावर आपला गुडघा रोवला. नंतर त्यानं माझा हात असा पिरगळला की मला वाटलं खांद्यातून निखळला हात! हे करताना त्याला फारसा जोरही लावावा लागला नाही. तो अगदी साधं प्रात्यक्षिक करून दाखवत होता. माझा जीव वेदनेनं कळवळला. पाठीच्या मणक्यातली ती सणक पार एकदम मस्तकापर्यंत पोचली.

कोटीसनं माझा हात सोडला आणि तो खुर्चीवर जाऊन बसला. तो काही तरी बोलत होता; पण ते माझ्या कानांत शिरत नव्हतं. मला घाम फुटला होता आणि डोक्यात प्रचंड स्फोट होत होता. त्या धारदार वेदनेनं मी निर्बल झालो. मुलाहून मूल झालो; पण त्या वेदनेमुळंच माझ्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. आता माझ्या मनानं एक नवा निर्धार केला. आईचा छळ करणारांना नुसतं शोधून भागणार नाही, तर त्यांनाही अशा तीव्रतम यातनेचा अनुभव घ्यायला लावलं पाहिजे!

त्या नराधमांपैकी एकजण हा आता माझ्यापुढं आहे. म्हातारा...निःशक्त...फुंकर मारली तर उडून जाईल, असा फाटक्या अंगाचा. मी एक झापड दिली, तर कुठच्या कुठं जाऊन पडेल. त्याची मानगूट धरावी आणि या इथल्या संगमरवरी टेबलावर मस्तक थाडथाड आपटत रहावे, त्याच्या डोक्याच्या चिंध्या चिंध्या कराव्या. बदला घेण्याच्या या भावनेनं माझा ताबा घेतला.

पण क्षणार्धात मी स्वतःला सावरलं. स्वतःला बजावलं, 'शांत रहा. शांत रहा. तुझं खरं सावज हे नाहीय. त्या संपूर्ण कुटिल प्रकरणातला हा एक नगण्य प्राणी आहे. सबूर...!'

मी उठलो आणि चालायला लागलो. त्याची पुनः भेट झाली तर तीच सूडाची भावना माझ्या मनात उफाळेल आणि मी त्या वेळी स्वतःवर नियंत्रण ठेवू शकेन की नाही याची मला खात्री वाटेना. यानिनाहून परतण्यापूर्वी मी आणखी एका व्यक्तीची भेट घेतली. तिचं नाव दिना व्हेनेटिका. ही बाई या तेरा जणात होती, क्रांतिकारकांनी तिच्यावरही देशद्रोहाचा आरोप ठेवला होता; पण काही कारणानं तिला सोडून दिलं होतं. रखरखीत केसांचं टोपलं डोक्यावर बाळगणारी ही दिना आता चांगलीच वयस्क होती. तिची आठवण अशी होती की, 'ज्या न्यायधिशानं त्या तेराजणांना मृत्यूची शिक्षा ठोठावली, त्याचा आवाज कमालीचा घोगरा अन् गंभीर होता. भीतिदायक गंभीर असं वाटायचं. साक्षात मृत्यूच बोलतोय! अंगावर सरसरून काटा यायचा. लिया गावातले लोक त्याला काटिस म्हणायचे.'

ते नाव ऐकताच माझ्या डोक्यात एक ट्यूब पेटली. मी गावकऱ्यांशी बोललो तेव्हा पुष्कळांनी त्याचं वर्णन केलं होतं. त्या वर्णनात एकवाक्यता होती. तो क्रांतिकारकांचा न्यायाधीश म्हणून काम पाही. तोच आरोपीविरुद्ध साक्षीपुरावे गोळा करी. तोच जबान्या घेई. तोच छळाच्या नव्या नव्या पद्धती शोधून काढी. माझ्या आईवर कुणी आरोप ठेवला कुणास ठाऊक! पण न्यायदान यानंच केलं. गोळ्या झाडण्याची आज्ञा यानंच दिली. याला शोधून काढलं पाहिजे– मुख्य म्हणजे याचं नाव शोधून काढलं पाहिजे.

नंतर मी अनेक क्रांतिकारकांना भेटलो. त्यांना काटिसची ऐकीव माहिती होती. तो अज्ञातवासात मरण पावला असावा, अशीच बहुतेकांची कल्पना होती. कुणाला काहीच निश्चित सांगता येईना. एक जण मात्र सहज सांगून गेला, 'यानिना शहराजवळ एक निवृत्त वकील राहतो. त्याची अन् या काटिसची युद्धकाळात ओळख होती, असं मला अंधुकसं आठवतंय. त्या वकिलाचं नाव मला वाटतं डेमिट्रिस गास्टिस का असंच काहीसं होतं.'

फारच थोडी आशा मनात बाळगून मी पुनः विमानानं यानिनाला गेलो. गास्टिसचा पत्ता मिळवला आणि एक मोटार घेऊन त्याच्याकडे गेलो. युद्धकाळात क्रांतिकारकांच्या सैन्याच्या ११ व्या पथकाचा तो न्यायाधीश होता, एवढी माहिती मला लागली होती. निरपराध जीवांना यमसदनाला पाठवणारा हा टास्टिस म्हणजे दैत्यासारखा दिसणारा भयंकर मनुष्य असेल असा माझा ग्रह झाला होता; पण प्रत्यक्ष भेट झाल्यावर वाटलं हा एक म्हातारा सद्‌गृहस्थ आहे

मी माझ्या भेटीचं प्रयोजन त्याला सांगितलं. मी एक लेखक. ग्रीसच्या यादवी युद्धावर पुस्तक लिहायचा विचार आहे. माहिती जमवतोय.

माझं बोलणं त्यानं लक्षपूर्वक ऐकून घेतलं. आपल्या तरुणपणींच्या शौर्यकथा सांगण्याची कल्पना त्याला भलतीच आवडली. आपणहून एखादा श्रोता येतोय. अगदी चेवच आला त्याला त्या वेळच्या गोष्टी सांगण्याचा. त्यानं त्या वेळी चालवलेल्या लष्करी खटल्यांच्या साक्षात हकिगती तो सांगायला लागला.

'तुम्हाला कार्टिस नावाचा न्यायाधीश आठवतो?' मनातली खळबळ, आवाजातला अधिरेपणा लपवीत मी सहज म्हणून विचारलं

कुणी म्हणतात तो हद्दपारीत जीवन कठत असता वारला म्हणून.

'छेः छेः तो मेला नाही, अजून जिवंत आहे की. अहो, त्याचं खरं नाव अचिलास टायाकास आहे. त्याला भेटा तुम्ही. खूप माहिती मिळेल तुम्हाला!' गार्टिसनं अगदी सरळपणे अचिलासचा पत्ता माहीत असणाऱ्या एका इसमाचा पत्ता दिला.

ते चिठोरं हातात घेऊन मी भारल्यासारखा बसून राहिलो. जागीच खिळून गेलो. अखेर मी जिंकलो! माझ्या आईला मरणाच्या दाढेत लोटणारा आणि तिचा यातनामय शेवट पाहणारा तो राक्षस अगदी माझ्या हातातच आला की!

वर आभाळात ढगांचा गडगडाट चालू झाला. त्या आवाजानं मी भानावर आलो. गार्टिसचे आभार मानले आणि त्या गारांच्या वर्षावातल्या पावसातही मोटार सुरू करून माझा मार्ग आक्रमू लागलो.

त्या गावची सीमा ओलांडली आणि रस्त्याच्या कडेला थांबलो. माझ्या मनातला भावनांचा कल्लोळ आता पराकोटीला पोचला होता हात थरथरत होते. किती वेळ मी मोटारीत बसून राहिलो कुणास ठाऊक. विचार करीत होतो, कार्टिसला समोरासमोर भेटल्यावर मी काय करीन. या नुसत्या हातानी त्याचा गळा दाबीन?'

कार्टिस यानिनामध्येच राहतोय. हे कळून बरं वाटलं त्याच्या घरापाशी गेलो आणि खालूनच चौथ्या मजल्यावरच्या त्याच्या बिऱ्हाडाच्या खिडकीकडं एकटक बघत राहिलो. डोळ्यांपुढं मी त्याचं चित्र रंगवलं.

तो आता त्याच्या दिवाणखान्यात बसला असेल. आत्मसंतुष्टतेची साय चेहऱ्यावर असेल. समाधानी, सुखवस्तु, नीट-नेटक आयुष्य अशा विश्वासात मशगुल असेल की; गत काळातले ते गुन्हे काळौघात वाहून गेलेत. इतिहासात गाडले गेलेत; पण बच्चमजी, भ्रमात आहात तुम्ही! हा पाहा तुमचा काळ ...हा मी तुमची कृष्णकृत्यं उकरून काढायचा वसा घेऊनच जगतोय. तुमचे पापानं भरलेले घडे, सगळी दुनिया विसरली असेल; पण मी नाही विसरलो. तुम्हालाही आठवण करून देतो. आठवा आठवा ऽऽ लियामध्ये काय केलंत?

आतापर्यंत माझ्या हाती जे काय लागलं होतं त्यावरून माझी अगदी निःशंक खात्री पटली होती की, माझ्या आईच्या हत्येची सर्वांत जास्त जबाबदारी कार्टिसवर होती.

पण तरीही मी असा एकदम त्याच्या घरात जाऊन पुढं उभा ठाकून त्याच्यावर हल्ला करू शकत नव्हतो त्या पापी कृत्यात त्याचा नेमका वाटा किती होता याची मला शहानिशी करून घ्यायची होती. तो त्या हत्याकांडाचा सूत्रधार होता की सूत्रधार दुसरा कुणी आणि हा केवळ हुकमाचा ताबेदार होता? त्याच्या गुन्ह्याची सम्यक कल्पना आल्याशिवाय त्याला शिक्षा तरी कोणती आणि कशी द्यायची हे कसं ठरवू?

त्याच्या घरापासून मी माघारी वळलो. यानिनात हिंडून-फिरून हॉटेलात एक खोली घेऊन राहिलो. रात्र तळमळत काढली. केव्हा तरी उशीरा झोप लागली आणि मग उशीरानंच जागा झालो तेव्हा एक गोष्ट स्पष्टपणे जाणवली.

मला पुनश्च लिया गावी गेलं पाहिजे. आईचं सारं आयुष्य जिथं गेलं, शेवटचे यातनामय दिवस तिनं जिथं घालवले ते गाव पुनः एकदा नजरेखालून घातलं पाहिजे. नंतरच काही तरी निश्चित विचार सुचेल.

माझी आई एलेनी फारच थोडे दिवस शाळेत गेली त्या वेळच्या खेडेगावच्या रूढीप्रमाणे अकराव्या वर्षीच ती डोक्याला एक रुमाल बांधायला लागली. तेव्हापासून कुणा पुरुषाशी बोलणं बंद! अगदी नवऱ्याच्या घरी जाईपर्यंत हे बंधन. नवरासुद्धा कुणी अनोळखी पुरुषच असायचा—

तिच्या आयुष्याची इतिश्री झाली त्या आधीच्या दशकातलं राजकारण तिच्या बुद्धीच्या आवाक्याबाहेरचं होतं, आकलनापलीकडचं होतं. त्या राजकारणानंच तिचं छोटं विश्व उध्वस्त करून टाकलं. माझ्या आईचं जग म्हणजे जादूटोणा, अंधश्रद्धा, भुतखेत, पिशाच्च यानी भरलेलं होतं. त्याना शांत करण्यासाठी मंत्रतंत्राचा-जारण मारणाचा उपयोग केला जाई; पण तिच्या लिया गावात युद्धरूपी हैवानानं जो धुमाकूळ घातला तो शांतवण्यासाठी तिच्या मंत्रतंत्राचा काही उपयोग झाला नाही. आपल्या जगातले कायदेकानू, अलिखित संकेत आपल्या मुलाचं रक्षण करायला निष्फळ ठरताहेत हे पाहून ती भांबावून गेली. वणव्यात सापडलेल्या त्या हरिणीनं स्वतःच्या मुलासाठी त्यागाची परिसीमा गाठली. आपल्या मुलांचे प्राण वाचवायचे असतील तर स्वतःचे दिले पाहिजेत या वस्तुस्थितीचा साक्षात्कार होताच गांगरलेपणाचं रूपांतर असामान्य धैर्यात झालं. कसा असेल तो क्षण? तो पकडून ठेवता आला असता का? छे! तिला तरी कुठं जाणीव होती आपल्या असामान्यत्वाची? मी तो क्षण काळाच्या उदरातून उकरून काढीन. खाणीतून सापडलेल्या हिऱ्यासारखा तो तेजगर्भ असेल. माझ्या लेखणीनं मी त्याला पैलू पाडीन. जगाचे डोळे दिपवीन!

मी पुनः लिया गावी गेलो आणि एका अनावर ओढीनं तडक घराकडं गेलो. आमचं घर आता अगदीच पडीक आणि मोडकळीला आलेलं होतं. घरावर आणि अवतीभोवती झाडझाडोरा वाढला होता. छप्पर कोसळून भुईवर आलं होतं. पाली आणि इतर प्राणी तिथं मुक्त संचार करीत होते. एक बुलडोझर तिथली जमीन सपाट करीत होता. मी त्या माणसाला थांबवलं. म्हटलं, 'हे एवढं तुतीचं झाड राहू द्या ना. जरा बाजूबाजूनं घ्या तुमचा बुलडोझर.'

त्या तुतीच्या झाडाच्या फांद्याफांद्यात माझ्या जीवनातल्या सुखद स्मृती लटकलेल्या होत्या. त्यावर दुःखद स्मृतींचं सावटही होतं.

हेच ते घर, जिथं एलेनीला प्राणांतिक यातना सोसाव्या लागल्या. हेच ते घर. इथंच तिला दुष्टानी मृत्यूच्या गर्तेत लोटलं. हेच ते घर, जिथं एकोणीस वर्षांच्या एलेनीनं नववधू म्हणून गृहप्रवेश केला. इथंच तिनं आम्हा मुलाना जन्म दिला!

या भुईसपाट झालेल्या घराला मी माझ्या कल्पनाविश्वात पुन: आकार देत होतो. विटेवर वीट रचत होतो. शेकडो साक्षीदारांच्या खऱ्या-खोट्या आठवणींच्या आधारे मला लिया गावाची, आईच्या छिन्नभिन्न गावाची पुनर्बांधणी करायचीय—तेव्हाच माझा शोध पुरा होईल. तरच मला कळेल आईच्या जीवनाचं सार. तेव्हा मी लहान होतो. ती मला काही समजावून सांगू शकली नसेल आता मी पुनः इकडून तिकडून मिळवलेल्या धाग्यानी गतजीवनाचं वस्त्र विणेन. त्याच्या आधारे अतीताच्या पलीकडे जाऊन आईच्या आत्म्याशी संपर्क साधेन. कुण्या एका मानवी सत्तेची तिनं अवज्ञा केली म्हणून तिला मरण पत्करावं लागलं. तिचा आत्मा सूडासाठी तळमळतो आहे का हे मी पाहीन. तिच्या प्राणांच्या पुलावरून आम्ही सुरक्षित जागी पोचलो. आपली मुलं ठीक आहेत हे पाहून तिचा आत्मा संतुष्ट झाला का हे मला कळलंच पाहिजे. अज्ञाताची दरी पार करून मला तिच्या आत्म्याशी संवाद साधलाच पाहिजे!

त्यासाठी मला चाळीस वर्षं मागं गेलं पाहिजे!

(क्रमशः)

पुस्तके

# बोरकर यांची 'प्रियकामा'

वि. शं. पारगावकर

'प्रियकामा' ही बा. भ. बोरकर यांची कादंबरी. बोरकर हे जुन्या पिढीचे एक कीर्तीवंत कवी. त्यांनी आपल्या स्वतःच्या काव्यावर आणि अर्वाचीन मराठी कवितेवर स्वतःचा एक ठसा उमटविलेला आहे. बोरकरांचे मन हे अस्सल कविमनच आहे. मराठी सारस्वतात कवी म्हणून त्यांचे मोठे तत्त्व आहे. रसिक मनामध्ये त्यांची कविता पूर्णपणे ठसलेली आहे. बा. भ. बोरकर हा अस्सल कविमनाचा लेखक असला तरी अधूनमधून त्यांचे मन काव्यात्म गद्याकडे देखील वळलेले दिसून येते. ललितगद्य या साहित्यप्रकाराकडे वळले तेव्हा त्यांनी 'भावीण' ही कादंबरी लिहिली. त्या कादंबरीमध्ये देखील त्यांचे काव्यमन ठायी ठायी प्रकट झालेले तेव्हा निदर्शनास आलेलेच होते.

त्यानंतर आणि एवढ्या दीर्घ मुदतीनंतर आज पुन्हा ते कादंबरी या साहित्यप्रकाराकडे वळलेले दिसतात. 'प्रियकामा' लिहिताना देखील त्यांनी प्रागैतिहासिक महाकाव्याचाच आधार घेतलेला आहे.

महर्षी वाल्मीकींचा 'रामायण' हा ग्रंथ तसेच महर्षी व्यासांचे 'महाभारत' हे भारतीय जीवनाचे संस्कृतिकोश आहेत; परंतु असे जरी असले तरी 'रामायण' हा ग्रंथ 'महाभारता'पेक्षा अधिक काव्यात्म आहे. महाभारतातील काव्यरचना ही अधिक प्रगल्भ असली तरी प्रखर आहे. या महाकाव्यामधूनच प्रागैतिहासिक काळातील मानवाचे आणि मानवी संस्कृतीचे जे चित्र महर्षी व्यास आपल्यासमोर उभे करतात त्याने डोळे दिपून जातात. वाचक या जीवनामध्ये जो गुंतून पडतो त्याची अवस्था एखाद्या चक्रव्यूहात अडकल्यासारखी होते. त्यामध्ये काव्यापेक्षाही राजकारणाला आणि राजकारणापेक्षाही मानवी मनाला आणि त्या मनातील गुंतागुंतीला अपार महत्त्व दिलेले आहे.

तसे 'रामायण' या काव्यग्रंथाचे नाही. त्यामधील काव्याचे स्वरूप पौर्णिमेच्या चांदण्यासारखे आहे. अत्यंत शीतल आणि मनाला उल्हसित करणारे. ते जितके कोमल आहे तेवढेच करुणरसाने ओथंबलेले आहे. त्यामधून व्यक्त झालेले महर्षी वाल्मीकींचे कविमन पाहावयाचे असेल तर ते त्यांच्या एकाच अनुष्टुपश्लोकात व्यक्त झालेले दिसेल. तो श्लोक :

'मा निषाद प्रतिष्ठां त्वमगमः शाश्वतीः समाः।
यत्क्रौन्चमिथुनादेकमवधीः काममोहितम्।।

असा आहे आणि श्लोकाच्या स्फुरणानंतरची त्यांची प्रतिज्ञा अशी आहे की,

'कृत्स्नं रामायणं काव्यमीदृशं करवाम्यहम्।' सर्व 'रामायण' अनुष्टुपात रचण्याची त्यांची ही प्रतिज्ञा आहे. हे वृत्त साधे, सरळ, सुटसुटीत आणि मानवी मनावर अकृत्रिम मोहिनी घालणारे आहे. येथेच महर्षी वाल्मीकी यांच्या काव्यनिर्मितीमागील त्यांच्या मनाचाही प्रत्यय येतो.

बोरकर यांच्या कवितेशी महर्षी वाल्मीकी यांच्या मनाचे नाते जुळणारे नसले तरी 'रामायण' ज्या प्रकारचा काव्यग्रंथ आहे, त्यामधून अभिव्यक्त होणारी वृत्ती, या वृत्तीचे साम्य बोरकरांच्या वृत्तीमध्ये निश्चित आहे. प्रसाद, प्रसन्नता, काव्यामधून उद्भवणारी भव्यता, तितकीच अंतःकरण हेलावून सोडणारी करुणा या सर्व विशेषांचा प्रत्यय बोरकर यांच्या कवितेमधून सतत होत राहतो. हे सर्व इथे सांगण्याची गरज एवढीच की, कवी बोरकर यांना 'महाभारता'पेक्षा 'रामायणाने' का आकृष्ट केले.

असे एखाद्या प्रागैतिहासिक महाकाव्याकडे आकृष्ट होण्यामागील वृत्तिवैशिष्ट्य आपण पाहिले आणि त्यामुळेच बोरकरांनी 'प्रियकामा' ही कादंबरी लिहिण्याचे ठरविले 'असावे' असे विधान करण्यासाठीच वरील एवढा प्रपंच केला. त्यामध्ये देखील 'असावे' असा शब्द मी वापरला, त्याचे कारणही तितकेच महत्त्वाचे आहे.

'प्रियकामा' ही त्यांची कादंबरी रामायणातील 'कैकयी' हिच्या जीवनावर लिहिलेली आहे. एवढेच नव्हे तर कैकयीच्या जीवनाचे उदात्तीकरण करण्याचा हेतू मनात बाळगूनच त्यांनी ही कादंबरी लिहिलेली आहे हे स्पष्टच आहे आणि येथूनच महर्षी वाल्मीकी आणि कवी बोरकर यांच्यामधील निर्मितिक्षम नात्याला तडा गेलेला आहे हे स्पष्ट होते.

'रामायण' या महाकाव्याचे स्वरूप आणि 'महाभारत' या काव्यग्रंथाचे स्वरूप तसे निराळे आहे. महाभारतामध्ये शेकडो व्यक्ती अशा आहेत की ज्यांच्यामध्ये स्वतंत्रपणे नायक अथवा नायिका होण्याइतके सामर्थ्य आहे. तसे रामायणाचे नाही, हे त्याच्या नावावरूनच सिद्ध होते. महर्षी वाल्मीकींचा रामायणातील नायक हा रामच आहे. राम नायक आणि सीता नायिका असलेलेच हे महाकाव्य आहे. फार झाले तर उपनायक म्हणून भरताला या महाकाव्यात थोडेसे स्थान आहे.

'कैकयी' ही कुठल्याही दृष्टीने एखाद्या कलाकृतीची नायिका होण्याच्या पात्रतेची नाही.

परंतु सध्याचा काळ हा उत्खननाचा आणि नवनिर्मितीचा काळ आहे, तसाच तो संशोधनाचाही काळ आहे; परंतु संशोधनाची देखील काही तत्त्वे असतात. त्यामध्येही मूळ वस्तू असते, तिचे स्वभावधर्म असतात, त्यामध्ये अंतर्भूत असलेला तर्क असतो आणि तर्कसंगतीचे तत्त्व देखील असते आणि हे सारे ठरविण्याच्या काही कसोटचाही असतात, या गोष्टींकडे दुर्लक्ष होत चालले आहे.

आज कर्णावरही 'मृत्यंजय' नावाची कादंबरी लिहिली जाऊ शकते. तसेच यशवंतराव

होळकर, पळपुटे बाजीराव हेही कलाकृतीचे नायक होऊ शकतात आणि पार्वतीबाई पेशवे याचे जीवन देखील नायिकेला पात्र असे जीवन ठरू शकते ! नाना फडणीस यांच्या जीवनाचे विकृतिकरण एखाद्या लेखकाला अगदी सहज करता येते आणि अशा विकृतिकरणामधून निर्माण झालेल्या तथाकथित कलाकृतीला जागतिक कीर्तीचे लेणेही सहज मिळू शकते ! जर्मनीचा नाझी हिटलर हा देशभक्त आणि शूर पुरुष ठरू शकतो. त्याच्या यशापयशाचे कौतुकाने गान होते. तसेच लोकसत्ताक राज्यपद्धतीची जननी असणाऱ्या इंग्लंडच्या साम्राज्यवादी चर्चिलच्या जीवनाची यशोगाथा गायिली जाते. त्याचे लोकशाहीचे प्रेम त्याच्या देशापुरते होते याचे फारसे सशोधन करण्याची गरज नाही. तो चर्चिलच भारताला स्वातंत्र्य देण्याच्या सदर्भात म्हणाला होता, 'मी जो इंग्लंडचा पतप्रधान झालो ते राणीचे साम्राज्य खालसा करण्यासाठी नव्हे !'

अशा या लोकाना नायक कल्पून त्यांच्या जीवनाचे कौतुकाने गुणगान झालेले आज आपण पाहतो आहोत. इतिहासाचा विपर्यास आणि इतिहासात बदनाम झालेल्या व्यक्तीच्या जीवनाचे उदात्तीकरण हा आजचा जणू युगधर्मच समजला जात आहे! ज्या एका महान व्यक्तीने मानवजातीच्या एकीकरणासाठी, चारित्र्यसंपन्नतेसाठी आणि भारताच्या स्वातंत्र्यासाठी सारे जीवन पणाला लावले होते, त्या नि.शस्त्र आणि अहिंसावादी महात्म्याचा गोळ्या घालून खून करण्यात आला आणि असा खून करणारे सत्यवादी, ध्येयवादी आणि राष्ट्रवादी समजले गेले!

उद्या एखाद्या महान लेखकाने नरमासपिपासू स्टॅलिन, मुसोलोनी आणि इदी अमीन याच्या जीवनावर देखील महान कलाकृती निर्माण केल्या तर त्याबद्दल आश्चर्य वाटण्याचे काहीच कारण नाही !

'कैकयी'च्या जीवनावर कादबरी लिहून बोरकर यांनी तेच केले आहे. जसे 'घाशीराम कोतवाल' या नाटकाला ताल, लय आणि सूर यांच्या साह्याने मोठे केले गेले तोच प्रकार 'प्रियकामा' या कादंबरीच्या बाबतीत झालेला आहे. काव्यमय भाषा, शब्दाशब्दांमधून व्यक्त होणारे भावमाधुर्य, प्रागैतिहासिक काळातील जीवनपरिपोषासाठी लागणारे वातावरण आणि साध्या, सरळ, सुदर निवेदनशैलीने तिला दिलेला घाट यांची मोहिनी सामान्य वाचकावर पडल्याशिवाय राहात नाही.

परंतु वाल्मीकि रामायण ज्यानी ज्यानी वाचले असेल त्याना बोरकर यानी 'प्रियकामा' या कादंबरीमध्ये कैकयीच्या व्यक्तिमत्त्वाचे केलेले उदात्तीकरण पटणार नाही. रामायणातील कैकयी ही स्त्री एखाद्या ललितकृतीची नायिका होण्याच्या पात्रतेचीच नाही, या माझ्या विधानाच्या बाजूने रामायणातील असंख्य दाखले देता येतील.

भरताला राज्य आणि रामाला चौदा वर्षे वनवास या तिच्या आज्ञेचे पालन रामचंद्र करीत असता आणि वल्कले परिधान करून वनवासात जाण्याची तयारी ते करीत असता कैकयी सीतेलाही वल्कले देते असा एक प्रसंग रामायणात आहे. असा प्रसग घडत असता प्रत्यक्ष राजगुरू वसिष्ठ यांना देखिल संतापाने घेरले आणि कैकयीच्या सदर्भात त्याच्या तोडून तिला जे वाक्ताडन झाले त्याचे वर्णन वाल्मीकि रामायणाच्या अयोध्यासर्गामध्ये केलेले आहे. तेथे वसिष्ठ म्हणतात—

'सीतादेवीने हातात वल्कले घेताच कैकयीचे निवारण करून साश्रु नयनांनी राजगुरु वसिष्ठ म्हणाले, 'हे दुर्बुद्धे व कुलागार कैकयी ! तू मर्यादांचे अतिक्रमण करीत आहेस. तू राजाची वंचना केलीस, तू शीलभ्रष्ट आहेस. सीतेला वनात जाण्याचे काहीही कारण नाही. स्त्री हा पतीचा आत्मा असते या न्यायाने या रामाच्या सिंहासनावर आज जर राम बसू शकत नसतील तर सीता ते सिंहासन स्वीकारून राज्यकारभार करील. जर सीताही रामाबरोबर वनात जाणार असेल तर सगळे राष्ट्रचे राष्ट्र भरत आणि शत्रुघ्न यांच्यासहित वनात जाईल ! अशा स्थितीत एकही मनुष्य नसलेल्या व केवळ झाडाझुडुपांनी व्याप्त होऊन अरण्यप्राय झालेल्या ह्या राष्ट्राचे राज्य तू एकटी कर. तू चारित्र्यभ्रष्ट आहेस. प्रजेच्या हितावर तू निखारे ठेवले आहेस. जेथे राम राजा नाही ते राष्ट्रच असू शकणार नाही. बापाने न दिलेले राज्य भरत कधीही स्वीकारणार नाही. किंबहुना तो जर खरा कुलवंत असेल तर आई या नात्याने तो तुझ्याशी कधीही वागणार नाही. तू आकाशपाताळ एक केलेस तरी आपल्या कुलाची कीर्ती जाणणारा भरत तुझ्या तालावर कधीही नाचणे शक्य नाही... सीतेला वल्कले देऊ नकोस. तुझ्या अटीत ते येत नाही ! '

प्रत्यक्ष राजगुरु वसिष्ठाचे हे उद्गार कैकयीच्या चारित्र्यावर पूर्ण प्रकाश टाकतात!

तसेच राम, लक्ष्मण आणि सीता वनात गेल्यावर भरत अयोध्येत येतो तेव्हा त्याचा आपली माता कैकयी हिच्याशी झालेला संवाद महर्षी वाल्मीकीनी अयोध्याकांडात सर्ग ७२ मध्ये वर्णिला आहे. त्याचा सर्व अनुवाद देण्याचे येथे कारण नाही. भरताच्या रामाविषयी आणि कैकयीविषयीच्या भावना फक्त येथे व्यक्त करतो. कैकयी भरताला म्हणते,

'मी तुझ्यावरील प्रेमाने हे राज्य तुला मिळावे म्हणूनच मी प्रतिज्ञेच्या बंधनात राजाला अडकविले आणि तुझ्यासाठी राज्य व रामासाठी वनवास मागून घेतला. तुझे वडील सत्यवचनी असल्यामुळे मोठ्या कष्टाने त्यानी ती गोष्ट अंमलात आणली व अखेर रामाच्या विरहदुःखाने त्याना मृत्यू आला. याप्रमाणे केवळ तुझ्यासाठी मी हे सर्व घडवून आणले असल्यामुळे तू या राज्याचा उपभोग घे...!' आईच्या तोडचे हे वाक्य ऐकताच तिच्या वर्तनाचा सारा उलगडा होऊन भरतावर एक प्रकारे वज्राघातच झाला. हा एक प्रकारे आपल्यावर कलंकच आहे व त्या कलकाचा टिळा प्रत्यक्ष आपल्या मातेनेच आपल्या कपाळी लावलेला आहे हे भरताच्या लक्षात येण्यास वेळ लागला नाही. त्याने कैकयीची निर्भर्त्सना केली. हे सर्व करीत असताना त्याच्या क्रोधाच्या आविष्कारातूनच कुलाभिमान व चारित्र्यनिष्ठा याच दोन गोष्टी मुख्यत: उत्कटतेने स्पष्ट झालेल्या आहेत. तो कैकयीला म्हणतो, 'या कुलाचा नाश करण्यासाठी तू एखाद्या काळरात्रीप्रमाणे आलीस. तू कुलाच्या कीर्तीवर निखारे ठेवलेस ! हे चारित्र्यभ्रष्ट पापी स्त्रिये. आपल्या पूर्वजांच्या कीर्तीला काळिमा फासणारी ही बुद्धी तुला उत्पन्नच कशी झाली ? या कुलात ज्येष्ठ पुत्रालाच राज्याभिषेक होत असतो. इक्ष्वाकूच्या कुलात तर हा नियम विशेष कटाक्षाने पाळण्यात आला आहे. धर्माचे संरक्षण करणे हेच केवळ त्यांच्या

राजदंडाचे महाव्रत आहे. या कुळाच्या कीर्तीत आपल्या दैदीप्यमान चारित्र्याने भरच टाकणाऱ्या महापुरुषाच्या कर्तृत्वाने या कुलाच्या उदात्त चारित्र्याचे जे परिमाण उत्पन्न झाले होते ते तू पार घालविले आहेस. या कुळाचा नाश करून तू भ्रूणहत्येचे पातक केले आहेस. तुला नरकातच स्थान मिळेल. तुझ्यासाठी माझे वडील मृत्यूच्या स्वाधीन झाले. केवळ तुझ्याचसाठी रामचंद्राला वनवास पत्करावा लागला व इहलोकात माझ्या कीर्तीला पूर्णपणे काळिमा फासून तू माझ्या यशाचा मार्ग कायमचा बंद करून टाकलास.'

अशा रीतीचे हे 'रामायणा' तील कैकयीचे चारित्र्य आहे. मूळ 'रामायण' अथवा रामायणावरील कोणतेही भाष्य वाचले तरी त्यामधून बा. भ. बोरकर चित्रितात तशी 'प्रियकामा' अथवा 'श्रेयकामा' म्हणून कोणाच्याही डोळ्यापुढे उभी राहात नाही.

आणि कैकयीला 'प्रियकामा' करण्याचे, तसे तिचे चित्र कादंबरीत उभे करण्याचे बोरकर यांचे सर्व प्रयत्न फसले आहेत. त्यामध्ये त्यांनी महर्षी वाल्मीकीनाही न्याय दिला नाही, कैकयीलाही न्याय दिला नाही आणि या कादंबरीच्या रसिक वाचकांनाही न्याय मिळत नाही.

कैकयीला उदात्त करण्यासाठी बोरकर यांनी कादंबरीमध्ये जे प्रयत्न केलेले आहेत, ते कुठल्याच कसोटीला उतरत नाहीत. अयोध्येच्या राज्याला दक्षिणेकडून रावणाचा धोका होता. त्या धोक्याचे निवारण करण्यासाठी, म्हणजे पर्यायाने राज्याच्या हितासाठीच कैकयीने रामाला चौदा वर्षे दक्षिणेत पाठविले, हे तर्कशास्त्र किती धोक्याचे आहे हे बोरकराच्या लक्षात आलेले दिसत नाही! एक तर सर्व 'रामायणा'त रावणापासून अयोध्येच्या राज्याला धोका होता असे वर्णन नाही. तसे राजकारणही कुठे वाल्मीकीच्या या महान कलाकृतीमधून व्यक्त झालेले दिसत नाही. एक तर 'रामायण' हे महाकाव्य 'महाभारता' सारखे मानवी जीवनाच्या सर्व अंगांना प्रखरतेने आणि तितकेच त्वेषाने स्पर्श करीत नाही. मानवी स्वभावाचे एक काव्यात्म, कारुण्यमय आणि तितकेच एका आदर्श जीवनाचे प्रतीक म्हणूनच आजवर ते वाचकाच्या पुढे उभे आहे.

त्यामध्ये राजनिष्ठा, पितृधर्म, पुत्रकर्तव्य आणि मातृप्रेम याच भावना प्रामुख्याने व्यक्त झालेल्या आहेत. रावणाचे जे रामाशी युद्ध होते त्याचे स्वरूप लंका विरुद्ध अयोध्या असे नसून सीताहरण हे आहे. कलिपुरुष म्हणून रावण जितका डोळ्यांत खुपत नाही तितकी दुष्टा म्हणून कैकयी सर्वांसमोर उभी राहते. स्त्री या नात्याने युद्धात दशरथाचे प्राण वाचविणे हे जेवढे कैकयीचे महत्कृत्य आहे तेवढेच संतुष्ट होऊन राजाने तिला दिलेल्या दोन वराचा दुरुपयोग करण्यामुळे तिचे चारित्र्य कलंकित होते.

महाभारतात द्रौपदीने ज्या प्रकारे दोन वर मागून घेतले त्यामध्ये जी उदात्तता आणि शीलसंपन्नता दिसून येते ती येथे कैकयीच्या बाबतीत दिसत नाही.

'रामायण' या आपल्या प्रसिद्ध ग्रंथात श्री. राजगोपालाचारीसारखे सर्वश्रुत अभ्यासू लेखकदेखील कैकयीचे मूल्यमापन वाल्मीकीच्या काव्यग्रंथाशी प्रामाणिक राहूनच करतात. त्यांचे इंग्रजीमधील 'रामायण' आणि महाभारत हे दोन्ही ग्रंथ जगभर गाजलेले आहेत. त्यांनी आपल्या रामायणावरील पुस्तकात कैकयीला दुष्ट ठरविलेच आहे; पण तिच्या स्वभावाचे आणि चारित्र्याचे मूल्यमापनही फार मार्मिक रीतीने केलेले आहे. कैकयी ही मूळची दुष्ट नाही. रामाच्या वनवासाचे हे जे सारे रामायण घडले ते जरी कैकयीच्या शब्दामुळे घडले असले तरी या दुष्टचक्रामागे कैकयीच्या दासीचा, मंथरेचा मोठा हात आहे. सी. राजगोपालाचारी यांच्या 'रामायण' या ग्रंथात 'Manthara's evid Counsed' हे एक प्रकरणच आहे. त्यामध्ये कैकयीच्या संदर्भात एक वाक्य असे आहे, 'Kaikeyi's mind was sxill uncorrupted. She had the culture of her noble fineage and was not easily amenable to law thoughts.' आहे.

तसेच त्यांच्या पुस्तकाच्या १३ व्या प्रकरणाचा मथळा 'Kaikeyi Succumbs' असा आहे. आणि १४ व्या प्रकरणाचा मथळा, 'Wife or Demon?' असा आहे. ही सारी प्रकरणे जर जिज्ञासू वाचकांनी काळजीपूर्वक वाचली तर कैकयीच्या स्वभावचित्रावर चांगलाच प्रकाश पडतो हे सहज लक्षात येईल. कैकयी ही चित्रकार होती, निपुण अश्वारोहक होती, युद्धतंत्राची जाणकार होती आणि भाबड्या, प्रेमळ व प्रसन्न व्यक्तिमत्त्वाची स्त्री होती; परंतु हलक्या दर्जाच्या दासीच्या कपटकारस्थानाला ती बळी पडलेली एक दुर्भागी स्त्री होती. असे तिचे चित्र सर्व 'रामायण' भर आहे.

तिच्यामध्ये कुठल्याही प्रकारे एखाद्या ललितकृतीची नायिका होण्याचे गुणही नव्हते आणि एवढे अनेक पदरी तिचे व्यक्तिमत्त्वही नाही. बोरकर यांना म्हणूनच कितीही प्रयत्न करून आपल्या कादंबरीमध्ये तिच्या व्यक्तिमत्त्वात जीव भरता आलेला नाही. ज्या वेळी आपापल्या उदात्त जीवननिष्ठा, ध्येयनिष्ठा, पतिव्रताधर्म, बंधुप्रेम, लोककल्याणाचे व्रत, असे निरनिराळे जीवनधर्म आणि भावधर्म घेऊन या 'प्रियकामा' नावाच्या कादंबरीत राम, भरत, लक्ष्मण, सीता, सुग्रीव, बिभीषण, मंदोदरी अशी व्यक्तिमत्त्वे येतात तेव्हा बोरकराची 'प्रियकामा' निस्तेज होत जाते. पूर आलेल्या एखाद्या ओढ्याचे पाणी तासा-अर्ध्या तासात ओसरून जावे तसे बोरकर यांच्या कैकयीचे व्यक्तिमत्त्व या कादंबरीत ओसरत जाते.

'सत्य, शिव आणि सुंदर' या त्रयीविषयीच्या ललितसाहित्यामधील वाद सर्वश्रुतच आहे. त्या वादासंबंधीची चर्चा अथवा चिकित्सा येथे सविस्तरपणे करण्याचे कारण नाही. या त्रयीचे महत्त्व ललितकलाकृतीप्रमाणेच इतरही कलांना लागू आहे. आपण म्हणू तेच सत्य असा आग्रह जरी मानवी जीवनात ठायी ठायी दिसत असला तरी सत्य तेथे तेवढ्यापुरतेच थांबत नसते. सत्याचा शोध जगात अखंडपणे चालू आहे. कोणत्याही कलाकृतीमधील चैतन्य सत्याभावी निर्जीवच ठरलेले आहे. जीवनाला 'सत्य, शिव आणि सुंदर,' यांच्या अस्तित्वामुळे तोल येतो तसाच तो कोणत्याही कलाकृतीमध्ये याच प्रकाराने साधला जात असतो.

कलावंताची सत्य शोधण्याच्या बाबतीत केवढी झटापट चाललेली असते याचे मी अगदी जवळून पाहिलेले एक उदाहरण आहे. आंतराष्ट्रीय कीर्तीचे चित्रकार श्री. गोपाळराव देऊसकर हे लोकमान्य टिळकांचे एक तैलचित्र तयार करण्यात गुंतलेले असताना टिळकांच्या मिशा आणि त्यांचे वळण कसे

होते हे जाणून घेण्यासाठी, म्हणजेच सत्याच्या शोधासाठी त्यांनी दिवसच्या दिवस संशोधनासाठी घालविलेले आहेत. तसेच नामजोशी यांच्या पेहेरावाबद्दल ते सत्यशोधनाच्या मार्गावर किती तरी दिवस अस्वस्थ होते हे मी पाहिलेले आहे. हे झाले चित्रकलेच्या बाबतीत; परंतु ललितकृतींच्या बाबतीत देखील सत्याच्या शोधाला पर्याय नसतो.

सूर्य पूर्वेला उगवतो आणि पश्चिमेला मावळतो हे जसे प्रस्थापित सत्य आहे, तसेच महान कलाकृतींमधूनही त्या कलाकृतींच्या निर्मात्यांनी जीवनाच्या संशोधनामधूनच सत्य शोधून काढलेले असते. त्या सत्याच्या कसोटचा त्याच्या कलाकृतीमधूनच सहज शोधता येतात. जीवनातील ज्या प्रकारचे सत्य महर्षी महर्षी वाल्मीकींनी ‘ रामायण ’ लिहिताना शोधले आाण त्या सत्याचा आविष्कार ‘ शिव आणि सुंदर ’ याचा आश्रय घेऊन त्यांनी केला, त्या सत्याची आणि त्यामुळे निर्माण झालेल्या सौंदर्याची अवहेलना करून बोरकरांना कैकयीच्या बाबतीत एक निराळेच सत्य प्रस्थापित करता येणार नाही. तसा प्रयत्न करू गेल्यास सत्य तर हाती लागणारच नाही. उलट ‘ शिव आणि सौंदर्य ’ या वाङ्मयीन संकल्पनांना देखील मुकावे लागेल आणि तसे ते बोरकर यांच्या ‘ प्रियकामा ’ या कादंबरीच्या बाबतीत झालेले आहे. कैकयीच्या बाबतीत स्वत:चे एखादे सत्य प्रस्थापित करण्याच्या खटपटीमध्ये जेव्हा बोरकर असतात तेव्हा रामायणातील इतर शब्दचित्रे अथवा स्वभावचित्रे आणि त्यामधून प्रस्थापित झालेले ‘ सत्य, शिव आणि सौंदर्य ’ यांचे परिमाण ढळते हे बोरकरांच्या लक्षात आलेले दिसत नाही आणि ही अशी वजने कमी-जास्त झाल्यामुळे बोरकरांनी मुळात कल्पिलेल्या ‘ प्रियकामा ’ या नायिकेचेही वजन आणि परिमाण ढळते. जसे ‘ रामायणातील संस्कृतिसंघर्ष ’ पुस्तकाच्या बाबतीत प्रा. कांबळे यांचे झालेले आहे.

म्हणूनच प्रागैतिहासिक काळातील महाकाव्यामधून जी महान व्यक्तिचित्रे निर्माण झालेली आहेत आणि आज हजारो वर्षे उलटून गेल्यानंतरही त्यांची पकड जनमानसावर कायम आहे, त्यामध्ये कैकयीचे व्यक्तिचित्र अगदीच एकपदरी आणि क्षणजीवी आहे. सी. राजगोपालाचार्य यांनी आपल्या रामायणावरील ग्रंथात म्हणल्याप्रमाणे कैकयी ही एक विघटनवादी स्त्री आहे, ती भावडी आहे; प्रेमळ आहे; प्रेयसी आहे, परंतु परप्रकाशित आहे. अशी वस्तुस्थिती असल्यामुळे बोरकर यांनी या व्यक्तिचित्राला आपल्या परीने कितीही अर्थ देण्याचा प्रयत्न केलेला असला तरी त्या अर्थाचे प्रस्थान सत्यावर आधारित नसल्यामुळे त्यामधून सौंदर्यनिर्मिती होत नाही असे म्हणण्यावाचून गत्यंतर नाही.

मात्र ‘ प्रियकामा ’ या कादंबरीच्या पानापानामधून बोरकर यांच्या कविमनाची जाणीव सतत होत राहते आणि त्यांच्या प्रसन्नशैलीचे तसेच दर्शन घडते; परंतु ललितकलाकृतीची ही केवळ उपांगे आहेत. □

‘ प्रियकामा ’
लेखक : बा. भ. बोरकर
सुरेश एजन्सी, पुणे
किंमत चाळीस रुपये.

---

# गप्पांचा पाऊस

शोभा भागवत

‘ अमिताभ बच्चन आहे ना तो त्याच्या मुलांना टी. व्ही. किंवा सिनेमा पाहू देत नाही. मला मंजू सांगत होती तिनी पेपरात वाचलं म्हणून.’

इति आभा. वय वर्षे आठ.

‘ का ?’–मी.

‘ त्यानी त्याच्या मुलांना सांगितलेलं नाही तो सिनेमात काम करतो म्हणून ’

‘ का नसेल सांगितलं ?’

‘ त्याला असे वाटत नाही की त्याच्या मुलांनी पण नट व्हावं.’

‘ काय झालं नट झालं तर ?’

‘ नट झालं म्हणजे नटावं लागतं ना खूप !’

‘ काय नटावं लागतं ?’

‘ आता अमिताभ बच्चन म्हणजे कुठल्याही सिनेमात असो त्यांनी पट्टा घातलाच पाहिजे. पट्टा म्हणजे अगदी असलाच पाहिजे.’...

आभा सध्या भयंकरच फॉर्मात आहे. ती केव्हा काय बोलेल त्याचा अंदाज करणे कठीणच असतं. जो नटतो तो नट हे तिचं तर्कशास्त्र दिसतंय.

मुलांचं हे तर्कशास्त्र सगळीकडे काम करत असतं. अलीकडे आमच्या बऱ्याच मित्रमंडळींना बाळं झाली. त्यामुळं बाळं ह्या विषयातलं कुतूहल वाढलं. एकदा खेळताना ती कुणाला तरी म्हणत होती. ‘अरे, हळू, हळू माझं पोट एवढ्या जोरानं दाबू नकोस. बाळ बाहेर येईल ना त्यातून !’ असं का म्हणते आहेस विचारलं तर म्हणते मोठेपणी बाळ होतं म्हणजे लहानपणी अगदी एवढुसं चिंगुलं बाळ पोटात असणारच !’

मुलांचं हे गमतीचं बोलणं मला नेहमीच भुरळ घालत आलं आहे. ही संभाषणं लिहून ठेवली पाहिजेत. नंतर ती आठवत नाहीत असं मी कायम मनाशी म्हणत आले. काही लिहिली, काही नाही लिहिली. सध्या ज्यांची मुलं नुकतीच बोलायला लागलीत त्यांना मोठ्या आशेने मी विचारते, ‘ तुम्ही काही मुलांचं लिहून ठेवताय् की नाही ?’ काही सुरुवातीला मोठ्या उत्साहानं लिहितात मग ते बंद पडतं.

नुकतंच अचानक एक पुस्तक हाती आलं. त्याचं नाव आहे Conversations with Children आणि लेखक किंवा संग्राहक

आहेत Dr. R. D. Laing डॉ. लेंग हे मनोरुग्णांवर उपचार करणारे, मानसशास्त्रात संशोधन करणारे डॉक्टर आहेत. त्या विषयातलं बरंच लेखन त्यांनी केलंय.

ह्या गृहस्थांनी सलग सहा वर्षं आपली मुलं काय बोलतात याची टिपणं केली आहेत. ह्या संभाषणांचं रेकॉर्ड ठेवण्यासाठी कधीही टेपरेकॉर्डरचा उपयोग केलेला नाही. बहुतेक संभाषणं घडल्यानंतर चोवीस तासांच्या आत ती लिहून ठेवलीत.

हे लेखन करताना मुलाचा त्या त्या वेळचा आवाज, त्यातला ठेका, त्यातला जोर, शब्दाची जात, त्याच्या हालचाली, आवेश हे पकडता आलेल नाही याचं डॉक्टरांना वाईट वाटतं आहे. त्याचबरोबर मुलांबरोबर आपल्याला फारसं रहाता येत नाही. त्याचं तान्हेपण, बोबडेपण लवकर संपून जातं याचही वाईट वाटत आहे.

हे पुस्तक वाचताना फार गमत वाटली. मजा आली. मनात नकळत आपली मुलं कशी बोलतात आणि ही ब्रिटिश मुलं कशी बोलतात त्याची तुलना होत होती.

पहिलंच संभाषण असं– मुलगा आणि वडील यांच्यातलं.

मुलगा : तुमच्याकडे एक मोठी काठी आहे का ?

वडील : सॉरी. नाही रे.

मुलगा : मग शिडी तरी आहे का ?

वडील : कशाला हवीय तुला ?

मुलगा : मला सूर्याला खाली पाडायचंय आणि त्याचे दोन तुकडे करायचेत आणि आईला ते शिजवायला द्यायचेत. मग ते आपण खाऊन टाकू !

वडील : पण आकाशात सूर्य नसेल तर आपलं कसं होणार ?

मुलगा : मला नाही आवडत सूर्य.

वडील : का बरं ?

मुलगा : बोअर करतो !

वडील : आहा ! सूर्य ! मला फार आवडतो सूर्य !

मुलगा : मी दुसरा आणीन.

वडील : कसा काय ?

मुलगा : विकत आणीन.

वडील : कुठून ?

मुलगा : त्या 'वुलवर्थ' दुकानातून.

वडील : तू सूर्याचं असं करणार असलास तर बरंच झालं माझ्याकडे शिडी नाहीय ते.

मुलगा : च् च्. बाबा काय तुम्ही ! मला असं पाय उंच करून उभं राहता येईल आणि काठीनी सूर्याला पाडता येईल असं काहीच नाही का तुमच्याकडे ?

हा मुलगा असं खूप वेळा काय काय विध्वंसक बोलतो. बदूक घेऊन मला लोकाना ठार मारायचंय् म्हणतो. मग वडलांना विचारतो, 'मी गेल्या जन्मी सैनिक होतो आणि मी खूप खूप लोक मारले. तुम्हाला नाही आठवत तुम्ही पण मारलेत ते ?'

ह्या मुलाचं नाव अॅडम आहे आणि त्याची धाकटी बहीण आहे तिचं नाव आहे नताशा.

ही नताशा भलती गोड लाघवी मुलगी आहे. ती वडलाना विचारते–

'तुमच्या अंगावर उडी मारू ?'

'हो!'

'नक्की ना ?'

'हो ग !'

'बघा हं. आता मी पाच वर्षांची आहे, पावणेपाच वर्षांची नाही.'

आपल्या मनातलं काय काय ती अगदी महत्त्वाचं म्हणून वडलांना, आईला सांगत असते. ती म्हणते–

'बरं का बाबा, मी कदाचित मॅथ्यूशी लग्न करीन. त्यानी नाही केलं तर कदाचित अँथनीशी, त्यानी नाही केल तर मग अँड्रयूशी आणि त्यानी पण नाही केलं तर ?

मग मात्र मी मायकेलशी करीन.' ही सगळी माळ ऐकून आई विचारते–

'यात चार्लीचं नाव नाही आलं ते ?' त्यावर आईचा हा भोचकपणा न आवडून ती म्हणते, 'मला जो आवडेल त्याच्याशी मी करीन !'

भावाशी तिची जबरदस्त स्पर्धा आहे. त्याच्या आधी, त्याच्यापेक्षा जास्त, त्याच्याहून चागलं असं सारखं चालू असतं.

आईवडील मित्रमंडळींशी बोलत असतात ही एक छोटीशी बाटली घेऊन येते. वडलांना म्हणते–'हे बघा.'

'काय ग ?'

'तुम्हाला आवडली माझी बाटली ?'

'ठीक आहे की.'

'मी बाटल्या जमवते आहे.'

'कशासाठी ग ?'

'मला अॅडमपेक्षा जास्त जमवायच्यात.'

'गमतच आहे. आणखी काय करतेस अॅडमपेक्षा जास्त ?'

'आज माझी आघोळ संपल्यावरसुद्धा मी आणखी पाणी डोक्यावर ओतून घेतलं अॅडमपेक्षा जास्त.'

'हो का ? मला माहीतच नव्हत.'

'आणि मी माझ्या सगळ्या बाटल्या पाण्यान भरणार आहे.'

'मग तुझ्याकडे पाणीसुद्धा अॅडमपेक्षा जास्त होणार ?'

'खरंच की !'

वडलाना ती म्हणते.

'बाबा, मला तुमच्याशी लग्न करायचय्.'

'अस कस करता येईल ?'

'का नाही ?'

'आपण एका कुटुबातले नाही का ?'

'मग काय झालं ? आई नाही का आपल्याच कुटुबातली, तिच्याशी कसं केलत ?'

'आम्ही लग्न केलं तेव्हा काही आम्ही एका कुटुबातले नव्हतो. त्यामुळे आम्ही ठरवलं.

It is all right to get married and have children' यावर हा मुलगा अॅडम जे म्हणतो ते वाचल्यावरचा माझा धक्का अद्याप गेलेला नाही. तो म्हणतो–

By putting your penis into Mummy's vagina ?'

हे ऐकून मग आई म्हणते, 'चला, झोपायची वेळ झाली' आणि झोपायला जाता जाता हा आठ वर्षांचा मुलगा आईची पापी घेऊन म्हणतो, 'नताशाला बाबाशी लग्न करायला आवडल असतं आणि मला तुझ्याशी !'

हे सभाषण वाचताना वाटलं की, डॉ. लेंगनी ह्या सभाषणाची पार्श्वभूमी किंवा त्या त्या वेळी त्याच्या झालेल्या प्रतिक्रियाही लिहायला हव्या होत्या. मुलं कशी होतात हे सागताना आई-वडलानीच हे एवढ्या स्पष्ट शब्दात मुलांना समजावून दिलं असेल का ?

आपले पालक मुलाना अनेक विषयांचं ज्ञान जास्तीत जास्त स्पष्ट शब्दात द्यायला लागलेत; पण ह्या विषयात कसं बोलावं, काय सांगावं हा संभ्रम असतोच. मोठ्या

धीटपणे समजावून सांगायला सुरुवात करून नंतर मात्र तिडपिडायला होत हाही अनुभव अनेकांना असेल. हे संभाषण म्हणूनच विचारात पाडत.

ह्या मुलीला कोडी घालण्याचीसुद्धा खूप हौस आहे. घरी प्रथमच आलेल्या वडलांच्या एका मित्राला ती विचारते,

'सक्काळी सक्काळी उठून दुकानात कोण जातं?'

'नाही बुवा सांगता येत.' तो गृहस्थ खूप विचार करून सांगतो.

'दुकानदार' नताशा उत्तर सांगते.

ती भावाला विचारते—

'मोर का ओरडतो?'

'कारण तो स्वतःला दिसत नसेल.'

'नाही काही. त्याला आपला आवाज ऐकायचा असेल.'

ती वडलांना विचारते, 'बागेत आपण पहिल्यादा काय घालतो?'

वडील म्हणतात, 'काय बुवा?'

ती म्हणते, 'आपला पाय!'

एकदा मात्र भाऊ तिला छान उत्तर देतो. ती विचारते—

'त्या मुलानी खिडकीतून घड्याळ का फेकून दिलं असेल?'

तो म्हणतो, 'त्याला वेळ कसा उडून जातो ते पहायचं असेल.'

कधी कधी मात्र तिला भावाचा भयंकर राग येतो, मग ती चिडून आईला म्हणते,

'तो मेला असता तर बरं झालं असतं.'

आई म्हणते, 'असं बोलू नये.'

'त्याचं बीजच पोटात असताना चिरडून टाकायला हवं होतं.'

'अग, तो तुझा भाऊ आहे. तो नसला तर तुला करमणार नाही.'

'मला नकोच आहे करमायला.'

ह्या मुलांच्या संभाषणांमध्ये असा प्रेमाचा वर्षाव आहे. लुटुपुटीचा संताप आहे. रुसणंफुगणं आहे. चतुरपणा आहे. काही काही वेळा तर ही मुलं इतकं साधं — पण काव्यमय, तरल बोलतात की, ही संभाषणं गारासारखी आहेत असं वाटायला लागतं. तो हाती धरे–धरेतो वितळून जातात; पण तरी त्यांचं आकर्षण कायम राहतं. त्यामुळं हे पुस्तक म्हणजे अगदी चिरंजीव केलेला गारांचा पाऊसच वाटतं.

यातून पालक-मुलांचं नातं आणि त्यातल्या त्यात वडलांची संवेदनक्षमता लोभसवाणी वाटते. मुलगी एकदा वडलाना सांगायला येते—

'मला नवा दात आलाय.'

'बघू बघू. मला हात लावून बघू बरं.'

'हं. तोच; पण मी कोणाला सांगणार नाही.'

'का बरं?'

'म्हणजे इथल्या तर आता सगळ्यांना मी सांगितलंच आहे; पण लंडनमधल्या कुणालाही सागणार नाहीय.'

'नाही?'

'आज्जिबात नाही. कारण ते आमचं गुपित आहे आणि सगळ्याना सांगितलं तर मग ते कसलं आलंय गुपित?'

'हो ना. अगदी बरोबर आहे तुझं.'

अशा वेळी जाणवतं की, ही मुलं बोलतायत हे जितकं खरं आहे तितकंच हे वडील मुलाना बोलकं करतायत हेही महत्त्वाचं. कदाचित आपल्याही मुलाना असं काही खूपसं बोलावंसं वाटत असेल आणि आपण ते पुरेसं, नीट ऐकत नसू असं तर नसेल?

मुलाना मोकळेपणानी बोलता येत असल, बोलण्याला दाद मिळत असली की, ती काय काय विचारतात! या मुलाचे काही प्रश्न असे विचारात पाडतात—

देव आत्महत्या करू शकतो का?

टी व्ही. वर सगळं खरं सांगतात का?

सगळ्या जगात प्रत्येकाला हसता येतं का?

Love poems असतात तशा hate poems असतात का?

दहा मिनिटं म्हणजे अर्ध्या तासापेक्षा जास्त ना?

परवा म्हणजे दोनदा झोपून उठल्यावर का?

बाबा, आई तुम्हाला तुमची आई म्हणून आवडेल का?

वडील केस कापून येतात, त्यांच्याकडे पुन्हापुन्हा पाहत ती विचारत राहते, 'तुम्ही ते मघाचेच डॅडी आहात का? का वेगळे डॅडी आहात?'

ह्या मुलांना वाढदिवसाचं प्रचंड आकर्षण आहे. कोण कोणाहून मोठं याचे हिशेब चालतात.

एकदा आपला वाढदिवस आला की, नतर वडिलांचा आपल्या आधी येतो आणि वडलांचा झाला की, आपला वडलांच्या आधी येतो ही काय भानगड आहे? हे कोडं काही केल्या नताशाला सोडवता येत नाहीय.

ह्या संभाषणात गंमतीचे खेळपण आहेत. वार पाठ करताना ते मुद्दाम उलट–सुलट म्हणणं, चुकवणं चालू आहे, तर नाकाकडे बोट दाखवून हा माझा पाय म्हणायचं. डोळ्याकडे बोट दाखवून हे माझं नाक म्हणायचं. पायाकडे बोट दाखवून हे माझे डोळे म्हणायचं. कुल्ल्याकडे बोट दाखवून हे माझं डोकं म्हणायचं हा खेळ चालू आहे. मग त्यात एकदम नवीन कल्पना सुचून हाताची घडी घाला. पायाची घडी घाला म्हणायचं आणि नाकाची घडी घालता येत नाही म्हणून खिदळायचं असं चालू आहे.

आई-वडलांचं एकदा भांडण झाल्यावर आई एकटीच बाहेर जाते. वडील टेबलाशी बसलेले असतात. तर ही नताशा दोन कागद घेते. त्यांच्या घड्या घालत आणि सेलोटेपनी ह्या दोन घड्या एकमेकाना बांधून टाकते आणि वडलांना देते आणि म्हणते, हे तुम्ही दोघं बरं का? ही आई आणि हे तुम्ही.

आई एकदा रडत असताना ती आईला विचारते—

'तुला वाईट वाटतंय का?'

'हो!'

'तुला जीवनाचं वाईट वाटतंय का?'

'हो!'

'तरी तू मला आवडतेस.'

'मी तुझी आई होऊ का?'

'कसं ग विचारतंय!'

'मी तुझी आई होते. तू थोडा वेळ विश्रांती घे बरं का!'

'बरं!'

'ठीक आहे!'

मग ती आईला मिठी मारते. पापा घेते. पळून जाते. थोड्या वेळानं परत येते.

'आता काही मला तुझी आई म्हणून राहायचं नाही. तुला छान वाटल ना?'

'हो. थँक यू!'

'छान! आता नाही ना फार वाईट वाटत?'

'नाही!'

हे प्रेम, हा विश्वास, ही काळजी, हा गोडवा. मोठी माणसं एकमेकांना देऊ शकली तर काय बहार होईल!'

ह्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत डॉ. लॅंगनी जे लिहिलंय, तेही समजून घ्यायला हवं. ते म्हणतात–

'माणसामाणसातला सुसंवाद किंवा विसंवादाचा अभ्यास करणं मला आनंदाचं वाटतं. आपलं इतरांशी पटणं किंवा न पटणं याला फार महत्त्व आहे. कारण त्याचा परिणाम आपल्या मनावर, बुद्धीवर, शरीरावरही होत असतो. तो भाषणावर आणि पर्यायानं समाजावरही होतो.

माणसामाणसातल्या संवादात गाठी नसाव्यात. गुंतागुंत नसावी. काही लपवलेलं-छपवलेलं नसावं. वास्तव जाणून घेण्याचा प्रयत्न असावा.

आपला मुलांशी संपर्क राहायला हवा. मोठ्या माणसांच्या वाढीत आणि विकासात लहान मुलांचा फार मोठा वाटा असतो. मी मुलांबरोबर वेळ घालवतो तो मला आवडतं म्हणून. नाइलाजानं नव्हे.'

ह्या पुस्तकाच्या रूपानं डॉ. लॅंगनी मुलांच्या विश्वात आपल्याला फिरवून आणलंय. निरनिराळ्या कुटुंबामधली, वेगवेगळ्या संस्कृतीमधली अशी मुलांची संभाषणं हाती आली तर काय मजा होईल! ह्या मुलांचं बोलणं हे आपल्या मुलांपेक्षा वेगळं वाटतं. काही विषय वेगळे वाटतात; पण तळाचा स्फूर्तीचा झरा मात्र एकच जाणवतो.

अशी मुलांची संभाषणं नोंदवत गेलो, तर मुलांचं साहित्य, मुलांची नाटकं यातली मुलांची भाषा ही मुलांचीच भाषा राहील. मोठ्या माणसांची वाक्यं लहान तोंडी कोंबायची वेळ येणार नाही. मुलं आपल्याला जास्त समजतील.

ह्या संभाषणांमधली गंमत, विनोदच केवळ आकर्षक नाही. त्यामागे दिसणारं मुलांचं मन, त्या मनात येणारे विचार, त्यातलं तर्कशास्त्र, त्यातली प्रेमाची जात, रागाचा पारा, स्वत्वाची जाणीव, त्यातली भीती हे सगळंच विचार करण्याजोगं आहे

तुम्ही हे पुस्तक जरूर वाचा आणि जर वाचायला जमलं नाही तर निदान त्याहून एक सोपी गोष्ट करा. असं एक पुस्तक लिहा. खरंच सोपं आहे ते. प्रत्येक पालकाला असं पुस्तक लिहिता यायला हवं. येईल आणि कल्पना करा मुलांना ते मोठेपणी वाचायला किती आवडेल!

आमच्या एका मित्र-जोडप्याला म्हटलं तुम्ही लिहा बरं का आता मुलांचं सगळं. त्यावर स्वतंत्रपणे दोघांनी आश्वासनं दिलीत. तो म्हणाला–

'मी सांगितलंय अनूला तू लिही म्हणून.' आणि अनू म्हणाली–

'मी नेहमी आठवण करते संदीपला लिही लिही म्हणून!'

□

विज्ञानेश्वरी

# युगप्रवर्तक शास्त्रज्ञ ग्रेगर मेंडल

**मानवी विचारांत विलक्षण क्रांती करणाऱ्या तीन व्यक्ती डार्विन, मार्क्स व मेंडेल अनुक्रमे १८८२, १८८३ व १८८४ या वर्षी मृत्यू पावल्या. मेल्या शतकाला 'डार्विन सेंच्युरी' व त्याच्या 'दि ओरिजिन ऑफ स्पीसीज' या पुस्तकाला 'दि बुक ऑफ दि सेंच्युरी' असे म्हणतातच. कार्ल मार्क्स व ग्रेगर मेंडेल यांचे महत्त्व मानवी इतिहासात डार्विनइतके नक्कीच आहे; पण हे दोघे काहीसे दुर्दैवी ठरले. कारण त्यांच्या कार्याचे महत्त्व त्यांच्या मृत्यूपर्यंत फारसे कोणाला पटले नव्हते, त्यांचे कार्य प्रसिद्ध किंवा फलद्रूप झाले नव्हते. मेंडेल यांच्या मृत्युशताब्दीच्या निमित्ताने हा लेख.**

अनुवंशशास्त्र ( Genetics ) ही आधुनिक जीवशास्त्राची अत्यंत महत्त्वाची शाखा आहे. ग्रेगर मेंडेल त्या शाखेचा जनक आहे. आईबापाचे गुणधर्म पुढील पिढीत कसे उतरतात याचे नियम मेंडेलने प्रथम शोधून काढले. त्याला मरून नुकतीच ( जानेवारी १९८४) शंभर वर्षे पूर्ण झाली; पण त्याने केलेले संशोधन, त्याने काढलेले निष्कर्ष इतकेच नव्हे तर त्याची प्रयोगपद्धती आजही जीवशास्त्रात आदर्श बनून राहिली आहे. अगदी प्राथमिक स्वरूपात का होईना जीवशास्त्रातील निष्कर्षांसाठी मेंडेलने सांख्यिकीचा सर्वांत प्रथम उपयोग केला.

जोहान मेंडेलचा जन्म २२ जुलै १८८२ रोजी हायझेंडॉर्फ येथे एका सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. एके काळी ऑस्ट्रियन साम्राज्यात असलेला हा प्रदेश आता युगोस्लावियाचा भाग आहे. जोहानच्या वडिलांना शेतातील रोपावर निरनिराळे प्रयोग करण्याचा नाद होता. त्यात जोहानही भाग घेत असे. लहानपणापासून शास्त्रीय विषयाची आवड असली तरी तो फार हुशार होता असा कोठे उल्लेख नाही. तो फार शिकला नाही; पण आपला अभ्यास व वाचन चालू ठेवता यावे म्हणून त्याने ऑगस्टीनियन पंथाची दीक्षा घेतली व तो ब्रनो येथील मठात राहू लागला. दीक्षेच्या वेळी त्याला ग्रेगर हे नवे नाव देण्यात आले म्हणून तो पुढे ग्रेगर मेंडेल म्हणूनच ओळखला जाऊ लागला. मठात त्याला अनेक पण किरकोळ कामे करावी लागत. भोवतीच्या वस्तीतील मुलांना शिकविण्याचे कामही तो करीत असे व ते त्याला आवडत असे. मठाच्या अधिकाऱ्यांच्या लक्षात आले तेव्हा त्यांनी मेंडेलला व्हिएन्ना विद्यापीठात प्रशिक्षणासाठी पाठवले. मेंडेल १८५१ ते १८५३ अशी दोन वर्षे विद्यापीठात राहिला; पण तो पदवी मिळवू शकला नाही. १८५३ मध्ये तो ब्रनो येथील

मठात परत आला. मात्र पदवीपरीक्षेत नापास झाल्यामुळें आता तो मुलांना शिकविण्यास नालायक ठरला होता. सर्वच दृष्टीनी कुचकामी ठरलेला ३१ वर्षांचा तरुण मेंडेल त्या वेळी अगदी निराश झालेला होता.

व्हिएन्ना विद्यापीठात त्या वेळी प्रा. फ्रान्झ उंजर जीवशास्त्र शिकवीत असत. तेथे असताना मेंडेलचा व प्रा. उंजर यांचा दाट परिचय झाला. वडिलोपार्जित गुणधर्मांविषयी त्या वेळी समाजातच नव्हे तर वैज्ञानिक क्षेत्रातही अनेक गैरसमजुती होत्या. कबुतरे, घोडे किंवा दुभत्या जनावरांची खास निपज करणारे व्यावसायिक लोक तेव्हा खूप होते. त्यांचे व्यावहारिक ज्ञान व जीवशास्त्रज्ञांचे सिद्धांत यांचा काहीच मेळ नव्हता. प्रा. उंजर यांचे आनुवंशिकतेसंबंधीचे विचार अत्यंत व्यवहारी होते. दैवी कृपा, आत्म्याचे सातत्य इ. शब्दावडबराकडे मुळीच लक्ष न देता प्रत्यक्ष प्रयोगातून जे मिळेल तेच खरे असा उंजर यांचा विश्वास होता. या प्राध्यापकाचा जो काही थोडासा सहवास मेंडेलला मिळाला त्याने मेंडेलच्या मनावरही हा वास्तव, व्यवहारी दृष्टिकोण चांगलाच ठसला. शेतकरी कुटुंबात जन्मलेला असल्याने निरनिराळ्या रोपावर प्रयोग करण्याची मेंडेलला आवड होतीच. शिक्षक म्हणून नालायक ठरल्यावर त्याने ब्रनोच्या मठातच एकीकडे जरासुद्धा गाजावाजा न करता वनस्पतीवर आनुवंशिकतेसंबंधी प्रयोग करायचे ठरवले.

## चुकीची समजूत


प्रत्यक्ष प्रयोगांना सुरुवात करण्यापूर्वी मेंडेलने दोन गोष्टींची काळजी घ्यायची असे ठरवले. वंशशुद्धी, जातिवंतपणा, शुद्ध रक्त इ. गोष्टीबद्दल खूप बोलले व लिहिले जाते. त्यासाठी विषप्रयोग, खून इतकेच नव्हे तर लढाया होतात हे मेंडेलला माहीत होते. परंतु हजारो वर्षे या विषयावर चर्चा होऊन सुद्धा, त्यासंबंधी नेमकेपणी कोणी काही सांगितले नव्हते. एक विज्ञानाचा अभ्यासविषय म्हणून आनुवंशिकतेकडे मेंडेलच्या आधी कोणीही पाहिले नसेल. ही पहिली गोष्ट मेंडेलने केली. प्रयोगांना लागण्यापूर्वी मेंडेलने ठरविलेली दुसरी गोष्ट आकडेवारीसंबंधी होती. निसर्गासंबंधीच्या कोणत्याही नियमाना आकडेवारीचा–गणिताचा–भक्कम आधार असल्याशिवाय त्या ज्ञानाला नेमकेपणा येणार नाही, हे मेंडेलने पक्के ओळखले होते. त्यामुळे आपल्या सर्व प्रयोगांच्या मेंडेलने अचूक, सविस्तर नोंदी ठेवल्या आहेत.

व्हिएन्नाहून परत आल्यानंतर साधारण दोन वर्षांनी म्हणजे १८५५ मध्ये मेंडेलने प्रयोगाना सुरुवात केली. प्रयोगासाठी मेंडेलने वाटाण्याची निवड केली. वाटाण्यात रोपांची उंची, बीचा रंग, बीचे स्वरूप इ. सात निरनिराळे प्रकार दिसून येतात, असे मेंडेलला दिसले. उंच–बुटका, हिरवा–पिवळा, गुळगुळीत बी–सुरकुतलेली बी, ... अशा उलट–सुलट गुणधर्मांच्या सात जोड्या वाटाण्याच्या संदर्भात असतात. मेंडेलने प्रथम त्याने 'उंची' हा एक गुणधर्म निवडला. त्यासाठी त्याला अशा दोन प्रकारचे वाटाणे हवे होते, की जे इतर सहा गुणधर्मांत अगदी सारखे असतील व फक्त उंचीबाबत भिन्न असतील. शिवाय प्रत्येक प्रकारचे बी 'शुद्ध' हवे. म्हणजे त्याच्या कितीही पिढ्या झाल्या तरी त्याच्या 'उंची' गुणधर्मात बदल होता कामा नये. त्या त्या प्रकारचे बी संकररहित हवे. असे बी मेंडेलनेच तयार केले व ते सर्व सातही गुणधर्मांबद्दल केले. ही सर्व त्याच्या मुख्य प्रयोगाची पूर्वतयारी होती.

मग प्रयोगाला सुरुवात. बी पेरून उंच व बुटकी अशी वाटाण्याची दोन प्रकारची रोपे तयार केली. त्यांची वाढ झाल्यावर एका प्रकारच्या स्त्रीकेसरावर दुसऱ्या प्रकारच्या फुलातील पूकेसर ठेवून त्याचा संकर घडवून आणला. संकर उलट-सुलट (नर-मादी, मादी-नर) प्रकारचा व अनेक रोपांवर केला. यथावकाश बहुतेक रोपाना शेंगा लागून संकरित बी मिळाले. नंतर हे संकरित बी पेरले. त्यांची रोपे उगवली व साऱ्या जगाला आश्चर्य वाटावे अशी गोष्ट दिसून आली. ती सर्व रोपे 'उंच' प्रकारची होती ! त्यात बुटके किंवा अधल्यामधल्या प्रकारचे एकही रोप नव्हते. आईवडलांचे गुण सरासरीने मुलांत उतरतात अशी साधारण समजूत होती व आजही बहुतांशी तशीच आहे; परंतु मेंडेलच्या प्रयोगाने ही समजूत चुकीची आहे हे स्पष्ट केले. या प्रयोगाचा निष्कर्ष पुढील आकृतीने दाखवता येईल.


१ मूळ—

उंच × बुटके



२ पहिली पिढी—

सर्व उंच




उंच व बुटके यांच्या संकरापासून निर्माण झालेली सर्वच रोपे उंच झाली होती. ही गोष्ट सर्वांनाच अनपेक्षित होती. या प्रयोगातून एक गोष्ट स्पष्ट दिसली की, संकरात उंचपणा प्रभावी ठरला व बुटकेपणा झाकला गेला.

नंतर मेंडेलने वर पहिल्या संकरातून मिळालेले बी पेरले. त्याचे आपापसात मीलन घडवून आणले. सहज उडत येणाऱ्या कीटकांकरवी बाहेरील पू–केसर येणार नाहीत याची योग्य खबरदारी मेंडेलने घेतली होती. यथावकाश या रोपाना शेंगा लागून बिया तयार झाल्या. त्या बिया पेरल्यानंतर रोपे उगवली व आणखी एक आश्चर्यकारक गोष्ट दिसून आली. आई–बाप दोन्ही उंच असली तरी दुसऱ्या पिढीत काही रोपे बुटक्या प्रकारची होती. उंच व बुटके हे प्रमाण ३.१ होते.

३ दुसरी पिढी

उंच : बुटके

३ : १



याचाच अर्थ मूळ बियांतील बुटकेपणाचा जो गुणधर्म पहिल्या पिढीत झाकला गेला होता तो दुसऱ्या पिढीत (म्हणजे नातवंडात) दिसून आला. तो पुन्हा पुढे आला. मेंडेलच्याच शब्दात व त्याच्याच प्रयोगांच्या आकड्यात सांगायचे तर, एकूण दुसऱ्या

पिढीतील १०६४ रोपांपैकी ७८७ रोपे उंच होती व २७७ बुटकी होती आणि अशा अनेक प्रयोगाचे निष्कर्ष एकत्र केल्यानंतर असे आढळले की हे प्रमाण ३ : १ असते.

## मेंडेल–मठाधिपती

वाटाण्याच्या संदर्भात सात निरनिराळे गुणधर्म आढळतात असे आधी पाहिलेच आहे. त्या सातही गुणधर्मांचा मेंडेलने वरील प्रकारचा अभ्यास केला व प्रत्येक बाबतीत त्याला तेच निष्कर्ष मिळाले. मेंडेल सतत आठ वर्षे हे प्रयोग करीत होता; परंतु केवळ प्रयोग, नोंदी, निरीक्षणे, निष्कर्ष एवढ्यावरच मेंडेल थांबला नाही. प्रयोगात दिसून येणाऱ्या गोष्टींची कारणमीमांसा करणारी एक उपपत्तीही मेंडेलने मांडली. ही उपपत्ती म्हणजेच आधुनिक अनुवंशशास्त्राचा आरंभ. हा सिद्धांत मांडण्यातच मेंडेलची अलौकिक प्रतिभा दिसून येते. ही उपपत्ती मेंडेलने पुढील चार नियमांत मांडली आहे.

१. लैंगिक पुनरुत्पादन करणाऱ्या सजीवातील कोणताही गुणधर्म ठरवणारे दोन 'कारक' (Factors) असतात. त्यांपैकी त्याला एक मातेकडून व एक पित्याकडून मिळालेला असतो.

२. या कारकाचे दोन प्रकार असतात. एक जोरकस किंवा प्रभावी (Dominant) व दुसरा कमजोर (Recessive) उंची ठरवणाऱ्या कारकात एक प्रभावी व एक कमजोर (बुटका) असतो.

३. ज्याला आपण शुद्ध बीजाचे म्हणतो त्यात एखादा गुणधर्म ठरवणारे दोन्ही कारक सारखेच म्हणजे दोन्ही प्रभावी किंवा दोन्ही कमजोर असतात.

४. दोन कारक वेगळ्या प्रकारचे असतील तर बाह्य स्वरूप प्रभावी कणाने ठरते.

मेंडेलच्या प्रयोगातील उंची ठरवणारे कारक T (प्रभावी) व t (कमजोर) या अक्षरानी दाखविल्यास एखाद्या रोपात TT, Tt (किंवा tT) किंवा tt अशा जोड्या संभवतात. पैकी TT म्हणजे उंच शुद्ध), tt म्हणजे बुटका (शुद्ध) व Tt म्हणजे मिश्र, बाह्यतः उंच (प्रभावी).

या नियमांच्या आधारे मेंडेलच्या प्रयोगांचे स्पष्टीकरण सहज मिळते. ते असे–

मूळ TT × tt

१ ली पिढी – Tt, Tt, Tt, Tt, ... (बाह्यतः उंच) (कारण एक आईकडून व एक बापाकडून कारक मिळत असल्याने Tt अशी जोडी होते. वरील दुसऱ्या नियमाप्रमाणे प्रभावी T मुळे १ ली पिढी सर्व बाह्यतः उंच रोपांची झाली.)

२ री पिढी– आई Tt व बापही Tt असल्याने या पिढीत अनेक प्रकारची जुळणी संभवते.

TT दोघाकडून T (प्रभावी).
Tt बापाकडून T आईकडून t.
tT बापाकडून t आईकडून T.
tt दोघाकडून t (कमजोर).

स्वाभाविकच यांतील पहिली तीन उंच व चौथे बुटके (प्रमाण ३:१) होणार.

हीच गोष्ट मेंडेलच्या प्रयोगातून दिसून आली.

मेंडेलने आपले प्रयोग, निष्कर्ष व उपपत्ती यासंबंधी दोन सविस्तर लेख ब्रनो येथील 'नॅचरल हिस्टरी सोसा.' च्या मुखपत्रिकेत प्रसिद्धीसाठी पाठवले. ते १८६६ मध्ये त्या सोसायटीच्या जर्नलमध्ये प्रसिद्ध झाले; परंतु मेंडेलचे दुर्दैव असे की वैज्ञानिक जगतातल्या कोणीही त्या लेखाची जरासुद्धा दखल घेतली नाही. मेंडेलने आपल्या लेखाच्या प्रती त्या वेळच्या काही जीवशास्त्रज्ञाकडे वैयक्तिकरीत्याही पाठवल्या; पण त्यांनी त्याची उपेक्षा केली. विज्ञान-जगातला अज्ञात राहिलेला मेंडेल १८८४ मध्ये मृत्यू पावला. त्यानंतर १५।१६ वर्षांनी, म्हणजे लेख प्रसिद्ध झाल्यानंतर ३४।३५ वर्षांनी, २० व्या शतकाच्या आरंभी अनुवंशशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या तीन वेगवेगळ्या राष्ट्रांतील शास्त्रज्ञांना मेंडेलच्या संशोधनाचा शोध लागला!

ग्रेगर मेंडेल अत्यंत श्रेष्ठ प्रतिभेचा शास्त्रज्ञ होता यात शंका नाही. २० व्या शतकाच्या मध्यापर्यंतसुद्धा पेशीकेंद्रातील निरनिराळ्या घटकाचा नीटसा बोध झालेला नव्हता. गुणसूत्रे (Chromo-Somes) किंवा जीन्स (Genes) ही नावेसुद्धा मेंडेलच्या वेळी कोणी ऐकली नसतील; पण मेंडेलची गृहीतके तंतोतंत बरोबर ठरली आहेत. त्याने ज्यांना कारक (factors) म्हटले तेच 'जीन्स', प्रत्येक गुणधर्मासाठी दोन, एक मातेकडून आलेला व एक पित्याकडून आलेला. एक प्रभावी एक कमजोर आणि मेंडेलने दिलेले सर्व स्पष्टीकरण खरे असल्याचा विसाव्या शतकाने निर्वाळा दिला आहे. प्रत्येक सजीवातील गुणसूत्राची संख्या ठराविक असते हे मेंडेलच्या वेळी कोणालाच माहीत नव्हते; पण मेंडेलने वाटाण्याच्या सात गुणधर्मांचा अभ्यास केला. वाटाण्यात सातच गुणसूत्रांच्या जोड्या असे नंतर आढळून आले! तसेच 'शुद्ध' बी मिळवण्यासाठी मेंडेलने घेतलेली काळजी व खबरदारी विलक्षण म्हटली पाहिजे. ही काळजी घेतली नसती तर मेंडेल–प्रयोग निरर्थकच ठरले असते. असे वाटते की, मेंडेलला आपल्या प्रयोगाच्या निष्पत्तीची पूर्वसूचना तर मिळालेली नव्हती ना? प्रतिभावान चित्रकाराच्या मनातही सर्व चित्र कागदाला पेन्सिल लावण्यापूर्वीच तयार असते असे म्हणतात.

पण मेंडेल अत्यंत दुर्दैवीही होता. त्याच्या युगप्रवर्तक संशोधनाची कोणी दखलसुद्धा घेतली नाही. हेच केवढे दुर्दैव! पण इतरही अनेक दुर्दैवी गोष्टी त्याच्या वाट्याला आल्या. वाटाण्यानंतर मेंडेलने मधमाश्यांवर प्रयोग करायला सुरुवात केली. त्याने त्यांची एक नवी संकरित जात तयार केली. या माश्या जास्त मध गोळा करीत व इतर माश्यांपेक्षा तो मध अधिक रुचकर, स्वादिष्टही होता; पण या मधमाश्या भयंकर चावऱ्या होत्या. त्याचा दंश अत्यंत वेदनाकारक होता. त्यामुळे तो प्रयोग मेंडेलला अर्धवट सोडून द्यावा लागला. इतकेच नव्हे तर त्या सर्व माश्या नष्ट कराव्या लागल्या.

१८६८ मध्ये, म्हणजे मेंडेलचे शोधलेख प्रसिद्ध झाल्यानंतर दोनच वर्षांनी मेंडेलला अचानक बढती मिळाली व तो मठाधिपती (Abbot) झाला हे आणखी एक दुर्दैव! कारण आता त्याची कामे इतकी वाढली की त्याला प्रयोग–संशोधन करायला वेळच मिळेनासा झाला. मठाधिपती म्हणून मेंडेल अत्यंत यशस्वी व लोकप्रिय झाला. इतका की आपले अनुवंशशास्त्रातील सर्व कार्य तो पार विसरून गेला! पुढे १८८४ मध्ये, मृत्यूपर्यंत त्या विषयाकडे मेंडेलने ढुंकूनही पाहिले नाही. त्याने लोकसेवेचे व्रत स्वीकारले. त्याचा मठ म्हणजे गोरगरीब, अनाथ व पददलितांचे आश्रयस्थान झाले. झेकोस्लोव्हाकियामधील जुलमी राजवटीविरुद्ध झगडणाऱ्या बंडखोरांना मेंडेल आपल्या आश्रमात राहू देत असे. त्या क्रांतिकारकांना ब्रनोचा आश्रम हा मोठाच आधार वाटे. मेंडेलच्या प्रेतयात्रेच्या वेळी त्या वेळचा विख्यात झेक ऑर्गनवादक लिओ जॅनसेकने ऑर्गन वाजवून त्या महान मानवसेवकाला श्रद्धांजली अर्पण केली!

पण ग्रेगर मेंडेलनंतर मठाधिपती झालेल्याने मेंडेलच्या प्रयोगाचे सर्व साहित्य, टिपणे इ. रद्दी म्हणून जाळून टाकले!

–भा. रा. बापट

# शोकांतिकेत आकंठ बुडलेला युजेन ओ नील

रघुपती भट्ट

- ☐ जन्म : १६ ऑक्टोबर १८८८. जेम्स ओ नील या प्रसिद्ध नटाचा पुत्र.
- ☐ ३ फेब्रुवारी १९२० ला 'बियाँड द होरायझन' प्रकाशित व प्रदर्शित. पहिले पूर्ण लांबीचे नाटक. त्यानंतर एकूण ४६ नाटके
- ☐ पुलीट्झर पारितोषिक
- ☐ १९३६ सालचे साहित्याबद्दलचे नोबेल पारितोषिक
- ☐ मृत्यू २७ नोव्हेंबर १९५३.

युजेन ओ नीलचा बाप एक नट होता. त्याच्याबरोबर सतत प्रवास करीत राहिल्याने युजेनच्या रक्तातच नाट्य भिनले होते. त्याचा बाप ज्या नाटकातून कामं करायचा त्या नाटकाबद्दल त्याच्या मनात एक तिटकारा निर्माण झाला होता. त्यातूनच त्याच्या नव्या नाटकाचा जन्म झाला. त्याच्या नाटकानी अमेरिकन नाट्यसृष्टीचा अक्षरशः कायापालट झाला.

'बियाँड द होरायझन' हे ओ नीलचे पहिले नाटक (पूर्ण लांबीचे) ज्या दिवशी प्रकाशित आणि प्रदर्शित झाले तो दिवस म्हणजे अमेरिकन नाट्यसृष्टीच्या दृष्टीने क्रांतिकारक दिवस. आजच्या प्रगत नाट्यसृष्टीचा तो जन्मदिन. त्याच्या विषयाने प्रेक्षकांच्या हृदयाला हात घातला. समीक्षक मंडळी अंतर्बाह्य हादरली. आपण ज्याची आतुरतेने वाट पाहात होतो तो आलेला आहे हे त्यांनी मनोमन जाणले.

त्यानी 'ओ नील'चे स्वागत केले. ओ नील नवी नाटके देत राहिला. नवे विषय, हादरवून टाकणाऱ्या कल्पना, प्रेक्षकाना खिळवून ठेवणारी शैली यामुळे ओ नीलने अमेरिकन नाट्यविश्व व्यापले.

सभोवतालच्या जीवनापेक्षा जीवनाचे शोकांत दर्शन ओ नीलला अतिशय प्रिय होते. त्याच्या शब्दात 'नशीब, देव, आमचं भविष्य घडवणारा आमचा भूतकाळ, काही म्हणा' हे त्याचे विषय होते.

'बियाँड द होरायझन'ची कथा त्याला समुद्रप्रवास करताना एका खलाशानं सागितली होती. म्हणजे त्यानं स्वतःच गाऱ्हाण गायल होतं आणि ओ नीलने त्यात स्वतःच्या कल्पना भरून कथा रंगविली होती. एकाच मुलीवर प्रेम करणारे दोन भाऊ. सरळसोट जीवन जगून जो त्या मुलीला सुखी करू शकला असता तो सागरप्रवासाला जातो आणि ज्याला रंगेल जीवनाची ओढ असते तो त्या मुलीशी लग्न करून तेथेच राहतो आणि आपल्या जगण्याची चवही घालवतो आणि त्या मुलीचं प्रेमही गमावतो.

त्या दोघांनाही समुद्रप्रवासाला गेलेल्या त्या दुसऱ्या भावाची ओढ लागते. तो किती सुखी असेल; पण तो परत आल्यावर समजतं. त्याच्या जीवनात ना काही साहस ना काही काव्य.

ओ नीलने शोकात विषय घेतले. अमेरिकन प्रेक्षकाना माहिती नसलेले. त्यानं स्वत: एकदा आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. त्याचं समर्थन करणारं एक नाटक त्यानं लिहिलं.

काही अमेरिकन प्रेक्षक म्हणाले की, ओ नील ज्या शोकात जीवनाचं प्रदर्शन घडवतो आहे ते अमेरिकन नव्हे. 'हेअरी एप' नावाचं नाटक त्यानं समाजवादाचा प्रचार करण्यासाठी लिहिलय असाही त्याच्यावर आरोप झाला; पण ओ नीलची लोकप्रियता तीळमात्रही कमी झाली नाही. त्याच्या नाटकांनी लोकांमध्ये नित्से, शोपेनहॉर इत्यादीबद्दल कुतूहल निर्माण झालं. नव्या पिढीनं ओ नीलचे संस्कार जपायला सुरुवात केली. एक अमेरिकन काकू त्याला चक्क ठार मारायला निघाली होती. कारण तिची पोरगी म्हणे ओ नीलमुळे बिघडली होती.

प्रेक्षकांवर काबू मिळवल्यावर ओ नीलने अनेक नव्या हादरवून टाकणाऱ्या कल्पना लोकापुढे आणल्या. 'ऑल गॉडस् चिलन (Chillan) गॉट विंग्ज नावाच्या नाटकात एक निग्रो एका गोऱ्या स्त्रीचे चुबन घेतो असे घडल्याची अफवा उठली. (पुन्हा बदल घडला असेल) आणि लोक खवळले. नाटकावर बंदी येणार असे उठले; पण निर्मात्यानी युक्तीने प्रयोग सादर केला आणि लोकांचे मन निवळले.

'डिझायर अडर द एल्म्म' हे नाटक अश्लील असल्याच्या वावड्या उठल्या. एका बहाद्दराने सरळ ओ नीलवर अश्लीलतेचा आरोप करून खटला भरला; पण न्यायाधिशाना त्यामध्ये काही अश्लील वाटले नाही त्यामुळे ओ नील सुटला; पण त्यामध्ये असे काय आहे असा विचार करून प्रेक्षकानी त्या नाटकाला प्रचंड गर्दी करायला सुरुवात केली आणि त्या नाटकाने भरपूर गल्ला मिळवून दिला.

'मोर्निग बिकम्स इलेक्ट्रा' मध्ये दैवाचा प्रचंड आघात झालेल्या मेमान कुटुंबाची हकिकत ओ नीलने तीन भागात आणि १३ अकांत पेश केली. 'इडिपस कॉम्प्लेक्स' त्याने यात साकार केला. आई मुलाचे प्रेम, बहीणभावाचे प्रेम या फ्रॉडियम कल्पना लोकापुढे अगदी उघडच्यानागड्या शब्दात त्याने साकारल्या. एवढे प्रचड आकाराचे नाटक बघण्याचाही प्रेक्षकाना अनुभव नव्हता. हे नाटक 'ओ नील'च्या अत्युत्कृष्ट नाटकातील एक गणले जाते.

हे नाटक बघायला प्रेक्षकानी दुपारी जायचे आणि संध्याकाळी परत यायचे. पाच तासाचे नाटक. मध्यंतरा मोठे असायचे. या

वेळी प्रेक्षकांनी जेवून यायचे. साध्या भाषेत ओ नीलने प्रेक्षकांच्या मनाची एवढी पकड घेतली होती की, प्रेक्षकांना मध्यतर नको वाटायचे. अनैतिक मानल्या जाणाऱ्या कल्पना असूनही मेमान कुटुंबाच्या वाताहतीने प्रेक्षक भारावून जायचा. साधे शब्द पण रंगभूमीवर त्याला विलक्षण वजन यायचे.

'स्ट्रेंज इंटरल्युड' हे सुद्धा असेच पाच तासांचे नाटक. एक मानिनी आणि तिच्या जीवनात आलेले पुरुष याची ती तशीच उघडघानागडघा शब्दातील कहाणी. याही नाटकाला प्रेक्षकांनी उचलून धरले. ओ नील म्हणजे लोकाना अत्यंत आवडता बनला होता.

## नवी श्रद्धा

ओ नील ने या काळात प्रचड लिहिले. प्रत्येक नाटकात वेगळ्या कल्पना साकारल्या. प्रत्येक नाटक एक नवा साहित्यिक आनंद द्यायचे. आतापर्यंतच्या संकल्पना झुगारून देताना त्याला अत्यानद व्हायचा. प्रेक्षकांच्या भावनाना तो जुमानत नसे. आपण लिहितो ते लोकांनी वाचलेच पाहिजे, अनुभवलेच पाहिजे, असे तो म्हणे.

स्पिडबर्गच्या 'द डान्स ऑफ डेथ' आणि दस्तोव्हस्कीच्या 'द इडियट' चा त्याच्यावर तरुण वयातच मोठा परिणाम झाला होता. जीवनाचे शोकान्त दर्शन त्याला आवडले होते. अमेरिकन समीक्षकाच्या मते स्टेजवर पाखंडवाद आणायला आणि वेडेपणाची विविध चित्रणे साकार करण्यात ओ नीलचा सिंहाचा वाटा आहे; पण कोणालाही न जुमानता ओ नील दु.ख, नशिबाचा फेरा, शोकान्त, द्वेष, मृत्यु यावर लिहीत राहिला. लोकाच्या गळी उतरवत राहिला.

त्याने नुसता नाटकातच शोकान्त आणला नाही, त्याच्या जीवनातही त्याने तो आणलाच.

एक तर तो अट्टल बेवडेबाज होता. काही काळ त्याने हिप्पीसारखा घालवला. शुद्धीवर असताना तो एक चागला मनुष्य होता; पण ते क्वचितच घडत असल्याने त्याने स्वतःच्या जीवनाची वाताहत करून घेतली होती. एखादी गोष्ट किंवा मनुष्य आपल्याला उपयोगी पडत नाही असे दिसले की, तो अगदी निर्दयपणे सबध तोडत असे. त्यात हळुवारपणा त्याला माहिती नव्हता. त्याने दोन बायका सोडल्या. त्यामुळे सासारिक जीवनात सगळा आनंदच होता. स्वतःच्या मुलांना त्याने देशोधडीला लावले. (त्याची एक मुलगी ऊना हिने 'चार्ली चॅपलिन' शी विवाह केला.) त्याच्या आवडी-निवडी एवढ्या विचित्र होत्या की, त्याला कोणतेच घर आवडायचे नाही. त्यानं जणु काही आपलं जीवन शोकान्त बनवण्याचा विडाच उचलला होता. आपलं वैयक्तिक जीवन त्यानं अक्षरशः पार उधळून लावलं होतं!

मध्ये एकदा तो गुमच झाला. त्यानं आठ नाटकं अमेरिकन जीवनावर लिहायची ठरवलं होतं. त्याच्या रक्तामासात नाटक किती भिनलं होतं याचाच तो पुरावा होता. तो त्याचा केवळ नाटकी आविर्भाव ठरला. त्याला ती नाटकं कधीच पूर्ण करता आली नाहीत. फक्त दोनच त्याच्या मृत्यूनंतर बाहेर आली; पण त्यामध्ये तो प्रख्यात 'ओ नील' स्पर्श नव्हता, ज्या ओ नील स्पर्शाने अमेरिका वेडावली होती तो त्यात नव्हता.

'द आइसमन कमेथ' या नाटकात त्याने पुन्हा एकदा 'भ्रमाची' संकल्पना मांडली. ओ नील म्हणजे तसा तुफान मनुष्य होता. 'भ्रम' आपलं जीवन सुखकर बनवतात. असा त्याचा दावा होता. तेव्हा जीवन सुखावह बनवायचे असेल तर भ्रम हवेतच असं त्यान अगदी अट्टाहासानं प्रतिपादिलं.

'ओ नील' आपल्या पात्राना आपल्या तत्त्वज्ञानाच्या साच्यातच बसवत असे. कळसूत्री बाहुल्याप्रमाणे तो या पात्रांना त्याच्या तत्त्वज्ञानात बसणाऱ्या प्रसंगांतून, नशीबातून जायला लावायचा. म्हणूनच काही समीक्षक अगदी कळवळून सांगायचे 'ओ नील चितारतोय ना, ते आपल आयुष्य नव्हे!'

'ओ नील' कुटुबावर आधारित असं 'लॉंग डेज् जर्नी इन टू नाइट' नावाचं एक नाटक त्यानं लिहिलं. कुटुबातील खाजगी भानगडी त्यात असल्यामुळे, आपल्या मृत्यूनतर पंचवीस वर्षांनी हे नाटक प्रसिद्ध कराव अशा सूचना त्यानं दिल्या होत्या; पण त्याच्या बायकोनं ते नाटक त्याच्या मृत्यूनंतर लगेच प्रकाशित केलं. त्यामुळे बरेच लोक नाराज झाले. ओ नीलने आपल्या कुटुंबियांवर अन्याय केलाय अस त्यांचं मत बनलं.

माणसाच्या जीवनाची शोकान्तिका आणि त्याविरुद्ध माणसानं दिलेला वैभवशाली पण स्वत.चा नाश घडवून आणणारा लढा हा आपल्या नाटकाचा सततचा विषय राहिला, असं तो म्हणे. तो विषय त्याच्या डोक्यात भरून राहिला होता; पण 'वैभवशाली' या शब्दाच्या वापरातच 'ओ नील' चे वेगळेपण आहे, असं समीक्षकाना वाटत. कारण त्या शब्दानं त्यानं माणसाला मोठेपण दिलेलं आहे, वैभव दिलेलं आहे. यालाच मी ओ नील स्पर्श म्हणतो.

तो जरी मोठा विचारवंत नसला तरी जीवनाची एक दृष्टी त्याच्याकडे होती. विषयवासना, द्वेष, भ्रम, अभिलाषा इत्यादी मूलभूत तत्त्वांकडे त्यान अत्यत सखोलपणे पाहिले. 'डायनॅमो' नावाच्या नाटकात त्यान जुन्या देवाचा मृत्यू, शास्त्रांचे (सायन्स) अपयश, भौतिकवादाचे (मटेरिअॅलिझम) अपयश यातून प्राचीन धार्मिक प्रवृत्तीला बळ देणारी नवी समाधानकारक सकल्पना मांडण्याचा प्रयत्न केला. तो स्वतः रोमन कॅथॉलिक होता; पण त्याच्याजवळ त्यातले काही नव्हते. त्याला कर्मठतेचा तिटकारा होता; पण एक नवी श्रद्धा हवी होती; पण सापडेनाशी झाली होती.

गम्मत म्हणजे हाडाचा नाटककार असूनही त्याला जुन्या नाट्यपरंपरांचा तिटकारा होता. त्यान ते जुनं सगळं टाकून दिल होतं. त्याची भाषा गद्य होती. 'शेक्सपियर' च्या किती तरी काव्यात्म ओळी आपल्या मनात रेंगाळत राहतात. बर्नार्ड शॉ गद्य मनुष्य होता, बुद्धिवादी होता; पण त्यानही काव्यात्म ओळी लिहिल्या; पण ओ नीलने कधीच काव्यात्मतेचा छंद धरला नाही. अनेक चरित्रलेखकाच्या मते त्याचा पिंड कवीचा होता; पण त्याच्या लिखाणात त्यानं हा पिंड आणला नाही. काही वेळा तो अगदी ओगळ वाक्येही टाकून देई. त्यानं लिहिलं त्यात बदलही त्याला सहन होत नसे.

पण स्टेजवर जेव्हा ते नाटक साकार होई, तेव्हा ते लिखाण, ती वाक्ये, प्रेक्षक, समीक्षक सर्वांची पकड घेत. याच कारण म्हणजे तो हाडाचा रंगभूमिज्ञ होता. प्रेक्षकांच्या मनाची पकड घेण्याचं सूत्र त्याला माहिती होतं. अटकीनसन मोर्निंग बिकम्स इलेक्ट्रा' मधील एक उदाहरण देतो. त्या नाटकातील लॅव्हिनिया त्या घरात (मेमान कुटुंबियाचे घर) जायला निघते आणि म्हणते जन्माला आल्याबद्दल मेमाननी

स्वतःला शिक्षा करून घ्यायला हवी.' आणि प्रेक्षकांच्या मनात परमेश्वराची अंतिम शिक्षा साकार होते. किंवा 'आइसमन कमेथ' मधील 'पाइप ड्रीम्स' (भ्रम) हा शब्द आशा पुनरुज्जीवित करणारी प्रार्थना ठरते. हे ओ नीलचे सामर्थ्य आहे. भाषाप्रभू आणि रंगभूमीप्रभू ओ नील !

एकूण सेहेचाळीस नाटके लिहिणाऱ्या ओनीलने १९३६सालचे साहित्याबद्दलचे नोबेल पारितोषिक पटकावले. अमेरिकन रंगभूमीचा कायापालट घडवणारा, जगाच्या नाट्य-क्षेत्रामध्ये खळबळ उडवणारा ओ नील ह्यासाठी योग्य होताच.

१९४० साली त्याला अर्धांगाचा झटका आला. त्याच्या वाणीवर परिणाम झाला आणि त्याचे हात कापू लागले. अगदी सुंदर रीतीने हस्तलिखित तयार करणे हे त्याचे वैशिष्ट्य होते. तेच आता जमेना. त्याच्या नाटकातील एखाद्या पात्राप्रमाणे त्याला शोकान्त जीवन पत्करावे लागले. मग तो आपल्या कार्लोटा या बायकोबरोबर समुद्रकिनाऱ्यावरील एका घरात राहायला गेला.

त्याच्या नाटकामध्ये जो प्रचंड शोकपर्यवसायी शेवट असायचा तो यापुढे काहीच नाही. तो त्याच्या पात्रांनीही अनुभवला नाही.

त्या एकाकी घरात, त्या दोघांना कोणाची सोबत नाही. जगापासून दूर असे घोंघावणाऱ्या समुद्राजवळ. ओ नील याला समुद्र फार प्रिय. त्याच्या अनेक नाटकांत त्या समुद्राचा उल्लेख आहे. कार्लोटा आणि तो दोघांचाही स्वभाव विक्षिप्त आणि नाटकी. ओ नीलला एकदा अपघात झाला. तेव्हा उपचार करणाऱ्या डॉक्टरना वाटले की हे दोघेही ठार वेडे आहेत.

अर्धांग विकलांग असा 'ओ नील' १९५३ मध्ये मरण पावला. मरण पावताना तो एका हॉटेलमध्ये कार्लोटासमवेत राहात होता. त्याचा जन्मही एका हॉटेलमध्येच झाला होता. मरण्यापूर्वी तो तसे म्हणालाही. तसा तो 'बेघरच'च राहिला !

मनस्वी जीवन जगलेल्या आणि आपले तत्त्वज्ञान जगासमोर ठासून मांडणारा ओ नील. काही वर्षे त्याने 'ब्रॉडवे'वर राज्य केलं. ब्रॉडवेनं त्याच्यावर मुक्त प्रेमाची पखरण केली. ओ नील आणि नवे नाटक हे दोन शब्द वेगळे करता येईनात, इतके ते एकमेकात समरूप झाले होते.

'शोकान्त' नाटकाचा बादशहा स्वतः असं शोकान्त जीवन जगला ! □

---

# रंगभूमी

# गडकरी जन्मशताब्दी—काही अपेक्षा

**वि. भा. देशपांडे**

२६ मे १८८५ हा राम गणेशांचा जन्मदिवस. त्याला आता शंभर वर्षे पूर्ण झाली आहेत. १९८४–८५ हे वर्ष गडकऱ्यांचे जन्मशताब्दिवर्ष म्हणून संपन्न होणार आहे. या वर्षात अनेक व्यक्ती आणि संस्था यांच्या मनात निरनिराळ्या स्वरूपाचे कार्यक्रम असणार. त्यासंबंधी काही अपेक्षा वर्षारंभीच व्यक्त कराव्याशा वाटतात.

या संदर्भात एक सुखद धक्का म्हणजे महाराष्ट्र शासनाच्या शिक्षणखात्याने गडकरी–जन्मशताब्दी मोठ्या प्रमाणात साजरी करण्याचा घाट घातला आहे. हे कार्य शिक्षणखात्याचे की सांस्कृतिक-खात्याचे याचा घोळ घालीत बसण्यापेक्षा होणारे काम महत्त्वाचे आहे. नाट्यविषयक प्रयोगांचे शासन यानिमित्त आयोजन करणार असल्याचे कळते. पुणे आणि मुंबई या ठिकाणच्या काही नाट्यसंस्थांना शासनाने गडकऱ्यांच्या नाटकांचे प्रयोग करण्यास सांगून काही मर्यादेपर्यंत आर्थिक साह्य देण्याचेही मान्य केले आहे. ही कल्पना चांगली आहे; पण तेवढ्याने हे कार्य थांबणारे नसावे. यामध्ये अपेक्षा अशी आहे की, गडकऱ्यांच्या नाटकांचे प्रयोग ज्या संस्था करतील त्यांच्या प्रयोग–गुणवत्तेचीही काळजी घेणे आवश्यक आहे. केवळ एका प्रयोगाला दोन किंवा आणखी काही हजार रुपये देऊन शासनाने केवळ बघ्याची भूमिका घेऊ नये. हे प्रयोग करणारे कलावंत कोण आहेत, त्यांचे प्रयोग कोणत्या गावी, कोणत्या परिस्थितीत म्हणजे तिथल्या सुविधा कशा आहेत याचीही पाहणी करणे आवश्यक आहे. कारण गडकऱ्यांच्या नाटकांपैकी 'भावबंधन' आणि 'एकच प्याला' या नाटकांचे प्रयोग अधूनमधून कोणी ना कोणी करीत असतो; पण 'प्रेमसंन्यास', 'पुण्यप्रभाव', 'राजसंन्यास', 'वेड्यांचा बाजार' (प्रहसन) यांचे प्रयोग दुर्मिळपणे होतात. आज जो नाट्यप्रेक्षक आहे त्यातला वडीलपिढीचा प्रेक्षक वगळला तर तरुणपिढीने हे दुर्मिळ प्रयोग पाहिले असल्याची शक्यता फारच कमी आहे. अशा प्रेक्षकांसाठी या प्रयोगांची चांगली रंगावृत्ती तयार करून प्रयोगरूपही देखणे करणे अगत्याचे आहे. जर तसे घडले नाही तर जुन्या नाटकांसंबंधीचा एक समज (किंवा गैरसमज) तसाच राहील, किंबहुना त्यात भर पडेल. ही प्रयोगदर्शने सुखद आणि सुलभ झाली तर नवीन पिढीच्या काही प्रेक्षकांना तरी गडकऱ्यांच्या नाटकांबद्दल नेमके कळू शकेल.

गडकऱ्यांच्या नाटकांतील बलस्थाने अनेक पद्धतींनी सांगता येतील. त्यांच्या नाटकांतले विषय, व्यक्तिरेखांचे प्रभावी आणि प्रखर-

पण, काव्यात्म भाषेत असलेली लयबद्धता, विनोदाचा मुक्त वापर आणि संगीत अशा किती तरी गोष्टी सांगता येतील. कोणाही नटाला या गोष्टी मोह पाडणाऱ्या आहेत. खरे तर असे आहे की, ज्या कोणा नट–नटीला स्वतःच्या अभिनयाचे स्वरूप तावून-सुलाखून घ्यायचे असेल त्याने अथवा तिने किमान एकदा तरी गडकऱ्यांच्या नाटकातील आपल्यायोग्य भूमिका करून पाहावी. त्यात स्वतःला शोधणेही होईल आणि काही नवीन केल्याचा आनंदही लाभेल. दुसरे असे की, ज्या गडकऱ्यांच्या नाटकांचा भाषेच्या संदर्भात आपण सतत गौरव करीत आलेलो आहोत, त्या नाट्य-शब्दांची रंगभूमीला कधी नव्हे ती आज गरज आहे. आजच्या रंगभूमीवरील काही सन्मान्य अपवाद वगळले तर रंगमंचावर चांगला शब्द बोलणे आणि तो समर्थपणाने प्रेक्षकांच्या कानामनात पोहोचवणे ही एक दुर्लभ गोष्ट झाली आहे. म्हणूनच अशी अपेक्षा आहे की, ही नाटके केवळ जुन्या पिढीतील कलाकारांनीच करावीत, अशा त्रयस्थाच्या भूमिकेत तरुण कलाकारांनी राहू नये. या वर्षी होणाऱ्या नाट्यप्रयोगात यथाशक्ती सहभागी होऊन गडकऱ्यांच्या नाटकांचे आव्हान स्वीकारले!

हे जे प्रयोग घडतील त्यात काही महत्त्वाचे कलाकार सहभागी होणार असल्याच्या वार्ता आहेत. शासनाला विनंती अशी की, जसा त्यांनी प्रयोगासाठी पैसा उपलब्ध करून दिला आहे, तसाच तो प्रयोगांच्या चित्रीकरणासाठी, ध्वनिमुद्रणासाठीही उपलब्ध करून द्यावा. गडकऱ्यांची अनेक स्तरांवरची सांस्कृतिक ऋणे मराठी समाजावर आहेत. त्यातले एक म्हणजे त्यांच्या नाटकांमुळे अनेक नट नावारूपाला आले. त्यांच्या अभिनयगुणांचे शब्दशः सोने झाले. यामध्ये गणपतराव बोडस, चिंतामणराव कोल्हटकर, नानासाहेब फाटक, केशवराव दाते, बालगंधर्व, मा. दीनानाथ, दिनकर ढेरे, नरेश अशी अगदी सहजपणाने सुचणारी नावे आहेत. (ही यादी आणखीही वाढवता येईल. मुद्दा तो नाही.) महत्त्वाचा भाग असा की, ह्या सर्वांनी गडकऱ्यांच्या नाटकांतील ज्या भूमिका चिरंजीव केल्या, त्यांच्या फक्त आठवणी उरल्या, काही छायाचित्रे मागे राहिली. नाटकाचा प्रयोग ही क्षणभंगुर (पाहता पाहता संपणारी) गोष्ट असल्याने या सर्व मंडळींच्या अभिनयतपशिलाचे बारकाव्याने दर्शन फक्त शब्दांतच राहिले. पूर्वी त्या सुविधा नव्हत्या. आता चित्रीकरणाच्या अनेक सुविधा उपलब्ध आहेत, त्यांचा पुरेपूर वापर करावा. अगदी उदाहरणानेच सांगायचे झाले तर आज बाळकोबा गोखले भाववंधनातला धुंडीराज गेली कित्येक वर्षे करीत आहेत. आताही एक–दोन प्रयोग ते करणार आहेत. तर त्यांचा धुंडीराज, परशुराम सामंत या वयोवृद्ध कलाकाराचा सावाजी, चित्तरंजन कोल्हटकरांचा घनःश्याम, शरद तळवलकरांचा तळीराम आणि डॉ. श्रीराम लागूंचा सुधाकर या सगळ्यांचे चित्रीकरण करून जतन करण्याची गरज आहे. ही सारी मंडळी या वर्षात हे प्रयोग करणार आहेत. या प्रयोगांबरोबरच पु. ल. देशपांडे 'राजसंन्यास' नाटकाचे प्रभावी वाचन करीत आहेत, त्या वाचन–प्रयोगाचेही चित्रीकरण करता येईल. संपूर्ण प्रयोग चित्रित करणे शक्य झाले नाही तर निदान आता उल्लेखिलेल्या अशा प्रकारच्या महत्त्वाच्या कलाकारांच्या प्रयोगातील काही भाग चित्रण करून जतन करावा अशी अपेक्षा आहे.

अशा अपेक्षा व्यक्त करताना केवळ शासनाने सर्व करावे आणि आपण स्वस्थचित्त राहावे असे नाही. यासाठी साहित्यसंस्था आणि नाट्यसंस्था, नाट्यपरिषदा यांचेही हे काम आहेच. त्यांनी त्यातला काही भाग स्वतंत्रपणाने करावा, उरलेला सहकार्याने करता येईल. विशेषतः गडकऱ्यांच्या साहित्याचा परिचय करून देणारी, विश्लेषण करणारी अभ्यासकांची व्याख्याने, गडकऱ्यांच्या साहित्यातील विनोदाचे दर्शन, काही नाट्यप्रवेशांचे प्रयोगदर्शन, कवितांचे वाचन–गायन असे किती तरी कार्यक्रम ह्या संस्थांना करता येण्यासारखे आहेत. हे करताना केवळ उरकण्याची आणि यादी वाढवण्याची वृत्ती नसावी; तर गडकरी हे मराठी मनाचा, संस्कृतीचा वारसा निर्माण करणारे आहेत. त्यांनी आपल्या लेखणीने मराठी समाजाला गेली साठ–सत्तर वर्षे भरभरून दिले आहे. त्यांचे पुण्यस्मरण करणे, त्यांच्या गुणांचा आठव करणे, त्यांना पुनःपुन्हा समजून घेणे या वर्षात व्हावे. जन्मशताब्दी हे निमित्त असते; पण ते निमित्तच महत्त्वाचे असते. केवळ हा एक दिवसाचा समारंभ नाही, तर पूर्ण वर्षाचा सोहळा आहे, असे काही घडावे ही अपेक्षा! □


अलिप्तपणे तरी भेदकतेने
घडवलेले बिहारच्या
माणसाचे दर्शन.

**पूर्णिया**
अनिल अवचट
बारा रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

राष्ट्रवादी भूमिकेतून
नव्या क्षितिजांचा
घेतलेला शोध.

**बलसागर**
श्री. ग. माजगावकर
तीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

# अनवट

## दुर्दम्य

खरं तर डोंगरकडयावर माणसांना का जावं वाटतं ? कुठं तरी सर्वात उंच जावं न आसपासचा राहाळ पाहावा, जमिनीवरून धावणाऱ्या ढगांच्या सावल्या पहाव्यात ही प्रत्येकाला इच्छा असतेच.

हिमालयातील एवरेस्ट या सर्वोच्च शिखरावर १९२० पासून आतापर्यंत तहद ८४ चढाया झाल्या. १९५३ मध्ये ते सर झाले. त्यानंतर तेहतीस पथकांनी ते सर केले.

परवा, म्हणजे २३ मे १९८४ ला भारताची पहिली महिला-गिर्यारोहक एव्हरेस्ट (सागरमाथा) शिखरावर पोचली. कु. बचेंद्री पाल या उत्तरकाशीच्या २८ वर्षांच्या प्राध्यापिकेने एव्हरेस्टवर जाणाऱ्या पाचव्या महिला-गिर्यारोहकाचा मान मिळविला !

जपानची जुन्को ताबाई (१९७५) ही या 'सागरमाथ्या' वर (का सरगमाथा) जाणारी पहिली बाई. त्यानतर चीनची फून ताग (१९७५) पोलंडची वांदा रूत्कैविझ (१९७८) व प. जर्मनीच्या हॅनेलोर स्मित्झ (१९७९) यांनी यशस्वी चढाया केल्या.

या वर्षी भारतातर्फे एवरेस्ट मोहिमेसाठी २० जणाची तुकडी निघाली. त्यात सात महिलांचा समावेश होता. पहिल्या तुकडीतील फक्त फू दोरजी यशस्वी झाला. या ३४ वर्षांच्या इसमाने आतापर्यंत दोनदा या जगाच्या सर्वोच्च बिंदूवर जाण्याचा मान पटकावला. ऑक्सिजनशिवाय जाणारा तो पहिला भारतीय. त्याच तुकडीत तेन्झिंग नॉर्गेची भाची रीटा गोम्बू होती. मात्र ऑक्सिजन-उपकरणाच्या बिघाडामुळे तिला परतावे लागले. दुसऱ्या तुकडीत दिल्लीची रेखा शर्मा होती. ७ हजार ३७० मीटर्स उंचीवर हिमकडा कोसळल्याने सर्व तुकडीलाच परतावे लागले. तिसऱ्या तुकडीतील बचेंद्री पाल यशस्वी झाली. आता भारतीय स्त्री खरोखरच सर्वोच्च जागी गेली आहे

तसं पाहता, २९ मे १९५३ ला तेन्झिंग व हिलरी एवरेस्टवर पोचल्यानंतरच्या काळात एवरेस्ट सर करणाऱ्यात दहा टक्के भारतीय होते. १८६५ च्या लेफ्टनंट कमोडोर कोहली याच्या नेतृत्वाखाली ९ भारतीय एवरेस्टवर चढले. त्यानंतर मात्र एकदम १९८४ लाच दुसरी मोहीम निघाली. या मोहिमेला ३५ लाख रुपये खर्च आला. – एक फू दोरजी, बचेंद्री पाल एवरेस्टवर गेली म्हणजे इकडे भिवंडी-पंजाब कितीही पेटो, प्रत्येक भारतीयाला आपला (उगाच) अभिमान वाटतो. त्या वेळी ३५ लाख रुपयांची रडकथा गात बसणाऱ्यांनी फक्त एकदा अगदी जवळच्याच सह्याद्रीच्या रांगांकडे पहावे. एक शिखर एक किल्ला चढून पहावा. म्हणजे आपल्याजवळ काय मोलाचे धन आहे ते कळेल !

## हॅपी डेज् आर हिअर अगेन !

उन्हान तळतळाट होणाऱ्या खुडुक गावात सुद्धा यष्टीष्टचाडावर थम्स अप, लिम्का, गोल्ड स्पॉट, रश, स्प्रिटच्या पाट्या झुलत असतात. दोन रुपयापासून तीन रुपयापर्यंत एक बाटली ! हव्या तितक्या प्या! टी. व्ही. चित्रपट, रेडिओ, पोस्टर्स, बक्षिसे अशा अनेक तऱ्हातून जाहिरातीची राळ उडविली जाते.

१८५३ च्या जानेवारी ते जून दरम्यान एकटया टी. व्ही. वरील जाहिरातीसाठी 'थम्स अप' ने ८.२८ लाख रुपये खर्च केले. कँपा कोला (६.५० लाख) थ्रिल (६.९८ लाख) गोल्ड स्पॉट (६० हजार), लिम्का (४ लाख ९३ हजार), स्प्रिट (३ लाख ४९ हजार) वगैरे"

या सर्व सॉफ्ट ड्रिंक्सचे उत्पादन करणे फार सोपे. त्यात वापरले जाणारे घटक अत्यंत जुजबी असतात.

या सॉफ्ट ड्रिंक्सचे दोन प्रकार. एक फळांपासून काढलेले व दुसरे कॅम्पा-लिम्कासारखे गोड एअरेटेड 'पाणी' असे प्रकार. त्यापैकी ड्यूक, स्पेन्सर्स, रसिका, ॲपल, फन-डे असे फळावर आधारलेले (फ्रूट-बेस्ड) पेय तर कँपा-लिम्का-गोल्ड स्पॉट हे निव्वळ गोड थंड पाणी !

ही पेये बनविण्यास फार तर ६५ पैसे खर्च यतो. १९८२ मध्ये तो ६२ पैसे होता. (कँपा कोला)

मुख्य खर्च होतो तो दणकेबाज जाहिरातीवर. त्यात किती सुरक्षितता असते याची दखल आपण घेतच नाही. १९५५ च्या फ्रूट प्रॉडक्ट ऑर्डर नियमानुसार सॉफ्ट ड्रिंक्ससाठी किमान स्वच्छता व आरोग्यनियमाचे पालन करणे सक्तीचे केले आहे. कँपा-लिम्कासारख्या पेयांनी आपल्या जाहिरातीत आपल्या पेयात फळाचा अंश नसल्याचे स्पष्ट करावे असे या नियमांत नमूदच केले आहे. मात्र या नियमांचे कोणत्याच जाहिरातीत पालन होत नाही.

यामुळे ग्राहकांची दिशाभूल होत तर आहेच. त्याचबरोबर रसिका, ॲपेलासारख्या खरोखर फळाचा रस असलेल्या सॉफ्ट-ड्रिंक्सच्या विक्रीवरही परिणाम होत आहे.

अत्यत स्वस्त व टाकाऊ वस्तू भडक जाहिरातीद्वारे गळी उतरावयाच्या, आपल्या मालाला मागणी निर्माण करायची ही निर्मात्यांची अक्कल शासनाने अनेक आदेश काढूनही ऐकली का जाऊ शकत नाही ? परिणामी आपल्या उसाच्या रसाच्या गुऱ्हाळाला माशा मारत बसावे लागते !

## दंगलीचा 'अर्थ'

भिवंडीच्या दंगलीचे खरे परिणाम मुंबईच्या अर्थव्यवस्थेवर झाले. १८ मे पासून सुरू झालेल्या दंगलीमुळे ठाणे-बेलापूर-पट्ट्यातील बहुतेक कारखाने बंद पडले. २३ मेपर्यंत या सगळ्यामुळे झालेले नुकसान १२० कोटीपर्यंत जाते. भिवंडीचे हातमाग बंद झाल्याने ठाणे व मुंबई जिल्ह्यातील १५० मध्यम व लहान कापडकारखाने बंद पडण्याची भीती निर्माण झाली. मुंबईचे मूळजी जेठा मार्केटही शांत-शांत झाल !

महाराष्ट्रातून साखर आणणाऱ्या ट्रकसनी मुंबईला जायचे नाकारले होते. दर आठवड्याला मुंबईत २५ हजार क्विंटल्स साखर आयात होते. १८ ते २४ तारखांच्या दरम्यान ती ५० टक्याहून कमी झाली. तेलबिया, कापड, धान्य, धातू यांच्या किंमतीवरही परिणाम झाला. □

## सणकोत : पृष्ठ ६ वरून

वाढदिवसाला कमरेत जी चांदीची साखळी येते ती
बहुधा या प्रश्नाचाच ' सिबॉलिझम ' असावा !
पण हे एक न चुकणारं देणं आहे.
आणि ह्या देण्याचे देणेकरी कुणीही असू शकतात.!
आईवडील, भाऊ–बहीण, आप्तस्वकीय, मित्रमैत्रिणी, मास्तर,
ऑफिसर.. आणखी कोणीही म्हणजे लेखक, कवी,
सिनेमावाले, नाटकवाले, अगदी रस्त्यावर खेळ करणारे
डोंबारीही...म्हणजेच साक्षात कुणीही देणेकरी होऊ शकतो...
...पैकी आई–वडील व मास्तर हे प्राथमिक देणेकरी.
नंतरच्या मग याच्या मिश्रणातून तयार होणारे दुय्यम देणेकरी–
...नुस्त ' आ ' आणि ' बा ' बोलण्याइतकी जीभ उचलण्याचा
अवकाश आईबाप अपेक्षित उत्तरानेच विचारतात
...मोत्ता होऊन कोन होनाल ले राजा ?
' राजा ' या शब्दाचा अर्थही त्या वयात कळत नसल्याने
केवळ बोळकं मोठ करून हसणं याशिवाय जास्त काही
होत नाही. अन्यथा ' राजाना विचारणारे तुम्ही कोण ?
असा उलट प्रश्न विचारणारी हिस्टॉरिकल पोझ घेता आली असती !
नतर मास्तर.. आयुष्याचे शिल्पकार वगैरे.
गुरुकुलाची ही वंशावळ आता २७०+१०+अधिक इ. बी.
असल्या ' पे–स्केल ' वर घडणावळ करत असल्याने
एखाद्याला घडवण्याचे ठोक कत्राटच ते घेतात आणि
बोर्डात पहिला आणीन इथपासून ते डॉक्टरच बनवीन
इथपर्यंतच्या घोषणा ते द्रोणाचार्यांच्या आवेशात करतात; पण
.. ' तुम्ही आयुष्यात पुढे काय करू शकणार नाही ' असं
बनियाच्या पोराला ताठ कण्याने सांगणारे मास्तर संध्याकाळी
दुकानी गेल्यावर पिशवीत सार सामान भरताना
गल्ल्यावर बसलेल्या त्याच पोराला ' मांडून ठेवा ' सागताना
सकाळचा ताठ कणा घरी खुंटीला अडकवून आलेले असतात
आणि...एवढं करून तुम्ही काय मिळवलं ? हा प्रश्न बनियाच्या
पोरानं मास्तरांच्या नावावर माडून ठेवलेला असतो !
एकूण या वेटोळ्याची सुरुवात दिसते
पण शेवट सापडत नाही.
हरघडी, किंबहुना हर श्वासाला त्याचं
अस्तित्व आपल्याला पोखरत असत...
शिक्षण पूर्ण केलं तरी–
पुढे काय पोस्ट ग्रॅज्युएशन करणार काय ?
पोस्ट ग्रॅज्युएशन झालं की–
पुढे काय डॉक्टरेट करणार काय ?
डॉक्टरेट पदरी पडली की–
मग पुढे काय प्राध्यापक होणार काय ?
प्राध्यापक झालं की–
पुढे काय परीक्षक वगैरे होणार काय ?
...हेच वेगळ्या प्रकारे नोकरी लागली की
–पुढे काय इथेच परमनट होणार काय ?
परमनंट व्हायचा अवकाश
आता पुढे काय ? लग्न ?
लग्न झालं की लगेच भुवया उंचावून, खॅऽऽखॅऽऽ करून
हूं...आता पुढे काऽऽय ?
...बापबिप होणार की नाही ? असले आव्हानात्मक
चाळवणारे वगैरे प्रश्न...
ह्या वेटोळ्यातून सुटून दुसरीकडे
डोकवावं तर तिथे चार कॉलमात
शरद पवार–वाजपेयी भेट. पुढे काय ?!
अमिताभ–रेखा प्रकरण जोरात
जया पुढे काय करणार ?
रेगनची पेकिंग भेट–पुढे काय ?
रशियाचा ऑलिंपिकवर बहिष्कार–पुढे काय ?
अंतुले खटल्यात फाळक्याची
७२ पानी साक्ष–पुढे काय ?
...या सगळ्यापास्नं आणखी थोडं
मोकळं व्हावं म्हणून जरा वेगळी वाट
शोधावी तर...
नाइटगाउनचे बद एका हाताने बांधीत बॉंड
दुसऱ्या हातातल्या पिस्तुलाने पुढे काय ? असं
म्हणून श्वास रोखायला लावतो तर दुसरीकडे
कादरखान अमिताभबरोबर येऊन पुढे काय ?
हे माहीत असूनही ' माहीत नाही ' असं म्हणायला
लावून तीन तास थांबवून ठेवतो...
...त्यांनाही टाळून पळालोच तर अनत माने, दत्ता केशव
वगैरे लोक...पुढे काय ? नावाचा पातिव्रत्यप्रश्न विचारून
शिखरशिंगणापूर किंवा जेजुरीची यात्रा करायला लावतात...
आणि रात्री १२ नंतर हाफ रिटन रिक्शा चार्ज खिशातल्या
दौलतीला खिजवून म्हणतो पुढे काय ?
...तर अशी सदासर्वकाळ भविष्यकालीन ' गोची '
गोचिडासारखी चिकटून आपल्या रनिंग लाइफचं शोषण
करीत असते आणि आपण जाणीव नसलेल्या
गुलामांसारखे ' उद्याच्या भविष्यासाठी ' आपली
' आज ' पिळवणूक करून घेत असतो ..
मनुष्यजन्माला ही एक भीषण अवस्था आहे
असं वाटतं कधीकधी; पण ती अपरिहार्य आहे...
सुखी व संपन्न वगैरे आयुष्य जगण्यासाठी पुढचा विचार
आजच करा ही हेडलाइनच आपल्या आयुष्याचा
प्रवास ठरवते आणि रांगेत चालणाऱ्या मुंग्यांसारखा
आयुष्याचा ' कदम–ताल ' सुरू होतो...
या सगळ्यात क्वचितच एखादा बालकवी पैदा होतो
जो आखीव रुळावर देखील पाय पसरुनी जळात बसला
असल्या ओळी मुक्तपणे पेरीत आपल्याच तद्रीत
चालतो आणि तितक्याच बेफिकिरीने हा 'ग्रीड'चा प्रवास संपवतो...
...क्वचित एखादा तरुण पोरगा घरदार, भाऊबंद,
शिक्षण सोडून आदिवासी, वनवासींना जागं करण्यासाठी
अरण्य पेटवत जातो...
...एखादीच तरुणी प्रचंड हालअपेष्टा, मानहानी
यातून बाहेर पडून स्वतंत्रपणे जगते
...कोणी एक ' चांगली एकच कलाकृती ' एवढा ध्यास
घेऊन ते पूर्ण करून आयुष्य संपवतो...
...बस...बाकीच्यांना हे अजगरी वेटोळं
असंच आवळत नेतं, त्याच्या नकळत.
त्यांना सगळं तो आधीच करायला सांगतो,
आखायला सांगतो, मांडायला सांगतो. चाळीस
वर्षांनंतरचे सव्याज हिशोब सांगतो. हयातीनंतरचे
सुखी संसार दाखवतो. मुलाचे मेडिकल लायसन
आणि मुलीचा थाटातला विवाहसोहळा दाखवितो...
पेन्शनीतली रिलॅक्सिंग चेअर त्यांना तिशीतच भेट
देतो...आणि तरीही त्यांच्यासाठी प्रत्येक
दिवस ' नवा ' ठेवतो, उद्याचा ठेवतो
तेही बिचारे हात वर करून...त्याची लीला
अगाध आहे ! पुढे काय होणार त्यालाच माहीत...
...आणि तोही खदखदा हसत म्हणतो,
...अभी अभी तो पर्दा खुला है
आगे आगे देखो होता है क्या !

–संजय पवार

# नाट्यपंढरी



## ☐ ही ठेव केशवरावांची !

८ जुलै १९२१ रोजी टिळक स्वराज्य-फंडासाठी 'केशव–नारायण' (केशवराव भोसले नि नारायणराव बालगंधर्व) यांचे संयुक्त 'मानापमान' झाले नि जणू केशवरावांना दृष्टच लागली. ते लगेचच चार ऑक्टोबरला गेले ! 'ललितकलादर्श' समोर अंधार पसरला. आता कंपनीचे काय होणार याची सर्वांनाच काळजी वाटू लागली; पण केशवरावांना जणू आपले विधिलिखित कळले होते. त्यांनी मृत्युपत्र करून ठेवले होते. वास्तविक मृत्युपत्र म्हणजे आपल्या इस्टेटीची, कुटुंबियांत केलेली कायदेशीर वाटणी; पण तुम्हाला आश्चर्य वाटेल, केशवरावांचे धन म्हणजे त्यांची कंपनी. मालकीची नाट्यसंस्था–ललितकलादर्श ! ती त्यानी रक्ताच्या नातेवाइकांच्या नावे केली नव्हती, तर कलेच्या कुटुंबियांच्या-आपल्या सच्च्या सहकाऱ्यांच्या स्वाधीन केली होती. ते होते बापूसाहेब पेंढारकर नि नानासाहेब चापेकर !

दोघांनीही एकदिलाने संस्था चालू ठेवली. पाठीशी केशवरावांची पुण्याई होतीच. मामा वरेरकरांचे 'सत्तेचे गुलाम' हे सर्वतोपरी नाविन्याने नटलेले नवे नाटक रंगभूमीवर आणले. बापूंचा 'वैकुंठ' सर्वोत्कृष्ट ठरला. नाना चापेकरांची 'नलिनी' प्रेक्षकांना एकदम आवडली. नानासाहेब फाटकांच्या रूपाने (केरोपंत) एका समर्थ गद्यनटाची जोड मिळाली. नाना चापेकर मात्र लवकरच दूर झाले. संस्थेची सगळी जबाबदारी एकट्या बापूंच्यावर पडली. बापू नव्याचे भोक्ते होते. आपल्या प्रेक्षकांना सतत काही तरी नवीन द्यावे अशी त्यांची धारणा होती; पण 'तुरुंगाच्या दारात' हे मामांचे नवे नाटक त्यांना पार नामोहरम करून गेले. बापू धडाडीचे होते. जिद्दी होते. नवी-जुनी नाटके बसवून कंपनीचा तोल संभाळला होता. पुण्यप्रभाव नि कृष्णार्जुनयुद्ध यांसारख्या नाटकांनी त्यांना हातही दिला; पण 'सत्तेचे गुलाम'च्या वेळेचे उत्साही नि आनंदी वातावरण कंपनीत पुन्हा कधीच निर्माण झाले नाही. गुरव, माशेलकर, भार्गवराम, दामले अशा अनेक गुणी कलावंतांची साथ लाभली. तरी पण म्हणावे तसे यश पदरी पडत नव्हते. ऊन पावसाचा खेळ चालू होता; पण ऊनच अधिक होते.

मग बापूंनी सिनेमाचे वेड घेतले नि जे साऱ्या नाटकवाल्यांचे झाले, तेच ललितकलादर्शचे झाले. बापू कर्जाने पार खचले. सहकाऱ्यानी पाठ फिरवली. अखेर बापू आजारी असता ग्वाल्हेर मुक्कामी कंपनीवर सावकाराची टाच आली. कंपनीची होती नव्हती ती चिजवस्तू जप्त झाली. नाही म्हणायला बापूंचे दोन तंबोरे, हे आपल्या मालकीचे आहेत असे दामले–भार्गवरामांनी सांगितल्याने वाचले तेवढेच ! या सगळ्या विपरीत परिस्थितीत बापूंना कायद्याचा सल्ला देण्यात आला की, त्यांनी संस्थेचे नाव बदलावे. नादारीचा अर्ज करावा. अर्थात या मागेही कंपनी वाचावी हीच त्यांच्याजवळ असणाऱ्या मंडळींची इच्छा होती; पण बापूंच्या स्वाभिमानी स्वभावाला ते मान्य कसे होणार ? तशाही परिस्थितीत त्यांनी स्वच्छ सांगितले, 'नाही, हे होणार नाही ! काय व्हायचे असेल ते होवो. मी कंपनीचे नाव बदलणार नाही. नाव बदलणारा मी कोण ? केशवरावांनी मोठ्या विश्वासाने माझ्यापाशी ठेवलेली ठेव आहे ती ! ते त्यांचे धन आहे !

रसिकहो, नाव बदलले असते तर ? पण हे जर तर हवे कशाला ? 'ललितकलादर्श'चा अमृतमहोत्सव साजरा करण्याचे नि तो डोळे भरून पहाण्याचे भाग्य आपल्याला लाभले असते का ? १९०८ ते १९८४ असा वारसा सांगता आला असता का ? खचित् नाही ! बापूंनी नाव बदलले नाही. निष्ठा सोडली नाही म्हणूनच एकमेव अमृतमहोत्सवी नाट्यसंस्था म्हणून अभिमानाने तिचा उल्लेख होत आहे. भालचंद्र पेंढारकर ती पताका आज त्याच निष्ठेने सांभाळीत आहेत, फडकवीत आहेत. केशवराव–बापू–भालचंद्र त्या एकाच संस्थेचे सेक्रेटरी. त्या एकाच श्रद्धेचे, एकाच दिंडीचे वारकरी.

मला वाटते सूर संपत नाहीत म्हणूनच बापूंचे तंबोरे वाचले. भार्गवराम दामले या त्यांच्या सद्शिष्यांनी वाचविले, म्हणूनच ते या क्षणापर्यंत झंकारत राहिले आहेत. ही वारकऱ्यांची वीणा सदैव अशीच झंकारत राहो ! 'ललितकलादर्श'चे नाव दुमदुमत राहो. रसिकांच्या तोंडी घोळत राहो !

## ☐ आता सारे संपले !


केशवराव भोसले यांचे जीवलग स्नेही नि 'ललितकलादर्श'चे कर्तबगार मॅनेजर शितूतमामा (केशवराव शितूत) यांच्या मित्रप्रेमाला तर रंगभूमीच्या इतिहासात तोड नाही ! केशवराव भोसले गेले, त्या दिवशी स्मशानभूमीवर त्यांना श्रद्धांजली अर्पण करतानाच त्यानी शपथ घेतली की 'यापुढे नाटकाशी वा नाट्यव्यवसायाशी माझा रतिमात्र संबंध राहणार नाही! मी थिएटरची पायरी चढणार नाही !' खरोखरच ही प्रतिज्ञा त्यानी अखेरपर्यंत पाळली.

बापूसाहेब पेंढारकर नि नाना चापेकरांना वाटे की, शितूतमामाच व्यवस्था पहायला हवे; पण नाही त्यांनी पुढे नाटकाचे नाव घेतले नाही. त्यांचे उत्तरीय आयुष्य बाळासाहेब पेंडसे, कुटुंबातील एक वडीलधारे कुटुंबीय (पेंडसे स्पोर्टस्–पुणे) म्हणून गेले !

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No-11 ) Regd. No. PNCW-28


# राजहंस विद्यार्थी दैनंदिनी

## मुलांना विज्ञानयुगातील बिरबल बनवणारी



१. हे ठोकळे कसे मांडले आहेत ?
एकावर दोन का दोनावर एक.
विचार करून सांगा.

तुमचे डोळे तुम्हाला फसवतील.



२. सांगा यातली कोणती रेष सरळ आहे ? नीट पहा. कारण इथेही तुमचे डोळे तुम्हाला फसवू शकतात.



३. अंडे न फोडता सांगा–
कच्चे आहे का उकडलेले ?

देवकीचा आठवा पुत्र मनी आठवा.

$$0 \times 9 + 8 = 8$$
$$09 \times 9 + 7 = 88$$
$$098 \times 9 + 6 = 888$$
$$0987 \times 9 + 5 = 8888$$
$$09876 \times 9 + 4 = 88888$$
$$098765 \times 9 + 3 = 888888$$
$$0987654 \times 9 + 2 = 8888888$$
$$09876543 \times 9 + 1 = 88888888$$
$$098765432 \times 9 + 0 = 888888888$$
$$0987654321 \times 9 + (-1) = 8888888888$$
$$09876543210 \times 9 + (-2) = 88888888888$$

४. तुम्हालाही असे आकड्यांचे पिरॅमिड्स करता येतील. कसे ?

अशा अनेक धमाल गोष्टी तुम्हाला शिकायच्या व समजून घ्यायच्या असतील तर आजच खरेदी करा–

# राजहंस विद्यार्थी दैनंदिनी

आणि काय वाचाल या दैनंदिनीत ?